शतसांवत्सरिक महोत्सव

१९५८-५९




V23153CW.61.N6

V23153CW,61.N6
J6
123219

पुरेका

ते १९५९


— वाई शहराचा नकाशा -



१ कोर्ट
२ म्यु.पब्लिक दवाखाना
३ प्रातःपाठ शाळा
४ स्वामी केवलानंद समाधी
५ श्रीकृष्णोत्सव मंदीर
६ वास्ते वाडा
७ सिटी पोस्ट
८ साळवेकर दत्त मंदीर
९ गोशाळा
१० बालोद्यान
११ चित्रा टॉकीज
१२ गणपती मंदीर
१३ कन्याशाळा
१४ ट्रेनिंग कॉलेज
१५ महिला मंडळ
१६ टिळक वाचनालय
१७ मोतीबाग
१८ काशीविश्वेश्वर मंदीर
१९ पी.डब्ल्यू.डी. स्टोअर्स
२० मामलेदार कचेरी
२१ रहदारी बंगला
२२ मिशन हॉस्पिटल
२३ फुले भाजी मंडई व महात्मा गांधी सभागृह.
२४ सिद्धनाथ वाडी.
२५ जनावरांचा दवाखाना
२६ पोस्ट ऑफिस
२७ जि. लो. बोर्ड ऑफिस.
२८ एस. टी. स्टँन्ड
२९ नगरपालिका कार्यालय
३० दाणे बाजार
३१ श्री विठ्ठल मंदीर
३२ श्री राम मंदीर
३३ श्री व्यंकटेश मंदीर
३४ श्री लक्ष्मी मंदीर
३५ पागा
३६ जैन मंदीर
३७ जनरल हॉस्पिटल डॉ. दातार यांचे
३८ भवानी मंदीर
३९ डॉ. भावे यांचे मॉडर्न क्लिनिक
४० न.पा. कामगार वसती गृह व स्टोअर
४१ सोनगीर वाडी
४२ द्रविड हाय स्कूल
४३ चावडी
४४ द्रविड वाडा
४५ शिंदे विद्यालय
४६ गंगोत्री विठ्ठल मंदीर
४७ वाई अर्बन को. ऑ. बँक
४८ जुम्मा मशीद
४९ किचक टेकडी
५० नागझरी
५१ महात्मा फुले नगर
५२ भद्रेश्वर
५२ छत्रपति उद्यान.
५४ बाल क्रीडांगण.

SCALE 1" = 300'

भारताच्या इतिहासांत सुवर्णाक्षरांनी लिहिला जाणारा
ओजस्वी नी अमरप्रसंग
महामंत्र्यांची महाराष्ट्राच्या महापुरुषाला मानवन्दना.


Dhananjayarao Gadgil Library
GIPE-PUNE-123219

मुक्या मनानें किति उधळावे शद्बांचे बुडबुडे
तुझे पवाडे गातिल पुढती तोफांचे चौघडे.

वांई नगरपालिका

शतसांवत्सरिक महोत्सव

शताब्दि-स्मृतिग्रंथ

कृष्णातीरीं मूर्त क्षेत्र सुगुण आजकाल वांईत
इच्या यशे धरीलचि अमृताचा लाजकाल वांईत

कवि–मोरोपंत

प्रस्तावना

"जीवेम शरदः शतम्" असें वेदकालीन ऋषि म्हणत असत. शंभर वर्षांचें आयुष्य लाभावें ही व्यक्तीच्या आयुष्यांतील मोठी भूषणावह व भाग्याची गोष्ट समजली जाते. नैसर्गिक आपत्ति व रोग यांच्या तावडींतून सुटून शताब्दी पर्यंत मजल मारणें ही खरोखर भाग्याची गोष्ट आहे. सामान्य व्यक्तीच्या बाबतींत जर शतायुर्मान ही दैवी सम्पद् समजली जातें, तर जिचा आयुर्भार अनेक व्यक्तींच्या सहकार्यावर व त्यागावर अवलंबून आहे. त्या संस्थेच्या बाबतींत ही घटना किती आनंददायक ठरावी ! किंबहुना, व्यक्तीपेक्षां संस्थेच्या बाबतींत या घटनेचें महत्त्व अधिक आहे, कारण व्यक्तीच्या आयुष्यांत आपत्ति फार थोड्या असतात; पण संस्थेच्या जीवनांत अनेक आपत्ति असतात. कधीं सभासदांमध्यें परस्पर सहकार्याचा अभाव तर कधीं सेवकांचा परस्परांविषयींचा मत्सर; कधीं संस्थेविषयीं जनतामनामध्यें उत्पन्न होणारा अनादर. तर कधीं शासनाधिकाऱ्यांची वक्रदृष्टी; अशी कित्येक संकटें येतात. या सर्व विघ्नांना तोंड देऊन शतायु होणाऱ्या भाग्यवान संस्था फार थोड्या.

आपली वांई नगरपालिका अशाच थोड्या संस्थापैकीं आहे. सन १८५६ या वर्षी आपल्या नगरपालिकेची स्थापना झाली आहे. तेव्हां पासून बहुविध स्थित्यंतरातून जात जात आपल्या नगरपालिकेला आजचें हें वैभवशाली स्वरूप प्राप्त झालें आहे संस्था कोणत्या निमित्तानें चालूं झाली, तिची अवस्थान्तरें कशीं होत गेलीं इत्यादि इतिहास पुढें दिला आहेच. संस्थेच्या जन्मापासून आतापर्यंत तिची सतत जी प्रगति होत गेली आहे, तिला निरनिराळ्या काळीं असलेल्या सभासदांचें सहकार्य, सेवकांची निरलस सेवा व जनतेची या नगरपालिके विषयींची आपुलकीची भावना याच गोष्टी कारणीभूत आहेत.

नगरपालिकेच्या प्रत्येक अध्यक्षाची कारकीर्द संस्थेच्या आयुष्यांतील एक टप्पा मानला तर असे निरनिराळे टप्पे या संस्थेच्या जीवनांत दिसून येतात. आणि विशेष हा कीं, या प्रत्येक कालांत संस्थेची प्रगतीच होत गेली आहे. निरनिराळ्या अध्यक्षांच्या कारकीर्दीत काय काय प्रगति झाली याचें इतिवृत्त पुढील पानांत दिसेलच. त्यांची पुनरुक्ति येथें नको. मात्र पुनरुक्तीचा दोष पत्करूनहि एवढें म्हणावयास हरकत नसावी कीं, या संस्थेची सतत प्रगतीच होत आलेली आहे. व्यक्तीची प्रगति ज्याप्रमाणें किती पावसाळे त्या व्यक्तींनीं पाहिले यावरच नुसती अवलंबून नसते.

तर त्या व्यक्तीचा सर्वांगीण विकास झाला आहे कीं नाहीं यावर अवलंबून असते, त्याप्रमाणेंच संस्थेनें कोणती "संवत्सरी" साजरी केली यापेक्षां सस्थेच्या जन्मापासून या संवत्सरी पर्यंतच्या काळांत तिनें काय प्रगति केली हेंच महत्त्वाचें आहे या दृष्टीनें पाहिलें तरीहि वांई नगरपालिकेचें कार्य अभिमानास्पद आहे. तिनें नुसते शंभर पावसाळे पाहिलेले नाहींत, तर या नगरीचो सर्वांगीण सुधारणा कशी होईल व या पुरींतील नागरिकांचें जीवन आरोग्यसंपन्न व सुखी कसें होईल याकडे सतत लक्ष्य दिलें आहे. पुढें दिलेले या संस्थेचें जीवन चरित्र याचीच साक्ष देईल.

शताब्दि महोत्सवाचें वेळीं या संस्थेचा जीवनेतिहास घडविण्याच्या बाबतींत ज्यांचे ज्यांचे सहकार्य लाभलें त्यांच्या ऋणाचा साभार निर्देश करणें हें आमचें आद्य कर्तव्य आहे. त्याच प्रमाणें ज्यांनीं हा इतिहास लिहिण्याचें कामीं सहाय्य केलें त्या सर्वांचे आम्ही ऋणी आहोंत.

याशिवाय उल्लेख करण्यासारखी गोष्ट म्हणजे ज्यांचा वांई शहराचे शिल्पकार म्हणूनच गौरव केला पाहिजे ते म्हणजे **मान. रा. ना. उर्फ भाऊसाहेब भावे** B. A. LL. B. माजी नगराध्यक्ष यांनी स्वतः हा इतिहास लिहिण्याचें कामी अत्यंत अमोल असें सहाय्य केलें आहे. त्याचप्रमाणें त्यांनीं न्यांना आलेले निरनिराळे अनुभव वरचेवर सांगून आम्हांस या कामीं मार्गदर्शन केलें त्याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहोंत.

वांई नगरपालिकेचा शंभर वर्षांच्या इतिहासा मध्यें वांई शहरांत निरनिराळ्या प्रकारची महत्त्वपूर्ण कामें करीत असलेल्या संस्थांची माहिती व त्यांचाहि थोडक्यांत इतिहास माहीत असावा या दृष्टीनें प्रत्येक संस्था चालकांना आम्ही त्या त्या संस्थेची माहिती आम्हास पुरविणेची विनंति केली. वांईतील बहुतेक सर्व संस्था चालकांनीं आपापल्या संस्थांची माहिती आम्हास आणून दिली व हा इतिहास लिहिण्याचें कामीं आम्हास सहाय्य केलें त्याबद्दल त्यांचेहि आभार मानणें हे आमचें कर्तव्य होय. त्याच प्रमाणें संस्था चालकांना आम्ही नगरपालिकेचा शतसांवत्सरिक महोत्सव साजरा करणें व इतिहासाचा हा ग्रंथ प्रसिद्ध करणें वगैरे गोष्टी करण्यासाठीं शक्यते आर्थिक सहाय्य करणें बद्दल विनंति केली होती. आमच्या विनंतीस मान देऊन सर्व संस्थांनीं या कामी आम्हास आर्थिक मदत केली त्याबद्दल त्यांचे आम्ही ऋणी आहोंत.


ज्याप्रमाणें आम्हो वांईतील संस्थांच्याकडे आर्थिक सहाय्याची विनंति केली त्याचप्रमाणें वांई नगरपालिकेचे सर्व माजी नगराध्यक्ष, सभासद व वांईचे व्यापारी व नागरिक यांनाहि या कार्यासाठीं शक्य तो मदत करण्या बद्दल विनति केली त्यास मान देऊन, सर्वांनीं आम्हास सहकार्य देऊन आत्मीयतेनें मदत केली त्याबद्दल आम्ही त्याचे आभारी आहोत.

या ग्रंथांतील वांई वर्णनाचा भाग लिहिण्याचे कामीं कै. नरेश काशीनाथ आगाशे, गंगापुरी वांई यांनी स्वतः आजारी असूनहि आम्हास आत्मीयतेनें मदत केली त्याबद्दल त्यांचा उल्लेख करणें आमचें कर्तव्य आहे. त्याच प्रमाणें वांईचेच परंतु हल्लीं मुंबईम सिद्धार्थ कॉलेज मध्यें प्रोफेसर असलेले डॉ. ना. अ. देशपांडे M. A. M.Ed. Ph.D. यांनीं आम्हांस हा ग्रंथ लिहिण्याचे कामीं खूपच मदत केली. या ग्रंथामध्यें असलेल्या निरनिराळ्या सुंदर छाया चित्रांचे ब्लॉक्स तयार करवून देण्याचें कार्य श्री. त्रिंबक गंगाधर सोहनी यांनीं केलें आहे. तसेच मुखपृष्ठावर असलेले छाया चित्र श्री. व. ज्ञा. कानिटकर, प्राध्यापक, जीवन-शिक्षण-अध्यापन विद्यालय वांई यांनीं तयार करून दिलें आहे. शेवटीं मुख्य गोष्ट म्हणजे ग्रंथ छपाईची होय. ग्रंथ छपाईचें काम वांईतील विराज वैभव प्रेस यांनीं


उत्कृष्ट असे अल्पमुदतींत करून दिलें आहे. या सर्वांचे आम्ही ऋणी आहोंत.

शारीरिक व बौद्धिक क्षेत्रांत ज्या नगरींतील अनेक व्यक्तींनीं प्राविण्य संपादिलें आहे. अशा या समृद्ध नगरीच्या पालिकेच्या शताब्दी महोत्सवाचें अध्यक्षीय आसन विशाल अंत:करणाचे व विशाल मुंबई राज्याचे **मुख्य मंत्री नामदार यशवन्तरावजी चव्हाण** यांनीं अलंकृत केलें हा मणि कांचन योगच होय !

आपला नम्र,
डॉ. प्र. शं. मराठे
अध्यक्ष
नगरपालिका वांई



वांई नगरपालिका कार्यालय



पूज्य ब्रह्मीभूत स्वामी केवलानन्द सरस्वती

गुरुकुल.....



पूज्य ब्रह्मीभूत स्वामी केवलानन्द
सरस्वती यांची 'अभ्यासिका'


पूज्य ब्रह्मीभूत स्वामी केवलानन्द
– सरस्वती –
'समाधि दर्शन'



" इथे थांबवा इथेच दिंडी "


– वांई नगरपालिका –

शतसांवत्सरिक महोत्सवाचे व शताब्दि ग्रंथ प्रकाशनाचे अध्यक्ष



विशाल मुंबईराज्याचे व विशाल अंतःकरणाचे आमचे मुख्यमंत्री.

नामदार यशवन्तरावजी चव्हाण.



तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी -

जन्म २५ जानेवारी १९०१ मु. पिंपळनेर जि. प. खानदेश. श्रीक्षेत्र वांईस शिक्षणार्थ आगमन (१९१४) उच्च शिक्षण प्राज्ञपाठशाळा वांई व वाराणसी येथें झालें. (१९२०) तर्कतीर्थ परीक्षा उत्तीर्ण. १९२०, १९३० व १९३२ च्या असहकार व सत्याग्रह चळवळींत भाग. १९२४ पासून धार्मिक व सामाजिक सुधारक म्हणून प्रचार कार्यास प्रारंभ. १९२४ मध्यें सोनगीर, १९२९ मध्यें काशी व १९३४ मध्यें प्रयाग येथें पंडित समेलनांत धार्मिक सुधारणेचा पक्ष घेऊन संस्कृतमध्यें पंडितांशी चर्चा करून धार्मिक व सामाजिक सुधारणंस वेदशास्त्रांचे आधार दिले १९५१ मध्यें "सोरटी सोमनाथच्या" प्रतिष्ठापना समारंभाचे आचार्यपद; नागपूर विद्यापीठातर्फे दोन व पुणें विद्यापीठातर्फे चार व्याख्यानमाला गुंफल्या. १९५४ मध्यें दिल्ली येथील मराठी साहित्य संमेलनाचें अध्यक्षपद. साहित्य अकादमी, नवी दिल्ली या संस्थेनें स्वातंत्र्योत्तर काळांत १९४७ ते १९५४ पर्यंत प्रसिद्ध झालेल्या मराठी पुस्तकांत "वैदिक संस्कृतीचा विकास" हें पुस्तक पहिल्या प्रतीचें ठरवून ५ सहस्र रुपये पारितोषिक दिले. धर्मकोषाचे संपादन. ७ भाग प्रसिद्ध. १५ भागांचे प्रकाशनाचें कार्य चालूं. धर्मकोषाचे प्रमुख संपादक व प्राज्ञपाठशाळा मंडळाचे अध्यक्ष.

आमचे वांई शहर

[संकलक–डॉ. प्र. शं. मराठे, अध्यक्ष न. पा. वांई]

फार प्राचीन काळीं हल्लीं वांई या नांवानें प्रसिद्ध असलेल्या वैराज क्षेत्राचें ठिकाणीं निबिड अरण्य होतें हा भाग लता वेलींनीं व पुष्कळ फुल-झाडांनीं सुशोभित दिसत होता. त्यांतूनच श्री कृष्णा नदीचा प्रवाह जात असल्यामुळें या भागाची निसर्गाची शोभा वाढली होती. अशाच अरण्याच्या एका भागांत आपलें वाई हें सुंदर शहर वसलें आहे. या शहराला क्षेत्रत्व आणण्याचें काम श्री कृष्णामाईनें केलें आहे या नदीला " कृष्णा " हें नांव पडण्याचें कारण स्कंद पुराणांत सांपडतें. तो श्लोक असा—

" कृष्णाच दृष्टा कृष्णेन भुवं नीताच या दिवः ।
सर्वं कर्षतिचा घौघं ते कृष्णा प्रकीर्तिता ॥

श्री कृष्णाबाईचा महिमा फार अगाध आहे प्रत्यक्ष श्री विष्णूंनीं " कृष्णा याश्चापि सांनिध्यात पापं नैव भविष्यति " असे वर्णन केलें आहे.

वांई शहराबाबत ऐतिहासिक माहिती—

इसवीसन १४२९ मध्यें दौलताबादच्या बहामनी राज्याचा सुभेदार मलिक अुलतुजा यानें वांई हें ठाणें घेतलें. तेव्हांपासून वांईवर बहामनी राज्याचा अंमल होता. पुढें इसवीसन १६४८ पासून १६५९ पर्यंत विजापूरच्या बादशहाचा वांईवर अंमल होता. इसवीसन १६५९ मध्यें विजापूरकरांचा सरदार अफजलखान याचा किल्ले प्रतापगडाचे पायथ्याशीं श्री छत्रपती शिवाजी राजांनीं वध केला. त्याचे अगोदर अफजलखानाचा लष्करीतळ वांईसच होता. १६५९ पासून वांई प्रान्ती शिवाजी राजांचा अंमल सुरू झाला. अफजल खानाचे वधाचे वेळीं गोपीनाथ बोकील यांनीं महत्वाची कामगिरी केली त्याबद्दल महाराजांनीं त्यांना हिवरे हा गांव इनाम दिला. हा गांव हल्लीं बोकिलांचे वंशजाकडे आहे. बोकील यांचें घर ब्राह्मणशाहींत आहे. पुढें १६८७ मध्यें पुन्हा वांईवर विजापूरचा शिरजेखान यानें हल्ला केला तेव्हां हंबीरराव मोहिते यांनीं त्याचा पराभव केला. १६९० मध्यें राजारामाचे कारकीर्दीत मोंगलांनीं बांईवर पुन्हा चढाई केली. परंतु संताजी घोरपडे (कापशीच्या घोरपडयांचे मूळपुरुष) यांनी तो हल्ला परतविला व वांई ही मराठयांचे ताब्यांत ठेविली. रामचंद्रपंत आमात्य यांनीं सुचविलेल्या युक्तीप्रमाणें वांईचे फौजदारावर अचानक छापा घालून त्याला कैद केले व वांईवर मराठी लोकांचें ठाणें बसविलें. रामचंद्रपंतांचा कारकून शंकरराजी नारायण यांचें ताब्यांत वांई दिली. त्यानें भोर राजगड नांवाचा किल्ला मोंगला पासून हस्तगत केला. १७०८ सालीं शाहूराजे दिल्लीहून सुटून आले; त्यावेळीं त्यांना राज्यावर बसविणेचें कामीं वांई येथील शेखमिरे यांनीं मदत केली हे मनांत आणून शाहू महाराजांनीं त्यांना पसरणी गांव इनाम दिला. शाहू महाराजांचे कारकीर्दीत रामाजी दामोदर गाडगीळ व भिकाजी शामजी रास्ते वांईस आले. हे दोघेही महाराजांचे पदरीं असून मर्जीतले होते. भिकाजी शामजी रास्ते वांईस आल्यावर एक लहानसा वाडा बांधून त्यांत राहू लागले. तो वाडा हल्लीं धर्मपुरींत आहे. यांची मुलगी गोपिकाबाई श्रीमंत नानासाहेब पेशवे यांस दिल्यामुळें यांचा उर्जीतकाळ आला. यांचे पुत्र मल्हारराव यांनींहि श्रीमंताकडून सरदारी मिळविली. दुसरे पुत्र आनंदराव भिकाजी यांची कन्या साठे यांना दिली. याच सुमारास रामाजी दामोदर गाडगीळ यांना अक्कलकोटची दिवाणगिरी मिळाली. याच रास्ते, गाडगीळ, साठे वगैरे लोकांनीं वांई शहरांतून वहात असणाऱ्या श्री कृष्णा नदीचे उत्तरेस भव्य असे घाट बांधले व निरनिराळीं देवालयें बांधलीं व वांई शहराच्या मूळच्या नैसर्गिक सौंदर्यांत भर घातली. निरनिराळ्या देवालयांची व घाटांची माहिती पुढें दिली आहेच. इ. सन १७७४ मध्यें नारायणराव पेशवे यांचे खुनाचे वेळीं पेशवे

दरबारचे न्यायाधीश " रामशास्त्री " वाईनजीक एकान्त स्थळीं राहिलें होते. पुढें इ. सन १७९६ मध्यें श्रीमंत पेशवे यांचे मुख्य मुत्सद्दी कार्य धुरंधर मुकुटमणी नानासाहेब फडणवीस हे वांईस निघून आले त्यांनीं वांईचे पश्चिमेस सुमारें एक दीड मैलावर मेणवली नांवाचें टुमदार गांव कृष्णेच्या कांठीं वसविलें. मेणवलीचा नाना फडणवीस यांचा वाडा फार प्रसिद्ध आहे. यांनीं आपल्या वाड्याचे पश्चिमेस श्री मेणवलेश्वर व श्री विष्णू मंदिर व घाट इतकी कामें अति अवर्णनीय व अप्रतिम अशी केली आहेत. घाटाचें सौंदर्य अगदीं विलोभनीय आहे. मेणवलेश्वराचें देवालयानजीक एक घंटाघर आहे. यामध्यें बसविलेली घंटा फारच मोठी आहे. घंटेचा व्यास ९'-८" व उंची ३'-२" आहे तिचा आवाज फार लांबवर ऐकूं येतो. या भागांत या घंटेइतकी मोठी घंटा नाहीं. नाना फडणवीस यांना नेण्यासाठीं हरीपंत फडके हे चार हजार स्वारानिशी वांईकडे आले होते. परंतु नाना कोंकणांत पळून गेले.

हल्लीं वांई शहराचे पूर्वेस सात मैलावर ओझर्डे, सुरूर, कवठें अशी गांवें आहेत. दक्षिणेस सोनजाईचा डोंगर व बावधन हें गांव आहे. (सोनजाईचे डोंगरापर्यंत १ कोस पायथा व अदमासे १ मैल चढाव आहे.) व बावधन, वाईपासून तीन मैलावर आहे. पश्चिमेस १ मैलावर मेणवली आहे. व तेथून पुढें पांच मैलावर धोम आहे. उत्तरेस रास्ते यांचा मोतीबाग, एक कोस बोपर्डी, एक मैल सुलतान टेकडी व पुढें पांच मैलावर पालपेश्वराची लेणी आहेत. व ऐतिहासिकदृष्ट्या ही लेणी महत्वाची आहेत, असे तज्ञांचें मत आहे.

— वांईतील प्रसिद्ध स्थळे —

गंगापुरी घाट:— वांईतील सर्व घाटांत गंगापुरीचा घाट हा गंगाधरराव रास्ते यांनीं बांधलेला मोठा घाट आहे. हा घाट ३७५ फूट लांब व ५०॥ फूट रुंद आहे या घाटास १२ पायऱ्या आहेत. या घाटास लागूनच श्रीमंत दुपरे बाजीराव पेशवे यांचा ८० फूट लांबीचा घाट आहे. ह्या घाटांस चार पायऱ्या आहेत. हा घाट चौथऱ्या-सारखा आहे. ह्या घाटावर देवालयें आहेत. भाऊ यज्ञेश्वर देवकुळे यांचें "यज्ञेश्वर सांब" हें शिवालय आहे. व त्याचे मागें असलेलें मारुतीचें देवालयामधून खालीं जाण्यास आठ पायऱ्या आहेत. येथेंच गंगाधर बाळकृष्ण मराठे यांनीं बांधलेलें "काशी विश्वेश्वराचें" देऊळ आहे. रास्ते घाटास लागूनच पूर्वेस भानूंचा घाट ५२'-२" लांबीचा आहे. येथें दोन बुरूज असून तेथें नेहमीं पाणी असतें. या घाटाचे पूर्वेस भाऊ जोशी यांचा घाट २८'-९" लांबीचा आहे ह्या घाटाचे पूर्वेस भानू यांचा एक व दामले यांचा एक असे दोन पार आहेत. पाराजवळ दक्षिणाभिमुख वेस आहे. वेस १६' उंच, १०॥' रुंद, भित ९' रुंद आहे. जवळच "अनगळ वेस" आहे. भानू घाटाजवळ मोठ पटांगण व सिंहासन आहे हें सिंहासन २'-१०" अुंच असून १९' लांब व १७' रुंद आहे. ह्या सिंहासनाचें पूर्व अंगास "श्री कृष्णाबाई दप्तर लक्ष्मण मोरेश्वर शास्त्री हळवे आणि मंडळी गंगापुरी शके १८२५" असा मजकूर आहे. ह्या सिंहासनावर श्री कृष्णोत्सव होतो. ह्याचें पुढील शोभिवंत पटांगण ८२' लांब व ५३' रुंद आहे.

श्री अुमा महेश्वराचें देअूळ:— हें मंदिर गंगाधरराव भिकाजी यांनीं बांधलें. या देवालयाचें चारी कोपऱ्यांत चार लहान मंदिरें आहेत. नैऋत्येस गणपती, वायव्येस श्री लक्ष्मी, ईशान्येस श्री विष्णू, आग्नेयेस श्री सूर्य असल्यामुळें या देवालयांस

"पंचायतनाचें मंदिर" म्हणतात. या देवळाचा गाभारा ११'–५।।" चौरस व सभामंडप १७'–३" चौरस आहे. सभामंडपासमोर एका चौथऱ्यावर नंदी आहे. ह्या मंदिराजवळ एक मठ असून त्यांत प्रज्ञानंद स्वामींची समाधि आहे. रास्ते घाटांजवळील वेशीजवळ "काळ्या रामाचें मंदिर" आहे. येथील श्री रामाची मूर्ति काळ्या पाषाणाची आहे. श्री लक्ष्मण व श्री सिता संगमरवरी पाषाणाची आहेत. हें मंदिर साने यांनीं बांधलें. जरा पुढें गेलें असतां श्री मुरलीधराची १'–१०" उंच संगमरवरी सुबक मूर्ति आहे. जवळच गंगाधरराव रास्ते यांचा वाडा आहे. ह्या वाड्याचा बराचसा भाग सन १९४२ च्या "चलेजाव" च्या चळवळींत जळाला आहे. येथेंच वाईचें कोर्ट आहे. गंगापुरींतून पश्चिमेकडे गेलेला रस्ता मेणवली वेशींतून मेणवली, धोम या गांवाकडे जातो. मेणवली वेस, अनगळ वेस, पंचायतन वेस, वाड्याची वेस, फडक्यांची वेस, मधली आळी धर्मशाळेजवळील वेस, बेलबाग वेस या सर्व वेशी गंगाधरराव रास्ते यांनीं बांधल्या.

द्वारके संबंधीं माहिती:– वे. मू. रामभट गद्रे यांनीं ही मूर्ति द्वारकेहून आणली होती. व ज्या ठिकाणांस हल्लीं द्वारका म्हणतात तेथें स्थापन केली. **श्री बहिरोबाचें देऊळ:**– हे लांकडी असून येथे दोन मूर्ति काळ्या पाषाणाच्या आहेत. ह्या देवळाच्या पूर्वेस एक अुत्तम बांधकाम केलेली मोठी विहीर आहे. आंत अुतरण्यास पायऱ्या आहेत. हें देअूळ व विहीर गंगाधरराव रास्ते यांनीं बांधली.

श्री दत्त मंदिर:– हें मंदिर नारो गोविंद जव्हेरी यांनीं बांधलें. मंदिर दुसऱ्या मजल्यावर आहे. मंदिर षटकोनीं असून मंदिराखालीं ७'×४' उंचीची दगडी कमान आहे. श्री दत्त मूर्ति २' उंचीची व संगमरवरी आहे. ह्या आळींत मुसलमानांचा निमजगा आहे. जवळच पट्टाधीशाचें देऊळ आहे.

मधल्या आळींतील माहिती:– पाडळीचे गाडगीळ यांनीं कटिंजनाचा घाट बांधला. हा घाट ९८'-१०" लांब ३९'-३।." रुंद आहे. या घाटावरील पटांगण ७७' लांब २४' रुंद आहे. येथें स्नानसंध्येसाठीं तीन खणी दुमजली इमारत दिक्षित, पटवर्धन यांनीं बांधली. ह्या इमारतींत श्री गणपती- श्री विष्णु, श्री महिषासूर मर्दिनी यांच्या मूर्ति आहेत. गणपतीशिवाय बाकीच्या मूर्ति सगमरवरी आहेत. ह्या इमारती समोर संकेश्वर मठाधिपति विद्या नरसिंह भारती यांची समाधि आहे ह्या घाटांस लागूनच पूर्वेस १३५' लांबीचा दुसरा घाट आहे. येथील श्री "ओंकारेश्वर" देवालय कोंडोपंत नाना गाडगीळ यांनीं बांधलें. या देवालयांसमोरील पटांगण ७५' लांब व ४७' रुंद आहे. या पटांगणावर ८' उंचीचे चौथऱ्यावर धर्मशाळा आहे. या धर्मशाळेस लहानसे बुरुज आहेत. पटांगणावरून धर्मशाळेंत जाण्यास बारा पायऱ्या असून दक्षिणेस दरवाजा आहे "श्री ओंकारेश्वराचें देऊळ" ३' ऊंच १५' रुंद १९' लांब अशा चौथऱ्यावर आहे. गाभारा ८ चौरसफूट आहे. देऊळ पूर्वाभिमुख असून देवळाची उंची ९' आहे. धर्मशाळेंतील चौक ४५' चौरस असा आहे. धर्मशाळेची लांबी ९७' आहे. धर्मशाळा दुमजली आहे. ही धर्मशाळा वर्गणी जमवून बांधली. या आळीचें मूळ नांव "सत्यनाथपुरी" असें होतें. या धर्मशाळेंत होमहवनादि कर्मे व नाटकें होतात. धर्मशाळेचें उत्तरेस लहानसे विष्णु मंदिर आहे. याचेसमोर श्री काशीविश्वेश्वर मंदिर आहे. धर्मशाळेचे मागें राम मंदिर आहे. या ठिकाणीं "रामानंद स्वामी" ऊर्फ वेणीमाधव यांची समाधि आहे.

गणपती आळींतील माहिती:– या आळीचा घाट पूर्व-पश्चिम असून त्याची लांबी ४०१'-७" असून याला लागूनच पुढें ३-४ पायऱ्यांचा घाट २३०'-६" लांबीचा आहे. याची रुंदी १३७'-६।।" आहे. या घाटाला लागूनच पश्चिम दिशेस ६९'-६" लांब व ५१'-३" रुंदीचा पांच पायऱ्यांचा घाट आहे.

या घाटांस बगीचा घाट असें म्हणतात. या घाटाचें व गंगारामेश्वराचें मध्यें एक पटांगण आहे. याची लांबी ११२'-५" व रुंदी ३५'-७" आहे. हें पटांगण या आळींतील गाडगीळ यांनीं बांधलें. या पटांगणावर एक चौथरा असून तो १२'-७॥" चौरस आहे. श्री गंगारामेश्वराचें उत्तरेस २'-९॥" रुंदीची व ४८'-२" लांबीचा फरसबंदी वाट आहे.

श्री गंगारामेश्वराचें देऊळ श्री. गंगाधरराव भिकाजी रास्ते यांनीं बांधलें. हें देऊळ पूर्वाभिमुख असून दर्शनी ३ कमानी आहेत. या देवळांत १० चौरस फुटांचा गाभारा आहे. आंतील पिंडींत एक तांबूस रंगाचा बाण बसविला आहे. देवालयासमोरील चौफेर कमानींत नंदी आहे. याचे दक्षिणेस " भावनेश्वराचें " देवालय आहे. हे देवालय दगडी असून पूर्वाभिमुख आहे.

श्री गणपतीचें देवालय:– श्री गणपती ज्या चौथऱ्यावर आसनस्थ आहेत तो चौथरा १'-४॥" उंच १२'-८॥" लांब व ११'-११" रुंद असा आहे. श्री गणपती ज्या प्रभावळीस टेकून बसले आहेत ती प्रभावळ दगडी आहे. हें देवालय दगडी व पूर्वाभिमुख आहे. श्री गजानन मूर्ति ७' उंच व ६' रुंद आहे. या देवालयांस पूर्वाभिमुख तीन दरवाजे असून दक्षिणेस एक व उत्तरेस एक दरवाजा आहे. पूर्वाभिमुख दरवाज्याबाहेर मोठा सभामंडप आहे हें देवालय संपूर्ण दगडी आहे. या गणपतीस " ढोल्या गणपती " असेंही म्हणतात. याचें कारण बहुधा हेंच असावें कीं, श्री गजानन महाराजांचें पोट ढोलाएवढें मोठें आहे मूर्ति फारच भव्य आहे. या देवालयाचें शिखर वांई क्षेत्रांतील सर्व शिखरापेक्षां फार मोठें व अतिशय उंच आहे. शिखराची उंची सुमारें ७५ फूट आहे. हें देवालय पावसाळ्याचें दिवसांत बहुतेक पाण्यांत असतें. त्यावेळीं कृष्णा नदीच्या पुराच्या पाण्यास फारच ओढ असते. जरी महापूर झाला तरी पाण्याच्या प्रवाहाचा धक्का देवालयास वसूं नये म्हणून देवालयाचे मागें भक्कम कोन बांधला आह. त्यामुळें प्रवाहाचें पाणी कातरलें जातें व देवळास कांहीं धक्का पोहोंचत नाहीं. हें देऊळ गणपतराव भिकाजी रास्ते यांनीं सन १७८० सालीं बांधलें.

श्री काशीविश्वेश्वर:–हें देवालय पूर्वाभिमुख आहे. देवालयाचे सभोंवार मजबूत तट आहे. तटाची लांबी १६१ फूट व रुंदी ९४'-५" आहे. तटावरून फिरण्यासाठीं ३॥ फूट रुंदीचा रस्ता आहे. हा तट १४ फूट ७ इंच उंच आहे. या तटास पूर्वाभिमुख मुख्य दरवाजा असून दरवाजावर नगारखाना आहे. याला खालीं तीन कमानी आहेत. दक्षिण व उत्तर तटास एक एक दरवाजा आहे. आंत दक्षिणोत्तर ओऱ्या आहेत. या ओऱ्या यती, ब्रह्मचारी, कर्ममार्गी लोकांना रहाण्यासाठीं बांधल्या आहेत. तटाचें आंत सर्व फरशी आहे. या फरशीवर गाभारा सभामंडपासह आहे. गाभाऱ्याच्या दरवाजावरील नक्षीकाम फार छान आहे. गाभाऱ्याच्या दक्षिण बाजूला भितीला उजेडाकरितां एक दगडी जाळी असून या जाळींत मोठ्या कौशल्यानें दोन नाग कारले आहेत. जाळींतील नागांची नक्षी हें एक कोडें आहे असें म्हणतात. गाभाऱ्याचें दरवाजास लागून घंटाघर आहे या घंटाघरास लागून सभामंडप आहे. घंटाघरामधील घंटेचा व्यास ४ फूट ११ इंच असून या घंटेएवढी मोठी घंटा वाईंत दुसरी नाहीं.

सभामंडपाच्या दरवाजासमोर नंदी आहे. हा नंदी अतिशय देखणा व मोठा आहे. हा नदी चौफेर दगडी कमानींत बसला असून ह्या बैठ्या नंदीची उंची ३'-९" आहे या नंदीच्या अंगावर घातलेले अलंकार माळा सांखळ्या व घंटा, पाठीवरील झूल, तोंडाची म्होरकी, पायांतील साखळ्या वगैरे काम दगडी असून फार सुंदर आहे. हा नंदी इतका मोठा असून पायाचें खुरापासून तो शिंगापर्यंत सर्व अवयव अगदी प्रमाणबद्ध व बांधेसूद आहेत. या


वांई नगरपालिकेच्या महात्मा गांधी सभागृहांतील --

मान. नामदार यशवन्तरावजी चव्हाण, मुंबईराज्याचे मुख्यमंत्री

व वांअी शहराचे शिल्पकार

मान. रा. ना. ऊर्फ भाऊसाहेब भावे, माजी नगराध्यक्ष.

यांच्या तैलचित्र-अनावरण समारंभाचे अध्यक्ष.



माननीय नामदार बाळासाहेब देसाई,


बांधकाम मंत्री, मुंबईराज्य.



ख्रि. डॉ. वॉल्टर एफ्. ह्यूम


वांई येथील मिशन हॉस्पिटलचे प्रसिद्ध शस्त्रवैद्य. प्रत्यक्ष मानवतावादी कार्य करणारे कनवाळू डॉक्टर. आजारी माणसाचें दुःख हेंच यांचे दुःख. दीर्घ आजारानंतर एखाद्या माणसाला शारीरिक सौख्य लाभलें तर त्यांना विलक्षण आनद होई! खेडोपाडी पाश्चात्य वैद्यक व शस्त्रक्रिया यांची माहिती पोचवून खेडुतांची मनें शस्त्रक्रियेकरितां सज्ज करणें व त्यांना धीर देणें हें अत्यंत कठिण काम या "माणसानें" केलें. कांहीं वर्षें नगरपालिकेचे सभासद. सदा हंसतमुख. सभोंवार रोग्यांचा समुदाय. यांची विनोदप्रियता विशेष जाणवण्या सारखी. मराठी अस्खलित बोलत. स्वभाव आनंदी नी खेळकर. वृत्ती खिलाडू. कितीहि काम पडो; हंसत शस्त्रक्रिया करणारे व रोग्यांच्या रडणाऱ्या नातेवाइकांना हंसविणारे. यांच्या अंतिम इच्छेप्रमाणें यांची दहनक्रिया हिंदु पद्धतीप्रमाणें अमेरिकेंत केली गेली व रक्षा नगरला त्यांच्या माता-पित्यांच्या दहन-भूमीवर मध्यभागीं पुरून त्यावर पारिजातकाचें झाड लावावें ही त्यांची इच्छा, आज सफल झाली आहे.

हिरवी मळई जळां चुंबिते——




— गंगापुरी घाट —

विराट नगरीतील विराट दैवत——




— गणपती आळी घाट —

पावित्र्याच्या प्रभावळीनें मंडित झालेला



धर्मपुरी घाट

पावित्र्याची येथें वसति



ब्राह्मणशाही घाट

ठिकाणीं शिल्पकारानें आपली कला पूर्णत्वास नेऊन शिल्पकलेचा अमोल नमुना दाखविला आहे, यांत संशय नाहीं. या नंदीला लागूनच " कुंडमंडप " आहे. कुंडमडपाचे दक्षिणेस व उत्तरेस दीपमाळी अष्टकोनी चौथऱ्यावर आहेत. या दिपमाळा अंदाजें २३ फूट उंच असाव्यात. दक्षिण बाजूचे तटास लागूनच पायऱ्या असलेली एक विहीरहि आहेच. या देवालयास एकंदर १४ शिखरें आहेत. सर्वांत मोठें शिखर श्री काशिविश्वेश्वराचें आहे. उत्तरेस फरशीवर चंडीचा पुतळा आहे. श्री काशीविश्वेश्वर व श्री गजानन हीं देवालयें श्री. गणपतराव भिकाजी रास्ते यांनीं बांधलीं. हीं दोन्हीं देवालयें काळ्या पाषाणाचीं आहेत. या आळींत दक्षिणोत्तर जी सडक जाते तिचे आरंभास डाव्या हाताला श्री मारुतीचे व उजव्या हाताला श्री गोविंद रामेश्वराचें देवालय आहे हें देवालय आळींतील गोविंदराव वेलणकर यांनीं बांधलें, असें समजतें. देवालय दगडी असून गाभारा, सभामंडप व दीपमाळहि आहे. आनंदराव भिकाजी रास्ते यांचे वाड्यापासून जवळच " श्री मुरलीधराचें " देऊळ आहे. श्री मुरलीधराची मूर्ति २ फूट उंच असून ती संगमरवरी पाषाणाची आहे. या आळीचे शेवटास आपटे यांचें दत्त मंदिर आहे. हें तुळशीवृन्दावनासारखे असून चिरेबंदी आहे. याचे जवळच औदुंबर आहे. या आळींत " पाटणकरांचा बोळ " म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बोळांत पाटणकर घराण्याचा मूळ पुरुष श्रीमंत पेशव्यांचा गुरु रहात असे. म्हणून या घराण्यास श्रीमंत पेशवे यांनीं वंशपरंपरा इनाम करून दिलें आहे या घराण्यांतील कै. शंकर महादेव पाटणकर हे वांई नगरपालिकेचें पहिलें लोकनियुक्त अध्यक्ष होते.

धर्मपुरीची माहिती:– या घाटावर श्री रामेश्वराचें देऊळ, त्या समोरील नंदी, बाजूची दोन कुंडें, बदामी कुंडाचें जवळील थोरले चौकोनी कुंड, देवालयाचे पश्चिमेस सुमारें ८० फूटावर दक्षिणोत्तर असलेला बांध, या बांधापासून देवालयाचे मागें व थोरल्या कुंडांत आणून सोडलेल्या मोऱ्या, देवालयासमोरील सिंहासनापर्यंतचे पटांगण इत्यादि कामें फार मजबूत केली असून या कामास सुमारें तीस हजार रुपये खर्च लागला असावा. श्री रामेश्वराचे देवालयास लागून दक्षिण बाजूस एक " बदामी कुंड " आहे. हें कुंड व यांत आणून सोडलेली मोरी ही प्रसिद्ध मैराळ यांनीं बांधली. या घाटावर एकूण सहा कुंडें आहेत. श्री रामेश्वराचे उत्तरेस मढ्या मारुतीचा घाट व देऊळ आहे. श्री रामेश्वरापुढील साठे यांचे ६० फूट लांबीचे पटांगणास लागून सिंहासन आहे. सिंहासनाचे मागें श्री कृष्णाबाईचें देऊळ आहे. श्री कृष्णाबाईचें दगडी सिंहासन असून त्यांवर उत्सवाचेवेळीं श्रीकृष्णाबाईची मूर्ति बसते. या सिंहासनाचे उत्तरेला दगडी धर्मशाळा असून दक्षिणेस त्रिशूळेश्वराचें देऊळ आहे. दगडी धर्मशाळा, त्रिशूळेश्वर मंदिर, नरहरीचा पार हें सर्व मर्ढे येथील गोळे यांनीं बांधलें. श्री त्रिशूळेश्वराचें देवालयाचे गाभाऱ्यासमोर एक लहानसा नंदी आहे. नंदीचे मागें एक लहानसें शंकराचें देऊळ आहे. या शंकराचा बाण १'–३" अुंच असून व्यास २'–८।" आहे. एवढा मोठा बाण सर्व वांआंत कोठेंच नाहीं. नंदीचे जवळील खडकांवर स्वयंभू गणपतीच्या आकृति आहेत. यांस अष्टविनायक म्हणतात. यावरूनच पूर्वी या घाटास रविधुंडीचा घाट असें म्हणत असत. पाराजवळ एक दीपमाळ आहे. या पारापासून थोड्याच अंतरावर दक्षिणोत्तर आठ कमानींचा पूल आहे. या घाटाचे अुत्तरेस श्री. साठे यांची धर्मशाळा, श्री हरिहरेश्वराचें देऊळ, व श्री दत्तात्रयाचें देऊळ अशीं दोन देवळें आहेत. श्री हरिहरेश्वराचें देऊळ पूर्वाभिमुख असून त्या सभोंवार मजबूत तट आहे. आंतील फरशीवर गाभारा व

नंदीसह सभामंडप आहे. या देवालयाची पूजा, नैवेद्य व अुत्सव होत असतो. श्री दत्तात्रयाचें देवालय अुत्तराभिमुख असून शिखर चांगलें मजबूत आहे. श्री दत्त मूर्ति त्रिमुख असून काळ्या पाषाणाची आहे. जवळच थोड्या अंतरावर श्री नागोबा लहानशा चौथऱ्यावर आहे. या नागोबाची अुंची ३'-६॥" व रुंदी २'-३॥" आहे. हा नाग रास्ते यांनीं स्थापन केला आहे. या नागोबापासून जवळच दक्षिणेस दगडी धर्मशाळेला लागून पूर्वाभिमुख असणाऱ्या लहानशा कमानींत पंचमुखी मारुती आहे.

श्री दत्तात्रेयाचें देवालय व श्री हरिहरेश्वराचें देवालय या मधूनच घाटावर वाट जाते. श्री दत्तात्रेयाचें देवालयाचे समोरून जी वाट जाते ती वाट पुलाच्या अुत्तर टोकांस असलेल्या मोठ्या चौकांस मिळते. या चौकांतून पूर्वेस जो रस्ता जातो तो ब्राह्मणशाहींत जातो पश्चिमेस जाणारा रस्ता गणपती आळींत जातो. उत्तरेस जाणारा रस्ता धर्मपुरींत जातो. तसेंच दक्षिणेस जो रस्ता जातो तो पुलावरून मामलेदार कचेरीकडे जातो.


श्री व्यंकटेश मंदिरः— हें मंदिर नरगुंदकरीण बाईनीं बांधिलें. मंदिराजवळ पुजाऱ्यास घरही बांधून दिलें आहे. या देवाचा नवरात्रांत उत्सव चांगला होतो. या देवाचे पुजारी श्री. खरे आहेत.

श्रीराम मंदिरः— हें मंदिर पूर्वाभिमुख आहे. पूर्वी या ठिकाणीं फक्त विठोबाच होता असें म्हणतात. श्री. रामचंद्र भिकाजी रास्ते यांनीं "श्रीराम मदिर" बांधण्याच्या हेतूनें श्रीराम, लक्ष्मण, सीता व मारुती अशा मूर्ति आणविल्या. नंतर थोड्याच दिवसांत रामचंद्र भिकाजी वारल्यामुळें सदर मूर्ति रास्ते यांनीं वरील राममंदिरांतील पहिल्या मूर्ति भंगल्यामुळें त्या काढून या नव्या मूर्तिची त्या ठिकाणीं स्थापना केली. त्यावेळीं ३०-३५ खण इमारत बांधली जाऊन पुढें लवकरच श्री विठ्ठलमूर्तिजवळ एक नवी रखुमाईची मूर्ति करून बसविली. हें सर्व काम श्री. बापूभट बापट व त्यांचे एक स्नेही श्री. देशपांडे या दोघांनीं मिळून केलें.

श्री महालक्ष्मी मंदिरः— हें देवालय पश्चिमाभिमुख असून मोठें मजबूत आहे. या देवालयाचे सभोंवार मजबूत चिरेबंदी तट आहे. श्री लक्ष्मीची मूर्ति ३'-३" उंचीची आहे. ती काळ्या पाषाणाची असून चतुर्भुजा आहे. या देवालययाचे सभामंडपांत एक कारंजा आहे. श्री लक्ष्मीचे देवालयाची उंची २३'-९" असून शिवाय शिखर सुमारें ५० फूट उंच आहे. हें देवालय सुरेख काळ्या पाषाणाचें आहे. सरदार आनंदराव भिकाजी रास्ते यांनीं हें देवालय बांधलें. या देवीची पूजा, नैवेद्य, व उत्सव वगैरे खर्चासाठीं श्रीमंत पेशवे सरकार यांनीं गुळुंब हा गांव इनाम करून दिला आहे. श्री महालक्ष्मीचे पुजारी ओक आडनांवाचे आहेत. उत्सव वगैरे सर्व व्यवस्था सरदार आनंदराव भिकाजी यांचे वंशजाकडे आहे.


श्री महाविष्णूचें मंदिरः— हें देवालय पूर्वाभिमुख असून देवालयाचे दक्षिणेस राममंदिर व अुत्तरेस या देवाचे पुजारी श्री. दिवेकर यांचें घर आहे. पूर्वेस विटेची भित असून या भितीलाच मुख्य दरवाजा आहे. देवालयाचे पूर्व बाजू खेरीज बाकी सर्व बाजूस बरीच मोकळी जागा असून तुळसी, फुलझाडें व इतर निरनिराळे वृक्ष आहेत. देवालयांतील फरशीवर गाभारा, पडवी, व सभामंडप आहे. सिंहासनावर श्री महाविष्णु व लक्ष्मी आहेत. फरशीवर ११ कमानींचा दगडी सभामंडप आहे. सभामडपांत एका चौरस हौदांत कारंजा आहे. या देवालयाचे अुत्तरेस आवारांतच अेक औदुंबर वृक्ष आहे. अिशान्य कोपऱ्यांत एक

हीच ती मराठ्यांची वांई——




नाना फडणवीसांकडे घेऊन जाणारी
मेणवली वेस

बाळानों! हे तुमच्यासाठीं——



— प्रतापसिंह बालोद्यान —

इतिहासाची आठवण —



मुसलमान नागरिकांचे प्रार्थना स्थान

नलावडे घाट —



कै. काळाप्पा नलावडे
यांनीं बांधलेला

बिहीर आहे. नैऋत्य कोपऱ्यांत बापू दीक्षित जोग यांची समाधि आहे. हें देवालय सरदार आनंदराव भिकाजी रास्ते यांनीं बांधलें. या देवालयास पूजा, नैवेद्य, व उत्सव यासाठीं होणाऱ्या खर्चाकरितां श्रीमंत पेशवे सरकार यांनीं केंजळ हा गांव अिनाम करून दिला आहे.

धर्मपुरी वसविलेल्या जागेच्या खरेदी पत्रांचा सारांश— शके १६९३ आषाढ शुद्ध द्वितीया तें दिवशीं आनंदराव भिकाजी रास्ते यांसी खरेदीपत्र लिहून देणार शहासुलहसन, शहामीरशहा, कासीमशहा, अहंमदशहा, हजरतशहा, व लालशहा व।।। दाअूदशहा काजी. प्रान्त वांओ व कुडाळ. आम्हीं कर्जवाम बहुत झाले ते फेडण्याकरितां आमचा शक्कार बिबीचा बाग घेऊन कर्जमुक्त करावें असें निवेदन केलें तें तुम्हीं मान्य केलें. बाग बिघे १५ यांसी चतुःसिमा– पूर्वेस वांओ शहर, पश्चिमेस– सत्यनाथपूरी– अुत्तरेस बाग खतीपा व दक्षिणेस रस्ता व शिनगारं वेस. कबर शक्कार बीबी येणे प्रमाणें आमचे वडिलांचे कबरस्थान वजा करून बाकी जमीन आंबराअीसुद्धां रुपये ५००० घेअून खुष खरेदी दिली असे.

शक्कार बिबीची कबर श्रीराम मंदिरासमोर एका हलवायाचें दुकानांत आंतील बाजूस असून काजी यांच्या वडिलांचें कबरस्थान पागेच्या जवळ आहे

श्रीमंत आनंदराव रास्ते यांनीं काजी यांचेकडून पंधरा बिघे जमीन घेऊन श्री महाविष्णु व श्री लक्ष्मी अशी देवालयें बांधलीं. शिवाय ४८ घरें बांधून ब्राह्मणांस दान दिली. म्हणून या आळीस धर्मपुरी असें म्हणतात.

ब्राह्मणशाहीची म.हिती:– ब्राह्मणशाहीपासून पूर्वेकडील वस्ती फार जुनी आहे. या वस्तीला जूनी वांई असें म्हणतात. ब्राह्मणशाहीच्या पश्चिमेकडील सर्व वस्ती नवी आहे. ही नवी वांई सरदार रास्ते यांनीं वसविली.

ब्राह्मणशाहीचे घाटावरील देवालयें:– श्री चक्रेश्वराचें देऊळ पूर्वाभिमुख आहे. हें स्थान स्वयंभू असून थिटे यांनीं बांधिलें. या देवालयाचे उत्तर बाजूस श्री मारुतीचें देऊळ आहे. श्री चक्रेश्वराचे देवळासमोर लहानसे चिमणेश्वराचें देऊळ आहे. हें स्थान स्थापित आहे. हें देऊळ ढवळीकर यांनीं बांधलें. या देवळासमोर श्री कौतेश्वराचें देऊळ आहे. या देवळाचें मूळचें नांव हरिहरेश्वर होय. या देवळासमोर लहानशी दिपमाळ आहे.

या देवळासमोर श्री काळेश्वराचें देऊळ असून त्या देवळास सहा खांबी सभामंडप आहे. समोरच एक लहानसा नंदी आहे या देवालयाचे उत्तरेस या आळीची वेस आहे. या आळींतील घाटास लागून दोन देवालयें आहेत यांपकीं एक श्री विठ्ठलाचें देवालय असून हे पूर्वाभिमुख आहे. हें देऊळ श्रीमंत पंतसचिव यांचें आहे. ब्राह्मणशाहींतील रस्ता या देवालयाकडून गेला आहे. हें देवालय सुरेख व मोठें आहे. दुसरें देवालय श्री गजाननाचें. हें देवालय फार जुनें असून संपूर्ण दगडी आहे.

या आळींत इतर लहान लहान देवळें बरीच आहेत. तीं येणेंप्रमाणें श्री काळभैरवेश्वर, श्री मारुती, श्री बिंदुमाधव व श्री काशोविश्वेश्वर, श्री कोटेश्वर, श्री भवानी इत्यादि.

रामडोह आळीची माहिती:– या आळीचा घाट अगदी लहान आहे. या घाटावर श्री रामेश्वराचें देअूळ आहे. हे पूर्वाभिमुख असून स्वयंभू स्थान आहे. या देवालयांत दर बारा वर्षांनीं ज्या दिवशीं कन्यागत लागतें त्या दिवशीं भागीरथी येतें असें म्हणतात. ज्या जागेंतून भागीरथी निघते ती जागा चिरेबंदी शिवाय आहे. या देवालयाचे दक्षिण अंगास "रामकुंड" आहे. या कुंडावर चिलावळी देवीचें लहानसें देअूळ आहे.

श्री बाणेश्वर:– हें देवालय पश्चिमाभिमुख असून घाटावरून देवालयाकडे जाण्याचें रस्त्यावर

प्रथम एक वेस लागते या वेशींतून थोडा चढाव चढून जातांना अुजव्या हातास हें देअूळ आहे. हाच रस्ता पुढें रामडोह आळींत जातो. या श्री बाणेश्वराचे देवळासमोर एक नंदी आहे. दक्षिण बाजूला एक दीपमाळ आहे. या देवालयाच्या शिखराचें बांधकाम निराळ्या धर्तीचे आहे. या आळींत श्री म्हस्कोबाचें देअूळ असून तें लांकडी आहे. येथे पण एक दीपमाळ आहे.

रविवार पेठः— श्री भिमाशंकराचें देवालय श्री कृष्णाबाईचे कांठीं पश्चिमाभिमुख आहे. देअूळ बरेंच ठेंगणे आहे. याच्यासमोर "भिमकुंड" आहे. हें बरेंच मोठें आहे. श्री कृष्णाबाई, भिमकुंडाजवळ जरा दक्षिण वाहिनी होअून पुन्हां पूर्वेकडेच वाहते. श्री भिमाशंकराचें देवालय सातारच्या अष्ट-प्रधानापैकीं सुमंत यांनीं बांधिलें.

नलवडे घाटः— हा घाट भिमकुंड आळीचे अगदी जवळ आहे. या घाटाजवळ एक शंकराचें मंदिर आहे. हा घाट कै. काळाप्पा नलवडे यांनीं १७३० सालीं बांधला असें समजते. वांई नगरपालिका स्थापन झाल्यावर त्यावेळचे अध्यक्ष मामलेदार होते. त्यांनीं नलवडे यांचे पूर्वजांस या घाटावर प्रेतें जाळण्यास परवानगी द्यावी असें कळविलें व त्याप्रमाणें नलवडे यांनीं परवानगी दिली.

या देवालयाच्या दक्षिण बाजूस गांवाचें स्मशान आहे. अुत्तरेस लिंगायत लोकांच्या समाध्या चिरेबंदी तुळशीवृन्दावनांसारख्या बांधलेल्या असून त्यांवर पत्र्याचें अच्छादन केलेलें आहे. येथून जो रस्ता रविवार पेठेंत जातो त्या रस्त्याचे आरंभीं उजव्या बाजूला श्री विठ्ठल मंदिर आहे. हें देअूळ वांओ यथील शिंपी समाजाचें आहे.

श्री विठ्ठल मंदिरः— श्री क्षेत्र वांई येथें भिमकुंड घाटाचे नजीक हें मंदिर आहे. सदर मंदिरांत नेहमीं वारकरी सांप्रदायिक लोक भजन, कीर्तन, दिंडी समारंभ फार पुरातन काळापासून करीत असतात. या सांप्रदायाचे मूळ पुरुष नावजी आप्पा केवळे हे वाणी समाजापैकीं होते. त्यावेळीं त्यांचेबरोबर शिंपी, मराठा, माळी समाजांतील समकालीन संत त्यांचे स्नेही होते. श्री क्षेत्र पंढरपुरीं श्री नामदेव मंदिरांत आषाढ शु।। ११ च्या जागराची त्यांना संधी मिळाली. वांईकर भजनी मंडळीं हा सर्व गुरुवर्य वासकर यांचा सांप्रदाय होय. श्री नावजीआप्पा यांनीं १०० वर्षांपूर्वी जिवंत समाधि घेतली. त्याचवेळीं त्यांनीं पंढरपुरीं व आळंदीस एकाचवेळीं दर्शन दिलें, असें म्हणतात. भाद्रपद शु।। ८ रोजीं वांईकर भजनी मंडळीं हा दिवस मोठ्या प्रेमानें व आनंदानें साजरा करतात. या भजनी मंडळीस मर्ढे, सर्जापूर, कळंबे वगैरें गांवच्या लोकांचे बरेंच सहाय्य असतें. या पुण्यतिथीस त्यांचे घराण्यांतील वंशज दरवर्षी येत असतात. समाधी पूजन, आरती, प्रसाद वगैरे त्यांचे हस्तें होत असतो. मंदिराच्या दक्षिणेस १० खणी सोपा सुमारें ४५ वर्षांपूर्वी बांधला. सदरचे विठ्ठल मंदिरास श्री. शंकर विष्णू बगाडे यांचें सहाय्य व मार्गदर्शन होत असतें.

रविवार पेठ—किच-किवऱ्या ओढयापर्यंत आहे. किच-किवऱ्याचें पलिकडे एक घुमट आहे. यांत पीर मुबारकशहाचें कबरस्थान आहे. किवऱ्याचे पुलावर पूर्वेकडे तोंड करून अुभे राहिले असतां डावे बाजूस वांओ नगरपालिकेचें जकात नाकें असून त्याचे पिछाडीस तिन्ही बाजूंनीं चिरेबंदी तट असून पश्चिम बाजूस मात्र तट नाहीं. याच तटावरील नागेंत माणकशहा व रतनशहा यांची कबरस्थानें आहेत. शिवाय येथें बरीच थडगी आहेत. अुजवे हातास दक्षिणेकडे जो रस्ता जातो तो गुजरआळींतून श्री भद्रेश्वर मंदिराकडे जातो. या रस्त्याचे आरंभास अेका अुंचवटयावर पीरमहिताद

कबरस्थान असून अितरही थडगीं आहेत. किच-किच्याचें पुलापासून अंदाजे एक मैलावर एक घुमट असून तेथें शहाबीबराणीचें कबरस्थान आहे. याला "शहाबाग" म्हणतात.

रविवारपेठेंत जुम्मा मशीद आहे. ही मशीद मोठी असून वांई येथील मुसलमानांची मुख्य मशीद हीच आहे.

इदगाः– वांई येथील प्राचीन इदगा या ठिकाणीं आहे. मुसलमानीं धर्माप्रमाणें वर्षांतून दोन वेळां नमाज होत असतो. सदर इदगा विजापूरांकडून प्रतापगडावर स्वारी करणेस अफझलखान आला त्यावेळीं खुदबा सण होता. नमाज पडण्यास इदगा असावा म्हणून हा इदगा सन १६५८ सालीं गांवाबाहेर बांधला. व त्याची सनद वांईचे प्रसिद्ध काजी सय्यद शरफुद्दीन यांना दिली. ती आजतागायत चालूं आहे. त्याच वेळेस चार तालुक्यांचा काजीपणाचा हक्क त्यांना मिळाला.

कृष्णानदीचे पुलावरून जो रस्ता दक्षिणेकडे जातो तो सोनगीरवाडीकडे (ऊर्फ साकेवाडीकडे) जातो. पुलाचे कोपऱ्यावरच एक लहानसे गणपतीचें देवालय आहे. त्याचेजवळच एक नंबरची मराठी शाळा आहे. तेथूनच पुढें पश्चिमेकडे गेल्यावर सिद्धनाथवाडी आहे सिद्धनाथवाडी हें नांव पडण्याचें कारण श्री सिद्धेश्वराचें देवालयास लागूनच ही वाडी वसली असल्यानें हें नांव या वाडीस पडलें आहे. श्री सिद्धेश्वराचें देवालय पूर्वाभिमुख आहे. त्यांस तीन दरवाजे आहेत. देवालयाच उत्तरेस एक लहानसा घाट आहे. सिद्धेश्वर या देवाळयाची व्यवस्था वांईतील रविवार पेठेंतील बाकडे यांचेकडे आहे. बाकडे यांनींच रामडोह आळीचे घाटावर एक धर्मशाळा बांधली होती.

याच वाडीमध्यें रोकडोबाचें देवालय आहे. हा रोकडोबा (मारुती) श्री समर्थ रामदासस्वामी यांनीं स्थापन केल्याचे समजते. या देवालयाची व्यवस्था पिटके यांचेकडे आहे.

वांई शहरापासून आठ मैलावर पांचगणी हें थंड हवेचें ठिकाण आहे. व तेथून पुढें बारा मैलावर महाबळेश्वर हें प्रसिद्ध थंड हवेचें ठिकाण आहे. या दोनही थंड हवेच्या ठिकाणीं जाण्याचा रस्ता हा वांईतूनच जातो. त्यामुळें थंड हवेच्या ठिकाणीं जाणारें निरनिराळ्या ठिकाणचें सर्व लोक वांईस भेट देऊन मगच जातात. वांई शहर हें नैसर्गिकरित्या फारच सुंदर व टुमदार आहे. येथील हवाही चांगली आहे. बरेंच लोक वांईमध्यें एक निवांत व रम्य ठिकाण म्हणून रहातात.

वांई शहराबाबत लेडी फॉकलंड या युरोपियन बाईनें म्हटलें आहे कीं " वांईसारखी सुंदर जागा माझे पाहण्यांत नाहीं. मी पुष्कळवेळां वांईमध्यें आलें आहें. व जेव्हां जेव्हां मी येतें तेव्हां तेव्हां नवीनच शोभा दिसते येथील सृष्टीसौंदर्य फारच रमणीय आहे. व येथें मनाला आनंद देणारीं एकांत स्थळें आहेत ट्रायव्हलर्स बंगल्यामधून फार सुंदर देखावा दिसतो. " (सातारा गॅझिटियर मधून)

अशा या वांई क्षेत्रांत या नगरपालिकेची स्थापना सन १८५५ मध्यें झाली. नगरपालिकेस स्थापन होऊन शंभर वर्षें पूर्ण झालीं आहेत ही एक भाग्याची गोष्ट आहे. या नगरपालिकेची शताब्दि साजरी करून तिच्या कार्याची माहिती सर्व नागरिकांस मिळण्यासाठीं या ग्रंथामध्यें क्रमशः दिलेली आहेच.

[वांईतील घाट देवळें वगैरे बाबतची माहिती " वांई वर्णन " ले. गो. वि. आपटे या पुस्तकाचें आधारावरून]

– वांई नगरपालिका –

शत सांवत्सरिक सिंहावलोकन

१ नगरपालिकेची स्थापना:–

वांई नगरपालिकेची स्थापना दि. ५।१२।१८५५ रोजीं झाली. त्यानंतर वांई शहरास दि. ८।१।१८५६ चें सरकारी जाहीरनाम्याद्वारें १८५० चा २५ वा कायदा लागूं केला. त्या जाहीरनाम्याप्रमाणें सरकारी ४ सभासद व शहरांतील ३ सद्गृहस्थ यांच्या नेमणुका होऊन एकूण सात सभासदांचें पहिलें बोर्ड अस्तित्वांत आले, व नागरिकांच्या सुखसोयींचीं कामें सुरू झालीं.

२ वांई नगरपालिकेच्या हद्दी:–

प्रथमच सन १८७४ मध्यें नगरपालिकेच्या हद्दी ठरविल्या होत्या. हद्दीबाबतचा जाहीरनामा सरकारी गॅझेट पान ९४८ दि. १९।११।१८७४ यामध्यें प्रसिद्ध झाला होता. यामध्यें ठरविलेल्या हद्दींत त्यावेळीं सोनगीरवाडी व सिद्धनाथवाडी या दोन्ही वाडयांचा समावेश नव्हता. यानंतर ज. क. ठ. क्र. २ दि. १८।१।१८७८ च्या ठरावानें सोनगीरवाडी व सिद्धनाथवाडी या दोन्ही वाडया नगरपालिकेच्या हद्दींत सामील करून मिळाव्यात म्हणून सरकारकडे विनति करण्यांत आली. त्यानंतर १८७८ मध्यें वरील दोनहि वाडया वांई नगरपालिकेच्या हद्दींत सामील करण्यास सरकारनें संमति दिली. तेव्हांपासून वांई नगरपालिकेच्या असलेल्या हद्दी ढोबळ मानानें माहितीसाठीं खालील प्रमाणें दिल्या आहेत त्या:–

१ उत्तर:– गंगापुरीकडील बेलबागेचे पांदीपासून पुढें पूर्वेस सरळ किवरा ओढयाजवळील जरीमरीचे देवळापर्यंत.

२ पूर्व:– किवरा ओढयाजवळील जरीमरीचे देवळाचे पूर्वेकडून दक्षिणेकडे भद्रेश्वराचे देवळापर्यंत.

३ दक्षिण:– भद्रेश्वराचे देवळापासून पश्चिमेकडे सातारा-रोड नाका व रहदारी बंगल्यावरून गोशाळेपर्यंत.

४ पश्चिम:– गोशाळेपासून उत्तरेकडे पसरणी व एकसर या गांवाकडे जाणारें रस्त्याचें तोंडाजवळून पुढें सटवाई ओढयाचे हद्दीवरून बेलबागेचे पांदीपर्यंत.

३ निवडणुकीस प्रारंभ:–

सन १८५५ ते १८८५ पर्यंत सरकारी अधिकारी व सरकारनें नियुक्त केलेले गांवांतील नागरिक यांचे बोर्ड अस्तित्वांत होतें. सन १८५५ ते १८६६/६७ पर्यंत सरकारी अधिकारी चार व सरकारनें नियुक्त केलेले तीन नागरिक असें एकूण सात जणांचे बोर्ड अस्तित्वांत होतें. त्यानंतर १८६७।६८ पासून सरकारी अधिकारी चार व सरकारनें नियुक्त केलेले नऊ नागरिक असें एकूण तेरा जणांचे बोर्ड सुरू झालें. सरकारी अधिकाऱ्यांपैकीं मान. कलेक्टरसाहेब हे जनरल बॉडीचे चेअरमन म्हणून काम पहात असत. त्यानंतर १८७४ पासून पुढें मान. कलेक्टरसाहेब यांची अध्यक्ष व असि. कलेक्टरसाहेब यांची उपाध्यक्ष व मान. मामलेदारसाहेब यांची चेअरमन मॅनेजिंग कमेटी अशा नेमणुका होत असत. प्रथमच सन १८८५ पासून निवडणुकीस प्रारंभ झाला. त्यावेळीं



कै. शंकर महादेव पाटणकर, वकील.
वांई नगरपालिकेचे पहिले लोकनियुक्त अध्यक्ष– १-१०-१९१० ते ३०-९-१९१६ सहा वर्षे अध्यक्ष. पुढें १९१६ ते १९१९ पर्यंत उपाध्यक्ष. कांहीं वर्षे मॅनेजिंग कमेटीचे चेअरमन.



कै. कृष्णाजी गंगाधर अभ्यंकर, वकील.
नगरपालिकेचे सहा वर्षे अध्यक्ष व अनेक वर्षे सभासद. मॅनेजिंग कमेटी, स्कूल कमेटी व डिस्पेन्सरी कमेटीचे चेअरमन व कांहीं वर्षे उपाध्यक्ष




कै. मनोहर विष्णू काथवटे B. A. LL. B.
नगरपालिकेचे तीन वर्षे अध्यक्ष. स्कूल कमेटीचे चेअरमन. फर्स्टक्लास सब्जज्ज.




कै. केशव रावजी गोरे,

नगरपालिकेचे १९२३ ते १९२६ तीन वर्षे अध्यक्ष. सॅनिटरी कमेटीचे चेअरमन व १९२३ ते १९४० पर्यंत सभासद. कांहीं वर्षे उपाध्यक्ष.



श्री. नारायण कृष्णाजी चव्हाण,

नगरपालिकेचे १९२६ ते २९ तीन वर्षे अध्यक्ष. स्कूल कमेटीचे चेअरमन.



श्री. गणेश व्यंकटेश ढवळीकर,

नगरपालिकेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व विविध कमेट्यांचे चेअरमन. द्रविड हायस्कूल वांईचे माजी कर्तबगार मुख्याध्यापक. कन्या शाळेचे माजी मुख्याध्यापक व वांई अर्बन बँकेचे माजी चेअरमन.



श्री. मार्तंड गणेश खटावकर, B. A. LL. B.

वांई नगरपालिकेचे २५ वर्षे सभासद. मॅनेजिंग कमेटीचे ९ वर्षे चेअरमन. १९३५ते१९३८ न. पा.चे अध्यक्ष. या कारकीर्दीत न. पा. कार्यालयाची इमारत बांधणें, विजेच्या दिव्यांची सोय करणें इ. महत्त्वाचीं कामें केलीं तालुका लोकल बोर्डाचे उपाध्यक्ष व जिल्हा लोकल बोर्डाचे सभासद. द्रविड हायस्कूल, वांई गव्हर्निंग बोर्डाचे सभासद. व्यवसाय वकिली

शहरांतून ८ सभासद निवडून देणेची पद्धत सुरू झाली. याशिवाय सरकारनियुक्त आठ सभासद असत व अध्यक्ष वेगळे असत. अेकूण १७ सभासदांचें बोर्ड सन १८८५ पासून सुरू झालें. शहरांतून ८ सभासद निवडून देणेची पद्धत सन १९१९ पर्यंत चालूं होती. सरकारी ठराव नं. ७२१८ दिनांक १५।१०।१९१७ अन्वयें वांओ नगरपालिकेस २/३ सभासद निवडणेचा अधिकार मिळाला. त्यानंतर मान. कलेक्टर साहेब सातारा यांचें पत्र क्र ३५१ दिनांक २।३।१९२१ नें ४/५ सभासद निवडणेचा अधिकार मिळाला. सन १९१९ पासून नगरपालिकेंत १५ सभासदांचे बोर्ड अस्तित्वांत आलें तेव्हांपासून आतांपर्यंत १५ च सभासदांचे बोर्ड आहे. सन १९१९ ते १९२३ पर्यंत लोकनियुक्त सभासद १० असून पांच सरकार नियुक्त सभासद असत सन १९२३ पासून दि. १।१०।१९३८ पर्यंत लोकनियुक्त १२ सभासद असून सरकार नियुक्त ३ सभासद असत. १।१०।१९३८ नंतर सरकार नियुक्त सभासदपद्धति बंद झाली व संपूर्ण लोकनियुक्त सभासदांचे बोर्ड सुरू झालें. १९२३ ते १९५२ पर्यंत मुसलमानाकरितां अेक राखीव जागा ठेवणेंत आली होती. तसेंच सन १९३८ ते १९५२ पर्यंत एक जागा स्त्रियांकरितां राखीव म्हणून होती. हीच संख्या १९५२ पासून पुढें दोन करण्यांत आली आहे. हरिजनांकरितां अेक राखीव जागा सन १९३८ पासून ठेवणेंत आली आहे.

अध्यक्षांची निवड—

नगरपालिकेच्या स्थापनेपासून सन १९१० पर्यंत नगरपालिकेचे अध्यक्ष म्हणून मा. कलेक्टर साहेब हेच काम पहात या वेळपर्यंत अध्यक्षांची निवड होत नसे. त्यांची नेमणूक सरकार करीत असे. नगरपालिकेच्या स्थापनेस या वेळेपर्यंत अर्ध-शतक होअून गेले होते. नागरिकांना अर्थातच् आपण निवडून दिलेल्या सभासदांपैकीं अध्यक्ष असावा अशी जाणीव होऊं लागली. नगरपालिकेनें ठरावाचे रुपानें लोकनियुक्त सभासदांतील अध्यक्ष निवडून देणेचा अधिकार नगरपालिकेस मिळावा अशी सरकारला विनंति केली सरकारी ठराव क्रमांक ३४६८ दि. २३।७।१९१० अन्वयें नगरपालिकेस अध्यक्ष निवडून देण्याचा अधिकार मिळाला. " पहिलें लोकनियुक्त म्हणून कै. **शंकर महादेव पाटणकर वकील** " यांची निवड सन १९१० ऑक्टोबर मध्यें झाली यावेळीं सरकार नियुक्त सभासद आठ असून त्यामध्यें सरकारी बडे बडे अधिकारी असतांनाही कै. पाटणकर वकील हे नगरपालिकेचे अध्यक्ष म्हणून निवडून आले ही खरोखरच भूषणावह गोष्ट आहे. कै. पाटणकर वकील यांनीं सन १९१० ते १९१६ अखेर सहा वर्षे अध्यक्ष म्हणून कामगिरी केली.

मतदानाबाबतचे हक्क:—

सन १८८५ सालापर्यंत मतदानांचा हक्क नव्हता सन १८८५ मध्यें प्रथमच नगरपालिकेनें निवडणुक व मतदार कोणास म्हणावे यासंबंधीचे नियम केले. प्रथमतः वार्षिक तीन रुपये कर देणारास मतदानाचा हक्क मिळाला. तसेंच ज्यांची स्थावर मिळकत एक हजाराची किंवा जंगम मिळकत पंधराशें रुपयांची असेल त्यांस मतदानाचा हक्क मिळाला. यामुळें त्यावेळीं मतदारांची संख्या फक्त १०३० होती. पुढें घरपट्टी भरणाऱ्या सर्वांनाच मतदावाचा हक्क मिळाला. जशी जशी नागरिकांमध्यें लोकशाहीची ओढ वाढत गेली तशी तशी मतदारांना मिळणाऱ्या हक्कामध्यें सुधारणा होत गेली. सन १९४७ सालीं भारताला स्वातंत्र्य मिळालें व लोकशाही तत्त्वानुसार प्रत्येक २१ वर्षापुढील नागरिक मतदानाचा अधिकारी झाला.

कामकाजाची विभागणी—

कोणत्याहि संस्थेचा कारभार चालवावयाचा म्हणजे त्यासाठीं निरनिराळीं कामें निरनिराळ्या

विभागाकडे सोपवावीं लागतात. अेकच अधिकारी सर्व कारभाराकडे पाहूं शकत नाहीं. त्याचप्रमाणें नगरपालिकेचा अेकंदर कारभार अेकटे अध्यक्ष व जनरल बॉडी यांच्यावर चालविणें कठीण वाटूं लागले. त्यासाठीं निरनिराळ्या कामांची वांटणी होऊन तीं तीं कामें निरनिराळ्या स्वतंत्र कमेटयांकडे सोंपविण्यांत आलीं. कामाच्या सोयीसाठीं खालील प्रमाणें निरनिराळ्या कमेटया स्थापन झाल्या.

प्रथमतः फक्त अेकच जनरल कमेटी होती. सन १८८५ साला पर्यंत या कमेटीचें चेअरमन म्हणून मा. कलेक्टर साहेब हेच काम पहात असत. पुढें सन १८८६ पासून मॅनेजींग कमेटीची निवड करण्यांत येअूं लागली. व तिचे पहिले लोकनियुक्त चेअरमन म्हणून कै. महादेव आप्पाजी साठे यांची निवड झाली. तेव्हांपासून मॅनेजिंग कमेटीची स्वतंत्र निवड होत आहे. या नंतर पुढें दवाखान्याचें अेकंदर कामकाज पाहण्यासाठीं स्वतंत्र दवाखाना कमेटीची जरूरी भासू लागली व त्याप्रमाणें सन १८८९ पासून दवाखाना कमेटीची निवड करणेंत येत आहे. तसेंच सन १८९७-९८ पासून सॅनेटरी कमेटीची निवड करणेस सुरुवात झाली. सन १८८५ सालापासून ते सन १९२४ पर्यंत प्राथमिक शिक्षणाची व्यवस्था नगरपालिकेकडे होती. त्याची व्यवस्था पहाणेसाठीं स्वतंत्र स्कूल कमेटी सन १८८६ पासून निवडणेंत येत आहे. अद्यापि चारहि सब् कमेटया कामें करीत आहेत.

१०० वर्षांत नगरपालिकेनें केलेल्या कार्याचा धावता आढावा

नगरपालिका स्थापन झालेपासून सुमारें ५० ते ५५ वर्षेपर्यंत नगरपालिकेचा कारभार सरकारी अधिकारी पहात असले तरी शहरांत लोकहिताची कामें झालेलीं आढळून येतात. नगरपालिकेचें प्रथमतः सालीना उत्पन्न ४८००।– रुपये होते. पुढें सन १९१० सालीं नगरपालिकेचें उत्पन्न रुपये १४५९०।– पर्यंत वाढले या वेळपर्यंत नगरपालिकेनें घरपट्टी, स्पेशल सॅनिटरी सेस्, जनरल सॅनेटरी सेस्, जकात, व्हील व टोलटॅक्स, गुरांचे विक्रीवरील कर अशा प्रकारचे कर बसविले होते. वरील करांपासून सरासरी उत्पन्न सालीना १२०००।– रुपयापर्यंत येत असे या मुदतींत नगरपालिका मुख्यतः रस्ते दुरुस्ती, दवाखाना, साफसफाई, दिवे लावणें वगैरे कामें करीत असे सन १८५६ ते सन १९१० पर्यंत उल्लेखनीय कामें म्हणजे सन १८६०-६१ मध्यें नगरपालिकेनें कृष्णाओढ्यावर पूल (हल्लीचे राजेबाक्सर नाक्याजवळील) बांधला व दुसरा पूल गंगापुरी मेणवली वेसीबाहेरील बाजूस खांबोळा ओढ्यावर बांधला या कामासाठीं न पा नें रुपये ५१००।– खर्च केला. सार्वजनिक संडास सुमारें तीस बांधणेंत आले नगरपालिकेच्या दवाखान्याचे इमारतीकरितां स्वतंत्र इमारत खरेदी केली. शहरांतील मुख्य रस्ते उत्तम प्रतीचें नवीन करणेंत आले. गंगापुरी घाटावर पाण्याचा ओघ अडवून सांठा योग्य प्रकारें व्हावा म्हणून ताल बांधणेंत आली. जकात नाकीं तीन बांधणेंत आली. आठवडयाच्या बाजाराकरितां स्वतंत्र जागा खरेदी केली. हल्लीं या जागेस " दाणेबाजार " म्हणून – संबोधण्यांत येते. याठिकाणीं पूर्वी हरेश्वराची बाग होती. ही सर्व जागा हरी चितामण रास्ते यांची होती. ती सर्व जागा बाजाराकरितां त्यांचेकडून वार्षिक २० रुपये भाडें देऊन घेतली. दिनांक ४-२-१८८४ सोमवारपासून येथें आठवडयाचा बाजार भरत आहे. पूर्वीं यांस 'हरेश्वराचा बाजार' असें संबोधण्यांत येत होतें. पुढें ही जागा अक्तायर




कै. धोंडो गणेश दामले
नगरपालिकेचे सभासद व स्कूल
कमेटीचे चेअरमन




श्री. भा. मा. ऊर्फ बाळासाहेब साठे
नगरपालिकेचे सभासद. मॅनेजिंग कमेटी चेअरमन.
वांईतील प्रमुख सार्वजनिक कार्यकर्ते. वांई टिळक
स्मारक संस्थेचे संस्थापक.



श्री. म. स. जोग S. T. C.
नगरपालिकेचे सभासद १९४१ ते १९४४.
वांई व्यायाम शाळेचे सेक्रेटरी.
अध्यापक द्र हा. वांई.



श्री. व्यंकटेश दत्तात्रय देशपांडे, वकील.
१९३८ ते १९५२ नगरपालिकेचे सभासद.
डिस्पेन्सरी कमेटी व स्कूल कमेटीचे
चेअरमन




श्री. श्री. श्री. पंडित, B. A. LL. B, B. T.
नगरपालिकेचे सभासद व डिस्पेन्सरी कमेटीचे चेअरमन. द्र. हा. वांईमध्यें अध्यापक.

श्री. पां. वा. नातू, B. A. B. T.
नगरपालिकेचे सभासद. उपाध्यक्ष व स्कूल कमेटीचे चेअरमन. द्रविड हायस्कूलचे उप-मुख्याध्यापक.




श्री. ज. नि. अभ्यंकर, B. A. LL. B.
नगरपालिकेचे कायदेशीर सल्लागार. टिळक ग्रंथसंग्रहालयाचे सेक्रेटरी. कंझ्युमर्स को-ऑ. सोसायटीचे सेक्रेटरी. वांईतील प्रमुख वकील.




श्री. शंकर दगडू जेजुरीकर
नगरपालिकेचे तीन वर्षे सभासद. होमगार्ड कमांडंट. ब्राह्मसमाजाचे कार्यकर्ते. वांई ता. कॉंग्रेस कमेटीचे माजी अध्यक्ष. सार्वजनिक कार्यकर्ते.


वांअी नगरपालिकेच्या दाणेबाजारांतील चाळी



चाळ क्रमांक १



चाळ क्रमांक २



चाळ क्रमांक ३

मान. रा. ना. ऊर्फ भाऊसाहेब भावे,

B. A. LL. B. वकील.



— वांई शहराचे शिल्पकार —

वांई शहराची सर्वांगीण सुधारणा करण्याचें महत्वपूर्ण कार्य यांनीं केलें आहे. सन १९४१ पासून १९५६ अखेर पर्यंत वॉर्ड क्र. १ मधून सतत निवडून येत असत. या सर्व मुदतींत (१६ वर्षे) त्यांनीं अध्यक्ष म्हणूनच काम केलें हे विशेष होय. १९४१ ते १९५६ या मुदतींत त्यांनीं केलेल्या महत्वाच्या सुधारणांचा परिचय या ग्रंथामध्यें स्वतंत्र दिला आहेच. १९४१ ते १९४७ पर्यंत सहा वर्षे जिल्हा स्कूल बोर्डाचे चेअरमन म्हणून त्यांनी प्रशंसनीय कार्य केलें आहे. १९३५ ते १९४७ डिस्ट्रिक्ट लोकल बोर्डाचे सभासद याशिवाय वांईतील विविध संस्थामधून कार्य केलें आहे. वांईतील ख्यातनाम वकील व अभ्यासशील, प्रभावी वक्ते.

सन १९५२ ते १९५८ एप्रिल पर्यंत, मुंबई लेजिस्लेटिव्ह कौन्सिलचे सभासद. शहराचे "टाऊन प्लॅनिंग" करण्याबाबतच्या यांच्या विशिष्ट कल्पना आहेत व त्याबाबतचे आपले विचार त्यांनीं मुंबईस अधिवेशनाचेवेळीं सभागृहासमोर मांडले होते. त्यांवर त्यावेळचे स्थानिक स्वराज्यमंत्री ना. यशवन्तरावजी चव्हाण यांनीं सभागृहापुढें प्रशंसा करून असे उद्‌गार काढले की, "टाऊन प्लॅनिंगचें कार्य जर प्रत्यक्ष पहावयाचे असेल तर आपण एकदां वांई नगरपालिकेनें केलेल्या सुधारणा अवश्य पहा !"

करण्यांत आली.

यापुढेहि नगरपालिकेनें सन १९१० ते १९४० पर्यंत लोकहिताचीं खूप कामें केलीं. नगरपालिकेनें आपल्या उत्पन्नांतहि वाढ केली. व सन १९४० सालीं नगरपालिकेचें उत्पन्न रुपये ४८९०० झालें. सन १९१० सालीं हेंच उत्पन्न १४५९० रुपये होते. नगरपालिकेच्या कामाचा व्याप सारखा वाढत होता. प्रतिवर्षी रस्ते दुरुस्त करणेंत येत असत. याशिवाय सन १९२४ सालीं वांई शहराची प्रथम सिटीसर्व्हे करण्यांत आली. या कामास प्रत्यक्ष सुरुवात दि. १२।१०।१९२३ रोजीं झाली. व सर्व काम दि. ६ ८।१९२४ अखेर पूर्ण झालें. यावेळीं वाई शहरांतील सर्व मिळकतीची मोजणी होऊन शहराचे नकाशे तयार करण्यांत आले. त्यावेळीं एकूण ५०३२ मिळकती होत्या. यावेळीं सर्व घरमालकांचें मिळकतीचे हक्कांची चौकशी होऊन त्यांना हक्काच्या सनदा देण्यांत आल्या. सनदेची फी म्हणून एकूण रुपये ९५५६ – इतकी रक्कम मिळाली. व या कामासाठीं एकूण रुपये ९११० – खर्च आला. माननीय **मार्तंड गणेश खटावकर** हे अध्यक्ष असतांना नगरपालिकेच्या कार्यालयाची सोईस्कर अशी इमारत सन १९३५ मध्यें बांधणेंत आली. त्यासाठीं सुमारें १४०००।– रुपये खर्च आला. याचवर्षी नगरपालिकेचे दवाखान्यासाठीं स्वतंत्र इमारत बांधणेंत आली. तसेंच प्रथमतः वाई शहरामध्यें सन १९३७ पर्यंत रस्त्यावर रॉकेलचे दिवे लावणेंत येत असत. अगदीं प्रथम म्हणजे सन १८५९ मध्यें रस्त्यांवर फक्त ४० दिवे होते; व हीच संख्या सन १९३७ सालांत सुमारें तीनशेंच्यावर गेली. १९३७ सालापासून रस्त्यांवरील दिवे विजेचे लावण्यास सुरुवात झाली.

आतांपर्यंत आपण नगरपालिकेच्या कार्याचा सन १९४० पर्यंतचा धावता आढावा पाहिला. सन १९४१ सालापासून नगरपालिकेच्या एकंदर कार्याला वेगळेच वळण लागलें. सन १९४१ सालीं झालेल्या निवडणुकींत मान. **रा. ना. ऊर्फ भाऊसाहेब भावे** B. A. LL. B हे प्रथमच नगरपालिकेच्या वार्ड क्रमांक १ मधून निवडून आले व त्याच वर्षीं त्यांची नगरपालिकेचें अध्यक्ष म्हणून निवड झाली. तेव्हांपासून सन १९५६ सालापर्यंत सतत सोळा वर्षें नगरपालिकेचे अध्यक्ष म्हणून ते निवडून येत असत. अुल्लेखनीय गोष्ट म्हणजे अखंड सोळा वर्षें न. पा. चे अध्यक्ष म्हणून काम करण्याचा मान माननीय भाअूसाहेब भावे यांनाच मिळाला आहे. यावरून वांअीकर नागरिकांना त्यांच्याविषयीं वाटणारा आदर व विश्वास दिसून येतो. मान. भाअूसाहेब भावे यांनीं सन १९४१ ते १९५६ पर्यंतच्या काळांत वांअी शहराची जी सर्वांगीण सुधारणा केली, त्याची क्रमशः माहिती यापुढें दिलेलीच आहे. त्यांच्या या दीर्घ मुदतीच्या कारकीर्दीत त्यांच्या बरोबरच निवडून आलेल्या सभासदांनींहि त्यांना प्रत्येक बाबतींत सहकार्य दिलेलें आहे. कोणत्याहि बाबतींत सभासदांमध्यें पक्षोपक्षांचे भेद, तंटे वगैरे कधींही नव्हते. सर्व काम एक विचारें होत होतें; असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. मान. भाऊसाहेब भावे यांनीं वांअी शहराची सुधारणा करून नागरिकांना हरतऱ्हेच्या सुखसोयी अुपलब्ध करून देण्याचा सतत प्रयत्न केला. न. पा. चे कामाबाबत त्यांना एवढी तळमळ असें कीं, ते स्वतःचे खाजगी काम, मग ते कितीही महत्वाचें असो तें बाजूला ठेअून प्रथम नगरपालिकेचें काम पूर्ण करण्याकडे अधिक लक्ष देत असत. न. पा.चे रस्त्याचे, अिमारतीचे वगैरे कोणतेहि काम असो मान. भाअूसाहेब भावे हे स्वतः जातीनें अुपस्थित राहून कामावर लक्ष देत असत. सन १९५२ सालीं मुंबअी विधान परिषदेवर स्थानिक स्वराज्य संस्थांतर्फे M. L. C. म्हणून त्यांची निवड झाली.

ही वांओ नगरपालिकेच्या दृष्टीनें उल्लेखनीय गोष्ट होय.

सन १९४१ सालीं न.पा. चें उत्पन्न ६३६९७ रु. होते. तें सन १९५६ सालीं २,३०,२४७ रुपये पर्यंत वाढविणेंत आलें. या मुदतींत सरकारकडूनहि मदतीमध्यें थोडी थोडी वाढ होत गेली. सरकारच्या सूचनावरून करांचीहि वाढ करण्यांत आली. सांपत्तिक स्थितीमध्यें प्रतिवर्षी वाढ होत गेल्यानें नगरपालिकेस लोकहिताचीं कामें करण्याकडे बरेंच लक्ष पुरवितां आलें. वरील मुदतीमध्यें केलेल्या कामांचा अल्पपरिचय पुढें देण्यांत आला आहे. सन १९४० सालीं दुसरें महायुद्ध सुरू झालें व त्यामुळें सर्व जिनसांचे बाजारभाव एकसारखें वाढूं लागले. महागाईमुळें नोकरवर्गाला महागाई भत्ता देणें आवश्यक वाटूं लागले. नगरपालिकेस महागाईमुळें आपला दैनंदिन कारभार करणेंही फार कठीण वाटूं लागले. तरीही कच न खातां नगरपालिकेनें शक्य त्या त्या मार्गांनीं आपलें उत्पन्न वाढविलें व सरकारकडून शक्यतों मदतही मिळविली; व जेवढ्या आवश्यक त्या त्या सुधारणा करून लोकहिताचीं खूपच कामें केलीं. ती–

शहरांतील रस्ते रुंद करणें—


वांओ शहरांतील बहुतेक सर्व रस्ते अत्यंत अरुंद होते. शहरांतील सर्व मालांची बहातूक ट्रक्स वगैरे मधून होऊं लागली. मोटार ट्रक्सची वहातूकहि वाढूं लागली. गांवांतील व्यापार वाढला त्या दृष्टीनें अरुद रस्त्यांतून वहातुकीस त्रास होऊं लागला. तसेंच शहराचे आरोग्याचे दृष्टीनें अरुंद रस्ते असणें उचित नव्हते. म्हणून शहरांतील जास्तींत जास्त स्ते रुंद कसें करतां येतील याबाबत विचार सुरू झाला. व रस्ते रुंदीचे नकाशे तयार करण्यांत आले. रस्ते रुंद करावयाचे म्हणजे नागरिकांची घराची जागा रस्त्याकरितां म्हणून घेणें क्रमप्राप्त झालें. रस्ता रुंदीसाठीं वांईतील सुमारें दोन तृतियांश नागरिकांनीं नगरपालिकेस खाजगीरित्या आपल्या घरांच्या जागा देणेस खुषीनें संमति दिली व त्याप्रमाणें त्यांनीं आपल्या जागा खुषीनें दिल्या ही विशेष उल्लेखनीय गोष्ट आहे. राहिलेल्या एक तृतियांश नागरिकांनीं रस्त्यासाठीं खाजगी रितीनें जागा देण्यास संमति दिली नाहीं. व त्यासाठीं नगरपालिकेस त्यांच्या जागा सरकार मार्फत अक्वायर करून घ्याव्या लागल्या. सन १९४१-४२ ते ५५-५६ अखेर खालील रस्ते रुंद करण्यांत आले.

१ प्रॉव्हिन्शिअल रोड (शिवाजी रोड)
२ बागडे बोळ.
३ शमीचा बोळ.
४ कोटेश्वर रस्ता.
५ गणेश रोड.
६ कृष्णा पुलाचे उत्तरेकडचा भाग.
७ रास्ते वाडचावरून दक्षिणेकडे जाणारा गणपतीआळी रस्ता.
८ रविवार पेठ, चावडीसमोरील रस्ता.
९ पुलापासून ब्राह्मणशाहीमधून रविवार पेठ जुम्मा मशिदीकडे जाणारा रस्ता – संपूर्ण नवीन.
१० किवरा नाल्यास कॉजवे बांधला.

रस्ते नुसतेच रुंद करूनही भागण्यासारखे नव्हते. सर्व रस्ते दुरुस्त करून ते नेहमीं चांगल्या स्थितींत ठेवणेंही अत्यंत जरुरीचें आहे. या दृष्टीनें रस्त्यासाठीं जागा घेतल्यावर त्या ठिकाणीं रस्ते रुंद करून गटारें बांधली. सन १९५१-५२ सालीं शहरांतील मुख्य बाजारपेठेचे सर्व रस्ते १" कार्पेटचे डांबरी केले. त्यासाठीं सुमारें २४,४४६ रुपये खर्च आला. याच सालीं कृष्णापुलाचे उत्तर टोंक रुंद केलें. त्यासाठीं बांधलेल्या रिटेनिंग वॉलला रुपये ३५९७।– खर्च आला.


नगरपालिकेच्या ताब्यांत असलेली दाणेबाजारची भव्य व मध्यवर्ती अशी जागा आहे.

दीन रुग्णाइतांचें आश्रयस्थान—




नगरपालिकेचा दवाखाना

वांओतील निम्याहून अधिक शेतकरी ज्याचा उपयोग करतात तो नगरपालिकेचा किवरानाला कॉजवे. याचा उपयोग वांई, परखंदी, शेंदुरजणें, वाडचा इत्यादिना विशेष होतो.



किवरानाला कॉजवे




श्री. गेनू बाळा हेरकळ

सन १९४१ ते १९५६ अखर नगरपालिकेचे सभासद. या मुदतीत मॅनेजिंग व सॅनिटरी कमेट्यांचे चेअरमन म्हणून काम पाहिलें. तळमळीचे सामाजिक काँग्रेस कार्यकर्ते.



श्री. रामभाऊ गणू गोळे

नगरपालिकेचे १९४१ ते १९५६ अखेर सभासद. या मुदतीत मॅनेजिंग, सॅनिटरी व दवाखाना कमेट्यांचे चेअरमन म्हणून काम पाहिलें. सामाजिक कार्यकर्ते.



श्री. महादेव गोविंद काळे

सुमारें २० वर्षे नगरपालिकेचे सभासद. या मुदतीत त्यांनीं नगरपालिकेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व मॅनेजिंग, सॅनिटरी वगैरे कमेट्यांचे चेअरमन म्हणून काम पाहिलें. सध्या अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेचे चेअरमन म्हणून काम पहात आहेत. सामाजिक कार्याची आवड अनेक संस्थांमधून कामें केलीं आहेत.

या ठिकाणचे रस्ते बाजाराचे सोयीप्रमाणें अगदीं मोठें व रुंद आहेत. याठिकाणीं चौफेर दगडी फूटपाथ बांधणेंत आले आहेत. व बाजाराची जागा आखीव अशी तयार केली. या फूटपाथवर काँक्रीट टाकणें खर्चाचे अभावी करणें अशक्य होतें. येथून पुढें सर्व फूटपाथवर सिमेंट काँक्रीट टाकणेंत येईल. पुढे सन १९५४-५५ मध्येंही शहरांतील मुख्य रस्ते डांबरी करण्यांत आले. त्यासाठीं सुमारें रुपये २२,००० खर्च करण्यांत आला.

अेक नवीन उपक्रमः–

सन १९५०-५१ पर्यंत रस्त्याचे कडेस झाडें लावलीं नव्हतीं. शहरांतील बहुतेक रस्ते रुंद व डांबरी व खडीचे असें करण्यांत आले. शहराचे सौंदर्यांत भर टाकण्याचे दृष्टीनें रस्त्यांकडेस शक्य तेथें झाडें लावणें आवश्यक वाटलें. त्याप्रमाणें सुमारें १५० झाडें रस्त्याचे कडेस लावली. त्यांची नासधूस होऊं नये व ती चांगली टिकावीत म्हणून सर्व झाडांना कांटेरी तारांचें कुंपण करणेंत आलें. विशेष उल्लेखनीय गोष्ट म्हणजे हीं सर्व झाडें उत्तम प्रकारें निगा राखून जगविलीं आहेत आतां सर्व झाडें उत्तम तऱ्हेनें वाढीस लागली असून शहराच्या सौंदर्यांत भर घालीत आहेत, आणि पांथस्थांस शीतल छाया देत आहेत.

कृष्णा कॅनलायझेशन स्कीमः–

वांअी शहराचे मधूनच कृष्णा नदी वहात आहे. नदीचे उत्तर बाजूस घाट व खूप देवळें बांधलेलीच आहेत. परंतु नदीच्या दक्षिण बाजूस कोणत्याच प्रकारचें बांधकाम केलेलें नव्हतें व त्या ठिकाणीं मोठमोठें खांच खळगे होते. सदरच्या खांचखळग्यांतून पावसाचें पाणी सांठत असे, व तो भाग डांस वगैरे होअून अत्यंत घाण होत असे. नदीचें पाणी पिण्यासाठीं वापरणारा फार मोठा वर्ग वांअीत आहे. आरोग्य दृष्टचा नदीच्या प्रवाहा शेजारीच डबकी वगैरे अितर घाण असणें अत्यंत वाईट होय. नदीचें पाणी स्वच्छ रहावें या दृष्टीनें एक "कृष्णा कॅनलायझेशन स्कीम" ही योजना तयार करण्यांत आली. या योजनेचा मुख्य उद्देश नदीचा प्रवाह मर्यादित भागांतून नेहमीं वहात जावा असा होता. कृष्णा कॅनलायझेशन स्कीमचा नकाशा त्यावेळचे नगरपालिकेचे चिटणीस श्री. श्री. द. माजगांवकर यांनीं अत्यंत परिश्रम घेअून तयार केला. तसेंच त्या योजनेस किती खर्च येईल त्याचें अंदाजपत्रकही तयार केलें. नदीचे दक्षिण बाजूस प्रवाहाकरितां ठराविक पात्र ठेअून एक बंधारा बांधणें व उत्तर बाजूस ज्या ठिकाणीं घाट बांधलेले नाहींत अशा ठिकाणींही बंधारा बांधणें, प्रवाहाच्या बाहेरील सर्व मोकळचा जागांतून डबर वाळूची भर घालून खांच खळगे बुजविणें व त्यांवर हिरवळ लावणें. या सर्व कामांचें खर्चाचें अंदाजपत्रक सुमारें ३७,४४२ रुपयांचे झालें. तेवढचा मोठचा रकमेचें काम हातीं घेणें नगरपालिकेस शक्य नव्हते, म्हणून या कामीं सरकारी मदत मिळविणेचा प्रयत्न करण्यांत आला. सरकारचे मा. पब्लिकहेल्थ अिंजिनिअर यांनीं या योजनेची पहाणी केली व ह्या योजनेचें काम हें आरोग्य दृष्टचा अत्यंत महत्वाचें आहे व या कामीं सरकारनें नगरपाळिकेस ५०% मदत द्यावी अशी शिफारसही केली. सरकारनेंही कामाचें महत्व व जरूरी लक्षांत घेअून ५०% मदत मंजूर केली. सन १९५०।५१ ते १९५५।५६ या सालांत दरवर्षीं खर्चाची रक्कम लक्षांत घेऊन सदर योजनेचे बहुतेक सर्व काम पूर्ण करण्यांत आले. या कामांस अंदाजें ३८,००० रु.

खर्च करण्यांत आला व सरकारकडून मदत म्हणून सुमारें १९,००० रु. मिळाले. याच कामावरून कृष्णा नदींत सिद्धेश्वर मंदिराजवळ, येवले थिएटर जवळ, व ब्राह्मणशाही काळेश्वर मंदिराजवळ असें एकूण तीन कॉजवे बांधणेंत आले. यांचा उपयोग सर्व नागरिकांस पावसाळचा शिवाय इतर सर्व वेळीं खूपच होतो. या स्कीमचें काम श्री. अ. वा. विद्वांस, चिटणीस न. पा. वांई यांचे देखरेखीखालीं झालें. हिरवळ लावणेचें काम करणेचें राहिलें आहे. तें काम नगरपालिका पूर्ण करणार आहे. बदीस दक्षिण बाजूच्या सर्व भागांवर हिरवळ लावून झाल्यावर बालकांना खेळण्यास त्याचा विशेष उपयोग होईल हें निश्चित.

पाणघाट:-

गंगापुरीचे पश्चिमेकडे गांवठाण भाग नावेची वाडी म्हणून आहे. तेथील नागरिकांचे सोयीसाठीं त्या भागांतील नदी कांठांस एक छोटासा पाणघाट बांधला. हल्लीं त्याचा उपयोग होत असतो. त्याचप्रमाणें रविवार पेठ भागांत हरिजनांसाठींहि एक पाणघाट बांधणेंत आला आहे शिवाय इतर पाणघाटांच्या आवश्यक त्या त्या दुरुस्त्या करण्यांत आल्या.

सार्वजनिक उद्यानें:-

नगरपालिकेनें सार्वजनिक एक दोन उद्यानें तयार करावीत अशा तऱ्हेच्या सरकारी सूचना येत असत. नागरिकांना विश्रांतिस्थान म्हणून व शहराचे सौंदर्य वाढीचे दृष्टीनें शहरास आधुनिक पद्धतीची उद्यानें असणें आवश्यक वाटलें. उद्यानासाठीं जागा पसंत करतांना गलिच्छ असलेला भागहि चांगला व्हावा अशी कल्पना पुढें होती. त्या दृष्टीनें ब्राह्मणशाही व रामडोह आळीच्या घाटाच्या उत्तरेकडील जागा पसंत केल्या. पसंत केलेल्या नियोजित उद्यानाच्या जागा म्हणजे नुसती मोकळी आवाडें व खिडारें होतीं व हा सर्व भाग अत्यंत गलिच्छ होता. सदर जागांचें मालकहि परगांवीं होते. त्या जागा मिळविण्यासाठीं खूपच प्रयत्न करणेंत आले. सुमारें ३/४ जागांच्या मालकांनीं खाजगीरीत्या नगरपालिकेस जागा दिल्या. राहिलेल्या १/४ जागा सरकार मार्फत अक्वायर करून घ्याव्या लागल्या. नंतर २-३ वर्षांमध्यें सदर जागामधील खांचखळगें वगैरे भरून घेतले. जागा लेव्हल करून घेतली. निरनिराळचा ठिकाणीं आवश्यक तेथें भिती बांधून घेतल्या. बागेचे एकंदर तीन टप्पे करण्यांत आले आहेत. नंतर जागेचे निरनिराळे विभाग पाडून पुढें निरनिराळीं झाडें, फुलझाडें लावणेंत आलीं. माळघाकरितां क्वॉर्टरहि बांधण्यांत आलीं. अशाप्रकारें तयार करण्यांत आलेल्या उद्यानाचें उद्घाटन सन १९५६ च्या फेब्रुवारीमध्यें "श्री छत्रपती शिवाजी उद्यान" हें नामाभिधान देऊन सातारा नगरपालिकेचे माजी अध्यक्ष श्री. राजाभाऊ पालकर यांचे हस्तें करणेंत आलें सदर उद्यान तयार होण्यामध्यें नागरिकांचें सहाय्य फार मोठें आहे. कारण बऱ्याच नागरिकांनीं आपल्या जागा नगरपालिकेस खुषीनें दिल्या. व ज्या भागांतून जाण्यास नागरिकांना भीति वाटत असें अशा भागाचें आतां हिरव्या राओंत रुपांतर झालें.

याच छत्रपती उद्यानाचें उत्तर बाजूस बालकांचेसाठीं एक क्रीडांगण करण्यांत आलें आहे. क्रीडांगणासाठींहि तेथील नागरिकांनीं आपल्या जागा नगरपालिकेस दिल्या. व कांहीं सरकारमार्फत अक्वायर करून घ्याव्या लागल्या सदर क्रीडांगणाच्या जागाहीं अत्यंत गलिच्छ होत्या. त्या सर्व लेव्हल करून घेऊन त्यावर हिरवळ लाऊन घेतली. बालकांना खेळण्यासाठीं घसरगुंडी, सी सॉ वगैरें खेळण्यांचीं साधनें बसविण्यांत आलीं.

प्रतापसिंह बालोद्यान:-

गणपती आळीमध्यें नदीचे कांठावर स्त्रिया व लहान मुलें यांच्याकरितां एक छोटीशी बाग तयार करण्यांत आली आहे. या बागेमधून गणपती

घाटाचा व नदीचा भव्य देखावा व नदीचें नैसर्गिक सौंदर्य मनोहर दिसते. या बागेचें क्षेत्र १०४६४ चौरस फूट आहे. या बागेमध्येंहि मुलांना खेळण्यासाठीं घसरगुंड्या, झोपाळे, सी साँ वगैरें खेळण्याचीं साधनें बसविणेंची आहेत. ती बसविलीं जातील.

भाजी मार्केट:—

वांई तालुका हा बागायत तालुका असून त्या ठिकाणीं भाजीपाल्याचें उत्पन्न फार मोठें आहे व येथील भाजी व फळफळावळ वगैरे जिन्नस येथून पांचगणी, महाबळेश्वर, पोलादपूर, महाड, चिपळूण, खेड व मुंबई येथें रवाना होतात. व त्या ठिकाणचे व्यापारी आठवड्यांतून दोन वेळां रविवार व बुधवार या दोन दिवशीं येथील भाजीपाला खरेदी करण्यासाठीं येत असतात.

वांई शहरांत भाजी मार्केटसाठीं बांधलेली अशी इमारत नव्हती. भाजी विक्री करण्यासाठीं सर्व विक्रेत्यांना उघड्यावर बसावें लागत असें. रस्त्यांवरील घाण, धूळ इत्यादि भाजीपाल्यावर बसे. पावसाळ्यांत तर भाजी विक्रेते व ग्राहक या दोघांनाही अतिशय त्रास होत होता. भाजी व फळफळावळ अशा वस्तू स्वच्छ व आरोग्यदायक रहाणेसाठीं एक बंदिस्त इमारत असणें आवश्यक वाटलेवरून भाजी मंडअीस सोयीची अशी इमारत बांधण्याचा विचार सुरू झाला. सदर अिमारतीचे प्लॅन्स व एस्टीमेट्स् तयार करण्यांत आलें व तें पसंत करून इमारत बांधण्याचें ठरलें. नगरपालिकेस त्यावेळीं एवढीं मोठी इमारत बांधता येणें शक्य नव्हतें व इमारतीची तर अत्यंत गरज होती. यासाठीं सरकारच्या मंजुरीनें कर्ज काढणेंत आलें व इमारत बांधणेंत आली. या इमारतीचा आतां आरोग्यादि दृष्टीनें चांगला उपयोग होत आहे.

भाजी मार्केटसाठीं इमारत बांधली पण तीहि जागा अपुरी पडूं लागली म्हणून भाजी मार्केट पुढील मोकळ्या जागेंत सिमेंटचे ओटे सन १९५५।५६ मध्यें बांधलें. याचाही वरील दृष्टिकोनांतून चांगला उपयोग होत आहे.

दाणेबाजार दुकानें—

वांअी शहरांतील व्यापारांत दिवसेंदिवस वाढ होत चालली. धान्य व इतर मालाची आवक वाढली. व्यापारी लोकांना त्यांनीं आणलेला माल स्टोअर करून ठेवण्यास जागाहि नव्हत्या व अशा तऱ्हेच्या दुकानांसारख्या स्टोअर रुम्सची आवश्यकता भासूं लागली या दृष्टीनें व्यापारी लोकांना आपले कडील माल ठेवणें सोईचे व्हावें म्हणून कांहीं स्टोअर रुम्स असाव्यात म्हणून नगरपालिकेनें दाणेबाजारांतील मोकळ्या जागेमध्यें दुकानें बांधण्याचा विचार सुरू केला व त्याप्रमाणें सन १९५४।५५ मध्यें दाणेबाजारांत एकूण तीन चाळी बांधल्या. त्यामध्यें एकूण २३ दुकानें आहेत. यासाठीं नगरपालिकेस सुमारें रुपये ३६,००० खर्च आला. सदरची सर्व दुकानें पहिल्या वर्षी सर्वच्यासर्व भाड्यानें गेलीं. व भाड्याचें उत्पन्न ३६७२ रुपये आलें. प्रतिवर्षी दुकानांची मागणी वाढतच आहे; व वांई नगरपालिकेनें आणखी कांहीं दुकानें बांधल्यास त्यांत खचितच फायदा होईल, असें वाटतें. तसेंच आणखी कांहीं दुकानें बांधण्याचा विचार चालूं आहे.

आरोग्य रक्षणाचे कामांत सुधारणा:—

नगरपालिकेस शहराचे सार्वजनिक आरोग्य उत्तम तऱ्हेनें राखण्याचें अत्यंत महत्वाचें कार्य सांभाळावें लागते. या कामांतील एक महत्वाचें काम म्हणजे शहरांतील सर्व संडास स्वच्छ ठेवणें, मैल्याची अखेरची विल्हेवाट लावणें हें होय. सन १९५४-५५ पर्यंत मैला वहातुकीचें काम बैलगाडींतून होत असें. बैलगाडीमुळें वहातुकीचें कामास विलंब लागत असें, व कामहि व्यवस्थित होत नसें. सकाळचे वेळीं एकंदर दृश्यहि गलिच्छ

दिसत असें. यांमध्यें सुधारणा करणें अत्यंत आवश्यक वाटलें, व वहातुकीकरितां एक आधुनिक पद्धतीची मोटार घेण्याचा विचार आला, व त्याप्रमाणें एक मोटार सन १९५४-५५ मध्यें खरेदी करण्यांत आली. तेव्हांपासून हें काम जास्त चांगल्या प्रकारें होत असल्याचें अनुभवास आलें. या मोटारीकरितां एक स्वतंत्र गॅरेजही बांधण्यांत आलें आहे.

सन १९४७-४८ सालापर्यंत गांवांतील कचरा वहातूक करणेंसाठीं नगरपालिकेजवळ एकच मोटार होती. ही मोटार सन १९३५ सालांतील असलेमुळें वरचेवर बद पडत असे तींमधून मोठचा प्रमाणावर कचरा नेतां येत नसे. त्यामुळें गांवांत कचरा जास्त सांठत होता व ते आरोग्यास हानिकारक होते. या दृष्टीनें या कामामध्यें सुधारणा व्हावी म्हणून एक स्वतंत्र मोठी मोटार सन १९४८-४९ सालीं खरेदी करण्यांत आली ; व तिचा चांगला उपयोग होत आहे

गगापुरी भागांत ४ व दाणेबाजारांत ४ सार्वजनिक संडास बांधणेंत आले. या भागांतील लोकांना त्यांचा चांगला उपयोग होत आहे.

सन १९५४-५५ पासून नगरपालिकेचा एकंदर कामाचा व्याप फारच वाढला. त्याजबरोबर नोकरवर्गहि वाढला. नगरपालिकेची हल्लीं असलेली कार्यालयाची इमारत ही नोकरवर्गास व नगरपालिकेच्या निरनिराळचा सभांना अपुरी पडूं लागली. या अडचणींतून मार्ग म्हणून सभागृहासाठीं एक स्वतंत्र हॉल बांधावा असा विचार आला. या वेळपर्यंत नगरपालिकेच्या भाजी मार्केटची इमारत पूर्ण झाली होती. व त्यावर जो मजला बांधावयाचा तोंच सभागृह म्हणून बांधावा अशी कल्पना आली. व त्याप्रमाणें एक हॉल सन १९५५-५६ मध्यें बांधण्यांत आला. या हॉलचा उपयोग 'टॉऊन हॉल' सारखा होत आहे. अशा तऱ्हेचा मध्य वस्तीत व भव्य असा हॉल शहरांत दुसरा नाहीं. सार्वजनिक समारंभासाठीं याचा चांगलाच उपयोग होत आहे. शहरांतील अनेकविध संस्था या हॉलचा उपयोग सार्वजनिक कामासाठीं करून घेतात.

नगरपालिकेस स्वतःचें सर्व सामान म्हणजे सिमेंट, लोखंड, पत्रे वगैरें सामान व्यवस्थित ठेवण्यासारखी जागा नव्हती. त्यामुळें सामानसुमान ठेवण्याची अत्यंत कुचंबणा होत असे. त्यासाठीं नगरपालिकेची स्वतःची इमारत स्टोअर रूमसाठीं असणें आवश्यक होतें. म्हणून स्टोअरसाठीं तीन रूम्सचें गोडाऊन बांधणेंत आलें. याच गोडाऊनचेनजीक नगरपालिकेच्या कॉन्झर्व्हन्सी स्टाफसाठीं क्वॉर्टर्सही बांधण्यांत आल्या आहेत.

वांई नगरपालिकेच्या या एकंदर शंभर वर्षाचे कारकीर्दीमध्यें ज्यांनीं अध्यक्ष, उपाध्यक्ष व निरनिराळचा कमेटचांचे चेअरमन व सभासद म्हणून नगरपालिकेच्या वैभवांत मौलिक भर टाकली त्यांचीं नांवें पुढीलप्रमाणें सर्वांच्या माहितीसाठीं दिलीं आहेत.

अध्यक्ष


(१) कै. शंकर महादेव पाटणकर—
लोकनियुक्त पहिलें अध्यक्ष
१ आक्टोबर १९१० ते ३० सप्टेंबर १९१६

(२) कै. कृष्णाजी गंगाधर अभ्यंकर—
१-१०-१६ ते ३०-९-१९१९

(३) कै. मनोहर विष्णू काथवटे—
१-१०-१९१९ ते ३१-३-१९२३

(४) कै. केशव रावजी गोरे—
१-४-१९२३ ते ३१-३-१९२६

(५) श्री. नारायण कृष्णाजी चव्हाण—
१-४-१९२६ ते ३१-३-१९२९



डॉ. बिल्स् एल् एच्

मिलन हॉस्पिटलच्या कार्यास १९०८ मध्यें वाहींत प्रारंभ. अखंड एक तप रुग्णइतांची सेवा. न. पा. चे सन् १९१३ ते १९२१ सरकारनियुक्त सभासद.




कै. विठ्ठल मुकुद नायकवडी

नगरपालिकेचे १९२६ ते १९३५ पर्यंत सभासद. कांहीं वर्षे सॅनिटरी व स्कूल कमेटीचे चेअरमन. वांईतील सर्व शाळांचे विद्यार्थ्यांना प्रतिवर्षी रसपान करीत असत.



श्री. गणपतसिंग यशवंतसिंग डाळवाले

नगरपालिकेचे तीन वर्षे सभासद. व्यापारी व प्रसिद्ध पहिलवान. अनेक नामांकित कुस्त्या केल्या. अनेक पहिलवान तयार केले. दाणबाजार तालमीचे प्रमुख कार्यकर्ते.




श्री लक्ष्मण कृष्ण जमदडे

नगरपालिकेचे तीन वर्षे सभासद. १९४८ ते ५२ हल्लीं श्री भद्रेश्वर सहकारी पाणी पुरवठा सोसायटीचे चेअरमन. मिलिटरीमध्यें ५ वर्षे नोकरी. आझादहिंद सेनेमध्यें विनावेतन नोकरी.



श्री. बाजीराव पर्वतराव सावंत
नगरपालिकेचे सहा वर्षे सभासद. एक वर्ष मॅनेजिंग कमेटीचे चेअरमन.



श्री महादेव गणपत नलावडे
नगरपालिकेचे सहा वर्षे सभासद व मॅनेजिंग कमेटीचे चेअरमन.



श्री. शंकर विष्णू बगाडे
सहा वर्षे नगरपालिकेचे सभासद. वांई व जावली ता. नामदेव को-ऑ. सोसायटीचे १२ वर्षे सेक्रेटरी. विठ्ठल मंदिर भिमकुंड आळी, संस्थेचे संचालक.



श्री. जैनुलभाई बागवान, व्यापारी.
नगरपालिकेचे तीन वर्षे सभासद. व एक वर्ष सॅनिटरी कमेटीचे चेअरमन.

(६) श्री. गणेश व्यंकटेश ढवळीकर—
१-४-१९२९ ते ३१-३-१९३५
(७) श्री. मार्तंड गणेश खटावकर—
१-४-१९३५ ते ३१-१०-१९३८
(८) कै. कृष्णाजी गंगाधर अभ्यंकर—
१-११-१९३८ ते ३१-१०-१९४१
(९) श्री. रामचंद्र नारायण भावे—
१-११-१९४१ ते ३१-३-१९५२
१-५-५२ ते १४-२-५६ अखेर
(१०) श्री. महादेव गोविंद काळे—
१-४-१९५२ ते ३०-४-१९५२
(११) सरकारी प्रशासक—
१४-२-१९५६ ते १०-१२-५७
(१२) डॉ. प्रभाकर शंकर मराठे—
११-१२-१९५७ पासून चालू

उपाध्यक्ष

(१) कै. बाळकृष्ण शंकर बोपर्डीकर—
१९१० ते १९१३
(२) कै. कृष्णाजी गंगाधर अभ्यंकर—
१-१०-१९१३ ते ३०-९-१९१६
(३) कै. शंकर महादेव पाटणकर—
१-१०-१९१६ ते ३०-९-१९१९
(४) कै. कृष्णाजी गंगाधर अभ्यंकर—
१-१०-१९१९ ते ३१-३-१९२३
(५) श्री. मार्तंड गणेश खटावकर—
१-४-१९२३ ते ३१-३-१९२६
(६) रिश्च. जॉब सॅम्युअल सिताराम शिंदे—
१-४-१९२६ ते ३१-३-१९२९
(७) कै. कृष्णाजी गंगाधर अभ्यंकर—
१-४-१९२९ ते ३१-३-१९३२
(८) कै. केशव रावजी गोरे—
१-४-१९३२ ते ३१-३-१९३५
(९) श्री. गोविंद गणेश वैद्य—
१-४-१९३५ ते ३१-१०-१९३८
(१०) श्री. गणेश व्यंकटेश ढवळीकर—
१-११-१९३८ ते ३१-१०-१९४१
(११) ,, महादेव गोविंद काळे—
१-११-१९४१ ते ३१-१०-१९४४
(१२) ,, श्रीधर नागेश कापरे—
१-११-१९४४ ते ३१-३-१९४८
(१३) ,, पांडुरंग वामन नातू—
१-४-१९४८ ते ३१-३-१९५२
(१४) ,, व्यंकय्या यल्लय्या बोडके—
१-४-५२ ते ३१-३-५५
(१५) ,, शिवराम सावळाराम कांबळे—
१-४-५५ ते १४-२-५६
(१६) ,, आण्णा भिकू जायगुडे—
११-१२-१९५७ पासून चालू

मॅनेजिंग कमेटी चेअरमन

(१) श्री. महादेव आप्पाजी साठे
(२) ,, रामचंद्र कृष्ण कोठावळे
(३) ,, सखाराम महादेव पंडित
(४) ,, नरहर विष्णु काथवटे
(५) ,, कुतुबुद्दीन इस्माईलशा काजी
(६) ,, कृष्णाजी गंगाधर अभ्यंकर
(७) ,, मार्तंड गणेश खटावकर
(८) ,, गोपाळ विष्णु रास्ते
(९) ,, शंकर महादेव पाटणकर
(१०) ,, भार्गवराव माधवराव साठे
(११) ,, अकबर अब्दुलरहिम पाटील
(१२) ,, गणेश व्यंकटेश ढवळीकर
(१३) ,, महादेव गणपत नलावडे
(१४) ,, अब्दुल हमीम मुजावर
(१५) ,, महादेव गोविंद काळे
(१६) ,, बाबूराव बळवंत पाडळे
(१७) ,, ज्ञानोबा गोपाळा जमदडे
(१८) ,, बाजीराव पर्वतराव सावंत

(१९) श्री. गेनू बाळा हेरकळ
(२०) ,, रामभाऊ गणू गोळे
(२१) ,, अब्दुलगफार अकबर पाटील
(२२) ,, आत्माराम विठ्ठल नायकवडी
(२३) ,, शिवराम सावळाराम कांबळे (चालूं)

सॅनेटरी कमेटीचे चेअरमन


(१) श्री. खानसाहेब जाकूब बापूजी
(२) ,, नारायण नरहर अष्टपुत्रे
(३) ,, सखाराम महादेव पंडित
(४) ,, मार्तंड गणेश खटावकर
(५) ,, कृष्णाजी गंगाधर अभ्यंकर
(६) ,, श्रीपाद विष्णु पंडित
(७) ,, गोपाळ विष्णु रास्ते
(८) ,, सिद्धेश्वर काशिनाथ वैद्य
(९) ,, केशव रावजी गोरे
(१०) ,, बाळाजी विठोबा शिंदे
(११) ,, इमाम बापू शेरकर
(१२) ,, विठ्ठल मुकुंद नायकवडी
(१३) ,, दत्तात्रय बाळकृष्ण देशपांडे
(१४) ,, भिकू रामजी खरात
(१५) ,, महादेव गोविंद काळे
(१६) ,, जैनूभाई महंमदभाई बागवान
(१७) ,, आप्पा हरी सावंत
(१८) ,, ज्ञानोबा गोपाळ जमदडे
(१९) ,, विनायक मोरू आडसूळ
(२०) ,, बाबूराव बळवंतराव पाडळे
(२१) ,, गेनू बाळा हेरकळ
(२२) ,, श्रीपती भिकू जायगुडे
(२३) ,, रामभाऊ गणू गोळे
(२४) ,, आत्माराम विठ्ठल नायकवडी
(२५) ,, शंकर भिकू घोडके
(२६) ,, रामचंद्र बाळकोबा सूर्यवंशी
(२७) ,, बाबू भाऊ मुळे (चालूं)

डिस्पेन्सरी कमेटीचे चेअरमन


(१) श्री. नारायण नरहर अष्टपुत्रे
(२) ,, नरहर वासुदेव रडी
(३) ,, सखाराम महादेव पंडित
(४) ,, नरहर बळवंत आगाशे
(५) ,, धोंडो गणेश दामले
(६) ,, डॉ. वॉल्टर अेफ्. हचूम
(७) ,, बाळोजी विठोजी शिंदे
(८) ,, जॉब सॅम्युअल सिताराम शिंदे
(९) ,, कृष्णाजी गंगाधर अभ्यंकर
(१०) ,, दत्तात्रय गोपाळ चिटणीस
(११) ,, विष्णू लक्ष्मण पाडळे
(१२) ,, श्रीधर नागेश कापरे
(१३) ,, डॉ. प्र. शं. मराठे
(१४) ,, पांडुरंग वामन नातू
(१५) ,, काशिनाथ शंकर शेंडे
(१६) ,, व्यंकटेश दत्तात्रय देशपांडे
(१७) ,, रामभाऊ गणू गोळे
(१८) ,, शिवराम सावळाराम कांबळे
(१९) ,, शंकर भिकू घोडके
(२०) ,, डॉ. रामचंद्र बाळकोबा सूर्यवंशी
(२१) ,, श्रीरंग श्रीपाद पंडित
(२२) ,, बाबूराव रामचंद्र घाटे (चालूं)


स्कूल कमेटीचे चेअरमन

(१) श्री. अंताजी गंगाधर जोशी
(२) ,, रामचंद्र कृष्ण कोठावळे
(३) ,, काशिनाथ वासुदेव दिवेकर
(४) ,, हरी बाबाजी पुरोहित
(५) ,, बाळकृष्ण शंकर बोपर्डीकर
(६) ,, कुतुबुद्दीन इस्माईलशा काजी
(७) ,, नरहर विष्णू काथवटे
(८) ,, नरहर वासुदेव रडी
(९) ,, शंकर नारायण देशमुख
(१०) ,, नरहर बळवंत आगाशे



वांझी नगरपालिका "छत्रपति शिवाजी उद्यान"





वांओ नगरपालिका
स्टोअर्स



मोटार गॅरेज



धर्मशाळा

(११) श्री. मनोहर विष्णु काथवटे
(१२) ,, धोंडो गणेश दामले
(१३) ,, कृष्णाजी गंगाधर अभ्यंकर
(१४) ,, नारायण कृष्णाजी चव्हाण
(१५) ,, विठ्ठल मुकुंद नायकवडी
(१६) ,, गणेश व्यंकटेश ढवळीकर
(१७) ,, शमशुद्दीन कोंडी पाटील
(१८) ,, इंदिराबाई लिमये
(१९) ,, व्यंकटेश दत्तात्रय देशपांडे
(२०) ,, सौ. सत्यभामाबाई केशव नरवणे
(२१) ,, पांडुरंग वामन नातू
(२२) ,, सौ. ताराबाई श्रीधर कापरे
(२३) ,, सौ. सरस्वतीबाई सोपान कावडे
(२४) ,, सौ. पदमावतीबाई पुरुषोत्तम देशपांडे

(चालूं)

वांई नगरपालिकेचे सभासद पदावर काम केलेले सभासद

अ

अभ्यंकर कृष्णाजी गंगाधर
अष्टपुत्रे नारायण नरहर
अभ्यंकर पराशर कृष्णाजी
आडसूळ विनायक मोरू
आगाशे नरहर बळवंत
ओक काशिनाथ रावजी

उ

उंडाळे नारायण नामदेव

ए

एरंडे हरी सदाशिव

क

काजी कुतुबुद्दीन इस्माईलशा
काजी दाऊदशा
काथवटे नरहर विष्णू
काथवटे मनोहर विष्णू
काळे महादेव गोविंद
कापरे श्रीधर नागेश
कापरे सौ. ताराबाई श्रीधर
कान्हेरे सौ. पार्वतीबाई शंकर
कावडे सौ. सरस्वतीबाई सोपान
कांबळे दादू श्रीपती
कांबळे तुकाराम शिवा
कांबळे प्रभाकर कृष्ण
कांबळे शिवराम सावळाराम
केळकर सौ सत्यभामाबाई रघुनाथ
कोठावळे कृष्णाजी रघुनाथ

ख

खटावकर मार्तंड गणेश
खरात भिकू रामजी
खरात गणपती राजाराम
खरात भगवान कोंडीबा
खरे पांडुरंग नारायण
खामकर नारायण श्रीपती

ग

गद्रे केशव महेश्वर
गार्डन जे. पी.
रेव्ह. गायकवाड एन्.
गायकवाड साहेबराव केशवराव
गुजर महादेव तुकाराम
गोडसे आप्पाजी रामचंद्र
गोखले गणेश बळवंत
गोखले जनार्दन महादेव
गोगटे हरी गोविंद
गोरे केशव रावजी
गोळे रामभाऊ गणू

घ

घाणेकर गंगाधर कोंडदेव
घाटे बाबूराव रामचंद्र
घोडके शंकर भिकू

च

चव्हाण नारायण कृष्णाजी
चिटणीस दत्तात्रय गोपाळ

ज

जमदडे ज्ञानोबा गोपाळ
जमदडे लक्ष्मण कृष्णा
जमदडे शंकर राघू
जायमाळी लक्ष्मण बाळा
जायगुडे श्रीपती भिक
जायगुडे भिकू महादू
जायगुडे आण्णा भिकू
जेजुरीकर शंकर दगडू
जोशी अंताजी गंगाधर
जोग महेश्वर सखाराम
जोग सौ. लक्ष्मीबाई अनंत
जंबुरे दादा मारुती

ड

डाळवाले गणपतसिंग यशवंतसिंग

ढ

ढवळीकर गणेश व्यंकटेश
ढोर कमलाकर महादु

त

तळवलकर बापूजी रामचंद्र
ताम्हणकर बापूजी रामचंद्र

थ

थिटे कृष्णाजी रामचंद्र

द

दातार गणेश रामचंद्र
दामले धोंडो गणेश
दाभोळे विष्णू बहिरू
देशमूख बळवंत अप्पाजी
देशमूख शंकर नारायण

द

देशपांडे आनंदराव भवानीशंकर
देशपांडे विनायक अमृत
देशपांडे गोपाळ मोरेश्वर
देशपांडे खंडेराव विनायकपंत
देशपांडे दत्तात्रय बाळकृष्ण
देशपांडे व्यंकटेश दत्तात्रय
देशपांडे सौ. पद्मावती पुरुषोत्तम

न

नलावडे महादेव गणपत
नरवणे सौ. सत्यभामाबाई केशव
नानजकर गणपतराव माधवराव
नातू पांडुरंग वामन
नायकवडी विठ्ठल मुकुंदा
नायकवडी आत्माराम विठ्ठल

प

पटवर्धन रावजी नारायण
पसरणीकर गणेश गोविंद
पंडित सखाराम महादेव
पंडित वासुदेव बाबूराव
पंडित वासुदेव बाबाजीराव
पंडित श्रीपाद विष्णू
पंडित काशिनाथ विनायक
पंडित श्रीरंग श्रीपाद
पापामिया कादरखान
पाटील अब्दुल रहिमानमिया
पाटील बापू करीम
पाटील अकबर अब्दुलरहिम
पाटील दादा करीम
पाटील शमशुद्दीन कोंडी
पाटील अब्दुलगफार अकबर
पाटील मियावल्लद राजे
पाडळे विष्णू लक्ष्मण
पाडळे बाबूराव बळवंतराव
पाटणकर शंकर महादेव
पिंजारी सिलेमान इब्राहिम
पुरोहित हरी बाबाजी
पोरे नामदेव मेराळराव

फ

फकीर शाहेबशा हुसेनशा



पै. अकबर अब्दुलरहीम पाटील
सुमारें सात वर्षें नगरपालिकेचे सभासद.
एक वर्ष मॅनेजिंग कमेटीचे चेअरमन.




पै. दादा करीम पाटील
सुमारें तीन वर्षें नगरपालिकेचे सभासद.



श्री. ज्ञानोबा गोपाळा जमदाडे
एक सामाजिक कार्यकर्ते. नगरपालिकेचे १३ वर्षें सभासद. मॅनेजिंग कमेटी, सॅनिटरी कमेटीचे चेअरमन. अनेक संस्थांशी संबंध. भद्रेश्वर लिफ्ट इरिगेशन योजनेचे कार्यांत मोठा भाग.



श्री. शंकरराव भिकोबा घोडके
नगरपालिकेचे चार वर्षें सभासद. सॅनिटरी व दवाखाना कमेटीचे चेअरमन.



श्री. अब्दुल गफार अकबर पाटील
नगरपालिकेचे तीन वर्षे सभासद.
एक वर्ष मॅनेजिंग कमेटीचे चेअरमन



श्री. शमशुद्दीन कोंडी पाटील
तीन वर्षे नगरपालिकेचे सभासद.
स्कूल कमेटीचे चेअरमन एक वर्ष



कै. श्रीपती भिकू जायगुडे
सहा वर्षे नगरपालिकेचे सभासद. तीन वर्षे
सॅनिटरी कमेटीचे चेअरमन इमारतीचे
ख्यातनाम कॉन्ट्रॅक्टर.



श्री. सरस्वती सोपान कावडे
१९५२ मध्ये नगरपालिकेच्या सभासद म्हणून
स्त्रियांचे राखीव जागेवर निवड शाळा
समितिच्या ५ वर्षे चेअरमन. नगरपालिकेंत
निवडून आल्याबद्दल श्री. पोपटलाल शहा
यांचे अध्यक्षतेखालीं सत्कार.

ब

बगाडे शंकर विष्णु
बागवान जैनुलभाई महंमद
डॉ. बिल्स एल्. एच्.
बोपर्डीकर बाळकृष्ण शंकर
बोपर्डीकर शंकर गोविंद
बोरकर गोपाळ रामचंद्र
बोडके व्यंकय्या यल्लय्या

भ

भानू गोविंद विनायक
भालेराव एस्. ए.
भावे रामचंद्र नारायण

म

डॉ. मराठे प्रभाकर शंकर
महार श्रीपती नामा
मुळे बाबूराव भाऊ
मेसमान रहिमानखान हुसेनखान

य

यशवंत पिराजी

र

रडी नरहर वासुदेव
रानडे रामचंद्र कृष्ण
रास्ते गोपाळ विष्णु
रांगोळे गंगाराम कुशाबा
रांगोळे बाबूराव गंगाराम

ल

लिमये इंदिराबाई

व

वाकडे रामभट कृष्णभट
वैशंपायन श्रीराम विठ्ठल
वैद्य गोविंद गणेश
वैद्य सिद्धेश्वर काशिनाथ
वैद्य महादेव अनंत

श

शिंदे जॉनसॅम्युअल सिताराम
शिंदे बाळोजी विठूजी
शिदोरे गोपाळ कृष्ण
शिवदे भास्कर वामन
शेट रामजी बयाजी
शेरकर इमाम बापू
शेंडे काशिनाथ शंकर

स

साठे महादेव आप्पाजी
साठे भार्गवराव माधवराव
सावंत आप्पा हरी
सावंत बाजीराव पर्वती
सावंत गोविंदा गोपाळा
सुलतान अब्दुलहमीद हाजी
सूर्यवंशी रामचंद्र बाळकोबा

ह

हगीर नारायण पिंपळू
हामीदखान पापामिया
हुसेनखान कादरखान
डॉ. हयूम वॉल्टर एफ्.
हेरकळ गेनू बाळा

क्ष

क्षीरसागर मल्हार गंगाधर

–: नगरपालिका सेवकवर्ग :–

कोणत्याहि संस्थेचें कार्य नेहमीं दोन विभागांतून होत असतें. एक विभाग म्हणजे विनावेतन काम करणारा सभासदवर्ग; व दुसरा विभाग म्हणजे संस्थेचा नोकरवर्ग होय. या दोन्हीं विभागांच्या परस्पर सहकार्यानें कोणतीहि संस्था चाललेली असते. सभासदवर्ग व नोकरवर्ग यांचेमध्यें जर सहकार्य नसेल तर संस्थेचें कामकाज व्यवस्थित चालणार नाहीं.

इतकेंच नव्हें तर संस्था अगदीं बंद करावी लागेल. परंतु विशेष उल्लेखनीय व अभिमानास्पद गोष्ट म्हणजे या नगरपालिकेंत अशा तऱ्हेची परिस्थिति केव्हांही निर्माण झाली नाहीं. व दोन्हीं विभागांनीं संस्थेचें कार्य एकदिलानें केलें व करीत आहेत. नगपालिकेच्या नोकर वर्गास सरकारी व इतर मोठ्या खाजगी संस्थाचें नोकर वर्गापेक्षां कमी वेतन देणेंत येत असें हीं गोष्ट नाकारून चालणार नाहीं. परंतु जरी नोकर वर्गांस कमी वेतन होतें तरी नोकरवर्गानें आपल्या कामगिरीमध्यें कधींहि कमीपणा दाखविला नाहीं. उलट नगरपालिकेच्या प्रगतीमध्यें भरच पडत गेलेली दिसून येईल. अलीकडे १९५५ सालापासून नोकरवर्गांचे पगार वाढविणेंत आले आहेतच. नगरपालिकेच्या नोकर-वर्गाचा नागरिकांशीं जेवढा संबंध येतो तेवढा इतर कोणत्याहि संस्थेच्या नोकरांचा नागरिकांशीं संबध येत नाहीं; असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. नगरपालिकेच्या नोकरवर्गाइतक्या अडचणीं दुसरीकडे क्वचितच आढळतील. एका बाजूला सरकारी अधिकारी वर्ग, दुसऱ्या बाजूला सभासद वर्ग, तिसऱ्या बाजूस शहरांतील नागरिक या सर्वांच्या मनाप्रमाणें जें जें कार्य करतां येणें शक्य आहे, तें तें करून आपापलीं कर्तव्यें नगरपालिकेच्या नोकरवर्गास करावी लागतात. नगरपालिकेनें आतांपर्यंत शंभर वर्षांत जी जी कामगिरी केली तीमध्यें तिच्या नोकरवर्गाचा भाग मोठा आहे असें म्हटल्यास तें उचितच होईल. अतएव न. पा. चे नोकरवर्गांस त्यांनीं केलेल्या कामगिरीबद्दल धन्यवाद देणें आवश्यक आहे.

—: आभार व कृतज्ञता :—

वरीलप्रमाणें आपल्या वांई नगरपालिकेचा शंभर वर्षांचा अगदीं थोडक्यांत दिलेला इतिहास वाचल्यानंतर कोणाहि सूज्ञ नागरिकांस हर्षमिश्रित आश्चर्य वाटल्यावाचून रहाणार नाहीं. व नगरपालिकेच्या सभासदांनीं व सेवकवर्गांनीं केलेली कामगिरी वाचून नगरपालिकेच्याबाबत व्यवहारांत रूढ झालेलें मत बदलावेसें वाटल्यास त्यांत नवल तें कोणतें ? अजूनहि आपले नागरिक नगरपालिका म्हटली कीं, नाकें मुरडतांना दिसतात व उदासीन होतात. असें कां ? वस्तुतः नागरिकांची नगरपालिकेबाबतचीं कर्तव्यें व जबाबदारी फार मोठी आहे. नुसते कर भरून केव्हांतरी एकदां मत देऊन स्वस्थ बसणें हें चालण्यासारखें नाहीं. एखादेवेळीं नगरपालिकेस एखादा कर वाढवावा लागतो. क्वचित एखादा नवीन करहि बसवावा लागतो. नगरपालिकेला कायद्यानेंच अशा प्रकारची करवाढ करणें अगर कर नवीन बसविणेंपूर्वी नागरिकांची याबाबत कांहीं सूचना वा हरकत आहे कां वगैरें कळण्यासाठीं तशी प्रसिद्धी करावी लागते. व तशी प्रसिद्धीहि करण्यांत येते. परंतु असें आढळतें कीं, बहुशः कोणीहि नागरिक याची दखल घेत नाहीं व याबाबत आपले विचार हरकत वगैरे कांहींहि नगरपालिकेस कळवीत नाहींत, आणि करांची अंमलबजावणी झालेनंतर मात्र नगरपालिकेस दोष देत बसतात ; ही गोष्ट स्पृहणीय नाहीं. नागरिक जितका नगरपालिकेचा कारभार आस्थापूर्वक व जवळून पाहील तितका त्यांस नगरपालिकेबाबत विश्वास वाटेल. शिवाय आपले प्रतिनिधीपण काय कामगिरी करीत आहेत, हें समजून येईल. नगरपालिकेच्या हिशेबाची कायद्यानेंच सरकारमार्फत तपासणी होत असते. तपासणीचा अहवाल व त्या तपासणी मध्यें घेतलेल्या ऑबजेक्शन्स् [शक] त्यांवर नगरपालिकेनें दिलेल्या उत्तरांसह माहितीसाठीं प्रसिद्ध कराव्या लागतात. यामध्यें हेतु हाच कीं, या सर्व गोष्टींची नागरिकांस माहिती मिळावी. अशी सर्व गोष्टींची माहिती घेतली म्हणजेच नागरिकांच्या ध्यानांत येईल कीं, आपण कर रुपानें जी रक्कम देतो त्याचें योग्य प्रकारें चीज होत आहे. नागरिकांच्या

सहकार्यावरच नगरपालिकेचा कारभार चालत असतो. नगरपालिकेला सहकार्य देणें हें नागरिकांचें प्रमुख कर्तव्य आहे. नागरिकांचे सहकार्यानेंच शहराचें आरोग्य राखणें, स्वच्छता राखणें, रोगांचा प्रतिबंध करणें, अशा गोष्टी नगरपालिकेस सहजपणें करतां येतील. शहराची सर्वांगीण सुधारणा साध्य करणें हे केवळ नागरिकांचे सहाय्यावर अवलंबून आहे. नगरपालिकेनें जी ही शंभर वर्षांची वाटचाल केली आहे. त्यामध्यें नागरिकांचा भाग फार मोठा आहे व त्याबद्दल नागरिकांचें अभिनंदन करणें अगदीं योग्य असून तें आमचें कर्तव्य आम्ही करीत आहों.

बांअी नगरपालिकेचा गेल्या शंभर वर्षांच्या कार्याचा आढावा अगदीं थोडक्यांत असा नागरिकांचे पुढें सादर करणेंस आम्हांस परम आनंद होत आहे. वरील थोडक्यांत दिलेला हा इतिहास वाचून आपणांस कल्पना येईलच कीं आपल्याच नागरिकांनीं आपल्या नगराच्या सर्वांगीण सुधारणेची व सौंदर्याची केवढी थोर कामगिरी केली आहे. त्याबद्दल त्यांना जेवढें धन्यवाद द्यावेत तेवढें थोडेच आहेत. नगरपालिकेच्या या शंभर वर्षांच्या कार्यामध्यें अनेक व्यक्तींचें सहकार्य, ज्ञान, आणि त्यांची निरलस सेवा हीं कारणीभूत झालेली आहेत. त्याच प्रमाणें सरकारी अधिकारी वर्गानेंहि नगरपालिकेस निरनिराळे कामीं सहकार्य व सल्ला दिला आहेच. सरकारनेंहि ग्रँटस्च्या रुपानें नगरपालिकेस वेळोवेळीं आर्थिक मदत देऊन नवा उत्साह व प्रेरणा दिली आहे.

नगरपालिकेच्या सेवक वर्गानें आपली कामगिरी कर्तव्यबुद्धीनें व योग्य प्रकारें केली असून संस्थेच्या उत्कर्षांत भर घातली आहे. त्याचप्रमाणें विनावेतन काम करणाऱ्या सन्माननीय सभासदांचीहि कामगिरी उल्लेखनीय आहे. अशा सर्वांचा नामनिर्देश करणें केवळ अशक्य आहे. सर्वांच्या कार्याचा उल्लेख करणें झालेस ग्रंथाच्या हल्लीं असणाऱ्या पृष्ठसंख्येच्या अनेक पट पृष्ठें छापावी लागतील आणि तरीहि हें काम पूर्ण संपणार नाहीं. शिवाय संस्थेच्या हिताच्या दृष्टीनें कोणा एकाचा नामनिर्देश करणें ही गोष्ट उचित होणार नाहीं. कारण त्याचा अर्थ असा ह्यायचा कीं, दुसऱ्या कोणी कांहींच कार्य केलें नाहीं. या गोष्टीचा दोषारोप येऊं नये म्हणून आतांपर्यंत ज्या ज्या लोकांनीं या नगरपालिकेच्या कार्यांत आपल्या कर्तृत्वानें मौलिक सहाय्य करून आज तिला जें वैभवशाली स्वरुप प्राप्त करून दिलें, त्या त्या सर्वांचे आम्हीं मनःपूर्वक आभार मानून हा नगरपालिकेचा संक्षिप्त इतिहास वर्णन करतांना आनंदलेल्या लेखणीस विश्रांति देतो. धन्यवाद !



वांई नगरपालिका १९५८

(१) स्थापना:— दिनांक ५ डिसेंबर १८५५

(२) क्षेत्र सुमारें:— दीड चौरस मैल


(३) लोकसंख्या:— सन १९५१ मध्यें खानेसुमारीं केली त्यावेळीं लोकसंख्या एकूण १६०९९ होती. भागवार लोकसंख्या खालीलप्रमाणें.

वार्ड क्रमांक	पुरुष	स्त्रिया	एकूण
वॉर्ड क्र. १	१५१२	१५६२	३०७४
वॉर्ड क्र. २	१५७३	१४२२	२९९५
वॉर्ड क्र. ३	१७२३	१८२५	३५४८
वॉर्ड क्र. ४	१८१२	१९५०	३७६२
वॉर्ड क्र. ५	१३३७	१३८३	२७२०
एकूण	७९५७	८१४२	१६०९९

खानेसुमारीचे वेळीं साक्षर लोक एकूण ८३५१ आढळून आले. त्यापैकीं पुरुष ५०९५ व स्त्रिया ३२५६ होत्या.

(४) वांओ नगरपालिकेची घटना (चालूं)

वांओ नगरपालिकेमध्यें एकूण १५ सभासद आहेत. त्यामध्यें दोन जागा स्त्रियांसाठीं व एक जागा वर्गीकृत जमातीसाठीं राखीव आहेत व बाकीच्या १२ जागा सर्वांना खुल्या आहेत. वांओ शहराचे एकूण पांच वार्डस् आहेत. त्यामधून प्रत्येकीं तीन प्रमाणें सभासद निवडले जातात. कोणत्या भागांतून राखीव जागा किती व कशा निवडल्या जातात त्याचा तपशील पुढील प्रमाणें आहे.



डॉ. प्रभाकर शंकर मराठे

L. C. P. & S. [Bom.]

वांईत वीस वर्षे वैद्यकीय व्यवसाय. सर्व खेळांची आवड. लेखन व वाचनाकडे कल. नगरपालिकेचे विद्यमान अध्यक्ष.





श्री. आण्णा भिकू जायगुडे, कॉन्ट्रॅक्टर

प्रथमच १९५७ मध्ये नगरपालिकेचे सभासद म्हणून निवड. हल्लीचे नगरपालिकेचे उपाध्यक्ष. इमारतीचे कॉन्ट्रॅक्टर.



वांझी नगरपालिकेच्या भाजी मार्केटची व सभागृहाची नवीन इमारत

वॉर्ड क्रमांक	भाग	निवडावयाच्या जागा	राखीव जागा
१	सि. स. क्रमांक १ ते ४२५	३	१ जागा स्त्रियांसाठीं राखीव १ व २ वार्डांत फिरती सुरुवात वॉर्ड नंबर १ मधून
२	सि. स. क्रमांक ४२६ ते ९७५	३	
३	सि. स. क्रमांक ९७६ ते ११७१ २२५३ ते २५४१	३	
४	सि. स. क्रमांक १२५९ ते १८६३	३	१ जागा स्त्रियांकरितां राखीव ४-५-३ वार्डांत फिरती सुरुवात वॉर्ड क्रमांक ४ मधून
५	सि. स. क्रमांक ११७२ ते १२५८ व १८३४ ते २२९२	३	१ जागा वर्गीकृत जमातीसाठीं राखीव

वांई नगरपालिकेंत हल्लीं निवडून आलेल्या सभासदांची निवडणूक दि. ३-११-१९५७ रोजीं झाली. त्या निवडणुकीसंबंधीं माहिती खालीलप्रमाणें आहे.

वॉर्ड क्रमांक	निवडणेच्या जागा	उमेदवारांची संख्या	एकूण मतदार	प्रत्यक्ष मतदान करणारांची संख्या	शेंकडा मतदान किती झालें
१	३	६	१३४०	१०४०	७७·६१
२	३	९	१४७७	११५९	७७·७९
३	३	६	१४६३	११७२	८०·१०
४	३	१०	१५५२	१२९४	८३·३७
५	३	८	१५९७	१२७०	७९५२
एकूण	१५	३९	७४२९	५९३५	७९·०६

५ जनरल बॉडी:—

हल्लीचें बोर्ड दि. ११ डिसेंबर १९५७ पासून अधिकारारुढ झालें. त्यांत खालील सभासद आहेत.

(१) माननीय डॉ. प्रभाकर शंकर मराठे अध्यक्ष
L. C. P. & S. (Bom.)
(२) „ आण्णा भिकू जायगुडे, उपाध्यक्ष
(३) „ पराशर कृष्ण अभ्यंकर
B. Com. LL. B. वकील
(४) „ साहेबराव केशवराव गायकवाड
(५) „ सौ. लक्ष्मीबाई अनंत जोग
(६) „ डॉ पांडुरंग नारायण खरे
(७) „ बाबू भाऊ मुळे
(८) „ बाबूराव रामचंद्र घाटे
(९) „ भगवान कोंडीबा खरात
(१०) „ नारायण पिंपळू हगीर
(११) „ महादेव तुकाराम गुजर
(१२) „ सौ. पद्मावती पुरुषोत्तम देशपांडे
(१३) „ आत्माराम विठ्ठल नायकवडी
(१४) „ शिवराम सावळाराम कांबळे
(१५) „ शंकर राघू जमदडे

६ वाई नगरपालिकेंत इतर चार पोट समित्या आहेत त्या खालीलप्रमाणें—

[१] कार्यकारी समिती:—

(१) मान. शिवराम सावळाराम कांबळे, सरपंच.
(२) „ आत्माराम विठ्ठल नायकवडी
(३) „ नारायण पिंपळू हगीर
(४) „ बाबू भाऊ मुळे
(५) „ बाबूराव रामचंद्र घाटे
(६) „ महादेव तुकाराम गुजर
(७) „ शंकर राघु जमदडे

[२] आरोग्य समिती:—

(१) मान. बाबू भाऊ मुळे, सरपंच.
(२) „ बाबूराव रामचंद्र घाटे
(३) „ नारायण पिंपळू हगीर
(४) „ शंकर राघू जमदडे
(५) „ महादेव तुकाराम गुजर

[३] दवाखाना समिती:—

(१) मान. बाबूराव रामचंद्र घाटे, सरपंच.
(२) „ नारायण पिंपळू हगीर
(३) „ महादेव तुकाराम गुजर
(४) „ शंकर राघू जमदडे
(५) „ सौ. पद्मावतीबाई पुरुषोत्तम देशपांडे

[४] शाळा समिती:—


(१) मान. सौ. पद्मावतीबाई पुरुषोत्तम देशपांडे, सरपंच.
(२) „ शिवराम सावळाराम कांबळे
(३) „ बाबू भाऊ मुळे
(४) „ बाबूराव रामचंद्र घाटे
(५) „ नारायण पिंपळू हगीर

हल्लींचा अधिकारी वर्ग:—

(१) श्री. अनंत वामन विद्वांस
D. C. E. L. S. G. D. सेक्रेटरी
(२) „ श्रीपाद दत्तात्रय माजगांवकर
D. C .E. ओव्हरसिअर
(३) „ अच्युत गोविंद खटावकर
L. S. G. D. हेडकारकून, अकौंटंट
(४) „ विठ्ठल श्रीपती खडसरे
जकात अधिकारी
(५) „ रामचंद्र पर्बती जमदडे
जकात अधिकारी
(६) „ शरदश्चंद्र विश्वंभर केसकर
सॅनिटरी इन्स्पेक्टर
(७) „ आवडू महादू हगीर
मुख्य वसुली कारकून

७ कर:— वांओ नगरपालिकेंत हल्लीं जे कर आकारले जातात ते व त्याची माहिती खालीलप्रमाणें आहे.

(१) घरपट्टी— हा कर सन १८८५-८६ पासून बसविणेंत आला आहे. या कराची आकारणी




श्री. शिवराम सावळाराम कांबळे, व्यापारी.

सन १९४८ पासून आजपर्यंत नगरपालिकेचे सभासद. हरीजन राखीव जागेवर निवड. या मुदतींत उपाध्यक्ष, दवाखाना कमेटीचे चेअरमन व हल्लीं मॅनेजिंग कमेटीचे चेअरमन. जिल्हा स्कूल बोर्डाचेहि सभासद होते. ३।४ वर्षे ऑनररी मॅजिस्ट्रेट. एकलव्य विद्यार्थि वसतिगृहाचे संस्थापकांपैकीं एक व व्यवस्थापक. वांईतील विविध संस्थांशी घनिष्ठ संबंध. तालुका डेव्हलपमेंट बोर्डाचे १९५५-५६ मध्यें ऑन. सेक्रेटरी. टॅनर्स सहकारी उत्पादन सोसायटीचे चेअरमन. १९५३ मध्यें रविवार मंडळाचे अध्यक्ष. गांधी निधी सेक्रेटरी. सहाव्या स्वातंत्र्यदिन उत्सव कमेटीचे अध्यक्ष. काँग्रेस कार्यकर्ते. हरीजन समाजातील प्रमुख कार्यकर्ते.

श्री. बाबू भाऊ मुळे,

सन १९४८ पासून आजपर्यंत नगरपालिकेचे वॉर्ड क्र. २ मधून सभासद म्हणून तीन वेळां निवडून आले आहेत. १९५७ पासून सॅनिटरी कमेटीचे चेअरमन. दाणेबाजार तालमीचे एक कार्यकर्ते १९३० पासून आजपर्यंत काँग्रेसचे एकनिष्ठ सेवक. वांई शहर काँग्रेस कमेटीचे १९४५ ते १९५२ पर्यंत सेक्रेटरी. अत्यंत तळमळीनें कार्य करणारे, सामाजिक कार्याची मनापासून आवड असणारे. १९३० व १९४२ चे स्वातंत्र्य आंदोलनप्रसंगीं कारावास भोगावा लागला. विशेष उल्लेखनीय गोष्ट म्हणजे घरची परिस्थिति अत्यंत गरिबीची असूनहि स्वतःच्या कर्तबगारीनें या थोर पदास पोहोचले.






सौ. पद्मावतीबाई पुरुषोत्तम देशपांडे

१९५७ मध्यें प्रथमच वॉर्ड क्र. ४ मधून स्त्रीयांचे राखीव जागेवर नगरपालिकेच्या सभासद म्हणून निवड. हल्लीं स्कूल कमेटीच्या चेअरमन. वांईतील महिला मंडळाच्या व काँग्रेसच्या कार्यकर्त्या.



श्री. बाबूराव रामचंद्र घाटे, व्यापारी.

१९५७ मध्यें प्रथमच वॉर्ड क्र. ३ मधून न पा. चे सभासद म्हणून निवड. दवाखाना कमेटीचे विद्यमान चेअरमन. काँग्रेसचे कार्यकर्ते.



श्री. शंकर राघू जमदाडे

१९५७ सालीं प्रथमच वॉर्ड क्र. ५ मधून न. पा. चे सभासद म्हणून निवड. एक सालस कार्यकर्ते. काँग्रेसचे कार्यकर्ते.

घराच्या वार्षिक भाडयाच्या अंदाजावर केली जाते. या करापासून नगरपालिकेस सध्यां २१६१७ रुपये उत्पन्न मिळतें.

(२) **जनरल सॅनेटरी सेस:**— हा कर दि. १-४-१९११ पासून बसविण्यांत आला. ह्या कराची आकारणी वार्षिक भाडयाच्या अंदाजावर केली जाते. या कराच्या दरांमध्यें वरचेवर दुरुस्त्या करणेंत आल्या आहेत. या करांपासून हल्लीं नगरपालिकेस १५१५० रुपये उत्पन्न मिळतें

(३) **स्पेशल सॅनेटरी सेस:**— हा कर दिनांक १५-१०-१८६६ पासून अंमलांत आणला आहे. हा कर संडासच्या प्रत्येक सीटवर आकारला जातो. हल्लीं प्रत्येक पहिल्या सीटला २० रुपये व दुसऱ्या प्रत्येक सीटला १५ रु. असा आकारला जातो. या करांपासून नगरपालिकेस एकूण १०९२० रुपये उत्पन्न मिळतें.

(४) **लाईट टॅक्स:**– या कराची अंमलबजावणी दि. १ जानेवारी १९५२ पासून करणेंत आली आहे. ह्याहि कराची आकारणी घरपट्टी प्रमाणेंच घराच्या वार्षिक भाडयावर केली जाते. यापासून हल्लीं नगरपालिकेस रुपये ५४९६ उत्पन्न मिळतें.

(५) **व्हील टॅक्स:**— वांअी नगरपालिकेनें शहरांत वापरल्या जाणाऱ्या सर्व वहानांवर कर बसविला आहे. त्यासच व्हील टॅक्स ही संज्ञा दिली आहे. हा कर १ एप्रिल १९०१ पासून अंमलांत आला आहे. प्रत्येक वहानावरील टॅक्सच्या दरामध्यें बऱ्याचशा दुरुस्त्या करणेंत आल्या आहेत. हल्लीं ह्या करांचें उत्पन्न रुपये १४७० इतके न. पा. स. मिळतें.

(७) **टोल:**— वांअी शहरांत बाहेरून येणाऱ्या प्रत्येक वहानावर हा कर बसविला आहे. हा कर दिनांक १ एप्रिल १९०१ पासून अमलांत आला आहे. हा कर प्रत्येक नाक्यावरच वसूल केला जातो. मोटारीवरील टोल मध्यंतरी वसूल करणेस मनाअी केली त्यासाठीं सरकार प्रतिवर्षी १६८५ रु. ग्रँट नगरपालिकेस देत असते. शिवाय करांचें उत्पन्न ८१३८ न. पा. स. मिळतें.

(७) **हॉटेल कर:**— शहरांत असणाऱ्या प्रत्येक हॉटेल रेस्टॉरंट तसेंच खानावळी व इतर खाद्य पदार्थ विक्री करणाऱ्या मिठाईच्या दुकानावर हा कर वार्षिक भाडयाच्या अंदाजावर दि. १ एप्रील १९४७ पासून बसविला आहे. याचें हल्लीं उत्पन्न १५६१ रु. आहे.

(८) **थिएटर कर:**– म्हणजे करमणुकीवरील कर. हा शहरांत होणाऱ्या प्रत्येक करमणुकीच्या प्रयोगावर आकारण्यांत येतो. नाटक अगर गाण्याचा जलसा यांच्या प्रयोगास ३ रुपये, सर्कस ३ रुपये, सिनेमाचे प्रत्येक प्रयोगावर २ रुपये, तमाशाचे प्रयोगावर ३ रुपये व इतर करमणुकीचे प्रयोगावर ३ रुपये असे हल्लींचे दर आहेत यापासून न. पा. स. १५५७ रु. उत्पन्न मिळतें.

(९) **सेसपूल टॅक्स:**– वांअी शहरांत अंडर ग्राउंड ड्रेनेजची व्यवस्था नाहीं. यासाठीं नगरपालिकेनें घरांतील सांडपाणी सेसपूलमध्यें सांठवून तें दररोज घेऊन जाणेची पध्दत सन १९३६।३७ सालांपासून सुरू केली. हल्लीं प्रत्येक सेसपूलवर रु. २४।– वार्षिक कर घेतला जातो. शहरांतील सर्व सेसपूलस् दररोज स्वच्छ करण्यांत येतात. यापासून उत्पन्न रु. २१६।– फक्त येत असते.

(१०) **कुत्रा कर:**– दि. १-१०-१९३८ पासून नगरपालिकेनें शहरांतील पाळलेल्या कुत्र्यांवर प्रत्येकी ०-६-० प्रमाणें कर बसविला आहे. हल्लीं न. पा. स यापासून १३।– रुपये उत्पन्न मिळतें.

(११) **सायकल करः–** शहरांत वापरल्या जाणाऱ्या प्रत्येक सायकलवर दि. १ जानेवारी १९५२ पासून नगरपालिकेनें प्रत्येकीं २ रुपये प्रमाणें कर बसविला असून त्यापासून न. पा. स १०७० रु. उत्पन्न मिळतें.

(१२) **जकातः–** नगरपालिकेनें हा कर फार पूर्वी म्हणजे दि. १ एप्रील १८७८ पासून बसविला आहे. शहरांत येणाऱ्या बहुतेक मालांवर जकातीची आकारणी केली जाते. ही आकारणी जिनसांच्या किंमतीवर दर रुपयास ३ अगर ४ पै याप्रमाणें केली जाते. धान्याचे वजनावर या कराची आकारणी केली जाते. या करापासून नगरपालिकेस निव्वळ उत्पन्न ७१८८७।– रुपये मिळतें. हा कर नगरपालिकेच्या उत्पन्नाची विशेष बाब म्हणून आहे.

वरीलप्रमाणें निरनिराळे कर नगरपालिकेनें बसविलेले आहेत. त्यांचें वार्षिक उत्पन्न १२६९३३ रुपये मिळतें. करांचें प्रमाण दर माणशीं ७·८८ अितकें आहे.

याशिवाय नगरपालिकेनें खालीलप्रमाणें फीज् बसविल्या आहेत.

(१) दवाखाना फी, (२) लिखाअी रुजुवात फी, (३) गुरें बाजार फी, (४) स्लॉटरिंग फी, (५) जागाभाडें फी, (६) मार्केट फी, (७) नोटीस व वॉरंट फी. याशिवाय दाणेबाजारांत न. पा. नें बांधलेल्या दुकानांचे भाड्यापासूनचें उत्पन्न वगैरे सर्व बाबीपासून न. पा. स सुमारें १९,३२९ रुपये उत्पन्न प्रतिवर्षी मिळतें

८ जमाः– सन १९५७-५८ चे न. पा चे एकूण उत्पन्न खालीलप्रमाणें आहे.

	रुपये
(१) करापासून	१,२६,९३३
(२) न. पा. चे मिळकतीपासून व इतर अधिकारापासून	१९,३२९
(३) सरकारी देणग्या व वर्गण्या	२९,०६७
(४) किरकोळ	२,२३३
एकूण—	१,७८,५६२

९ खर्चः–

	रुपये
(१) सर्वसाधारण ऑफिस व करवसुली खर्च	४६,२७६
(२) सार्वजनिक सुरक्षितता	७,२८७
(३) सार्वजनिक आरोग्य सोयी	९७,४३०
(४) सार्वजनिक शिक्षण व देणग्या	१३,९३७
(५) किरकोळ	६,४७२
एकूण—	१,७१४०२

या नगरपालिकेची जमा होणारी सर्व रक्कम हल्लीं दि नॉर्थ सातारा डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल को. ऑ. बँक लि. शाखा वांअी मध्यें ठेविलीं जाते.

१० सरकारकडून न. पा. स. आर्थिक मदत–

या नगरपालिकेस सरकारकडून दरसाल मदत मिळत असते. सन १९५७।५८ या सालीं एकूण रुपये २३४८० मदत मिळाली.

	रुपये
[१] महागाई भत्यावरील ग्रँट–	१५०४१·१९
[२] कोंडवाडा दंडाची ,,	३७७·१९
[३] टोल ग्रँट	२५२७·५०
[४] स्टेट रोड फंडातील ,,	२१००·००
[५] सॅनेटरी इन्स्पेक्टरचे पगारावरील	५५८ ६६
[६] म्यु. ॲक्ट व इतर ॲक्ट अन्वयें होणाऱ्या दंडावरील	५२४·००
[७] दवाखाना ग्रँट	२३५२·००
एकूण—	२३४८०·५४


११ जकात खातें— नगरपालिकेचें जकात खातें हें एक उत्पन्नाचें प्रमुख व मोठें खातें आहे. या नगरपालिकेची एकूण १० नाकीं आहेत. प्रत्येक नाक्यावर जकात व टोल वसूल केला जातो. या खात्यामध्यें एकूण ३१ नोकर आहेत. त्यांत २ इन्स्पेक्टर्स २६ नाका कारकून व ३ नाका शिपाई असा नोकरवर्ग आहे. मोठ्या सहा नाक्यांचें



श्री. नारायण पिंपळू हगीर
१९५७ मध्यें प्रथमच वॉर्ड क्र ४ मधून न. पा. चे सभासद म्हणून निवड.
काँग्रेसचे कार्यकर्ते. ऑग्रिकल्चर प्रोड्यूस मार्केट कमेटीचे सभासद.
तालुका डेव्हलपमेंट बोर्डाचे १९४८ ते १९५६ पर्यंत सभासद
व १९४८ते५२ मॅनेजिंग कमेटीचे सभासद. १९५२ते१९५६
बोर्डाचे उपाध्यक्ष. व्यवसाय शेती.




श्री. आत्माराम विठ्ठल नायकवडी
सन १९५२ पासून नगरपालिकेचे सभासद.
१९५५-५६ मध्यें मॅनेजिंग कमेटीचे चेअरमन.
तालुका डेव्हलपमेंट बोर्डाचे १९४७ सालीं उपाध्यक्ष
व्यवसाय शेती. काँग्रेस कार्यकर्ते.



श्री. महादेव तुकाराम गुजर, व्यापारी.
१९५७ मध्यें प्रथमच वॉर्ड क्र ४ मधून न. पा. चे
सभासद म्हणून निवड. रविवार मंडळाचे एक वर्ष
अध्यक्ष व हल्लीं खजिनदार. भोई समाजाच्या
सोसायटीचे चेअरमन. सामाजिक कार्यकर्ते



श्री. पराशर कृष्णाजी अभ्यंकर, वकील
B. Com., LL. B.
१९५७ मध्यें प्रथमच वॉर्ड क्र. १ मधून
न. पा. चे सभासद म्हणून निवड.



श्री. साहेबराव केशवराव गायकवाड, व्यापारी.
१९५७ मध्यें प्रथमच वॉर्ड क्र. १ मधून
न. पा. चे सभासद म्हणून निवड.



सौ. लक्ष्मीबाई जोग

वांई नगरपालिकेच्या वॉर्ड क्र. १ मधून राखीव स्त्री जागेवर सं. म. स. तर्फे निवड. सार्वजनिक कामाची आवड दारुबंदी चळवळीचे कार्यक्रमांत पिकेटिंगमध्यें काम केलें. स्वतःचे घरांत असलेल्या श्री विठ्ठल मंदिरांत स्त्रियांचे सामूहिक सांस्कृतिक कार्यक्रम जातीभेदास थारा न देतां घडवून आणतात. वांई गंगापुरी घाट उत्सव मंडळाच्या गेलीं सहा वर्षे सभासद. पूर्वीच्या काँग्रेस कार्यकर्त्या.
हल्लीं संयुक्त महाराष्ट्रवादी.

कामकाज २४ तास चालूं असतें. हल्लीं या खात्याकडून रिफंड वजा जातां रु. ७१८८७ इतकें उत्पन्न येत असतें. त्याचें दरमाणशीं प्रमाण रु. ३·७५ आहे.

१२ आरोग्य खातें:— शहराचें सार्वजनिक आरोग्य उत्तम राखणें ही नगरपालिकेची महत्वाची जबाबदारी असते. यासाठीं नगरपालिकेनें २० जणांचा एक नोकरवर्ग ठेवला आहे. शहरांत खाजगी शौचकूप एकूण ५६० आहेत. शिवाय नगरपालिकेनें बांधलेल्या सार्वजनिक संडासांची संख्या ६८ आहे. या संडासांची साफसफाई दररोज केली जातें. प्रत्येक मेहेतराकडे सरासरीं ४५।५० संडास सफाईचें काम ठरवून दिलें आहे. सर्व मेहेतर लोक आपापलें सफाईचें काम सकाळीं ६ ते १० वाजेपर्यंत पूर्ण करतात. मैला वहातुकीसाठीं नगरपालिकेनें एक मोटर ठेविली आहे. त्यामधून शहरांतील सर्व डेपोंचा मैला एकत्र गोळा करून तो वांअी शहरांपासून सुमारें दोन मैल अंतरावर असणाऱ्या नगरपालिकेच्या सोनापूर येथील रानांत नेला जातो. या ठिकाणीं मैल्याचें खत तयार करण्यांत येतें. यासाठीं न. पा. नें एक वेगळा नोकर ठेविला आहे.

कंपोस्ट खत तयार करण्यासाठीं नगरपालिकेनें एकूण ९१ खड्डे तयार केले आहेत. दरवर्षी सुमारें १९,००० घनफूट कंपोस्ट खत तयार करणेंत येतें. त्यापासून न. पा. स सुमारें एक हजार रुपये उत्पन्न येत आहे हें खत तयार करण्यासाठीं न. पा. स सुमारें ८०० रुपये खर्च येतो. खताचा प्रचार आतां वाढला असून यापासून आणखी उत्पन्न वाढेल अशी अपेक्षा आहे.

नगरपालिकेचे हद्दींत एकूण तेरा मैल लांबीचे रस्ते बोळ वगैरेसह आहेत. हे सर्व रस्ते दररोज स्वच्छ करण्यासाठीं एकूण वीस झाडू नोकर आहेत. शहरांतील गोळा केलेला कचरा सांठविण्यासाठीं अेकूण ७० कोंडाळीं ठिकठिकाणीं ठेविलीं आहेत. यांत सांठलेला कचरा दररोज मोटारीनें नेणेंत येतो. व त्याचा उपयोग खत तयार करण्याकरितां करण्यांत येतो.

या नगरपालिकेस हल्लीं खाजगी संडास सफाई करण्यासाठीं बसविलेला स्पेशल सॅनिटरी सेसपासून सुमारें ११,३३६ रुपये उत्पन्न येतें. या सर्व संडासांच्या सफाईसाठीं सुमारें १४७२० रुपये खर्च येतो. यांवरून या कामासाठीं नगरपालिकेस सालीना ३३८४ रुपयांची तूट येते हें ध्यानांत येईल. तत्वतः कोणत्याहि प्रकारच्या खाजगी सर्व्हीससाठीं होणारा खर्च हा सर्वच्या सर्व त्यापासून येणाऱ्या उत्पन्नांतूनच पूर्णपणें झाला पाहिजे असें आहे परंतु हल्लींची वस्तुस्थिति मात्र उलट आहे.

१३ भेसळ प्रतिबंधक कायदा:–

सन १९५३ मध्यें वांअी शहरास भेसळ प्रतिबंधक कायदा लागूं करण्यांत आला. या कायद्याची अम्मल बजावणी करण्यासाठीं नगरपालिकेचे सॅनिटरी इन्स्पेक्टर यांचीच फूड इन्स्पेक्टर म्हणून नेमणूक झाली. दूध, लोणी यांमध्यें होणाऱ्या भेसळीला आळा घालण्यासाठीं दूध व लोणी यांचे नमुने प्रयोगशाळेंत तपासण्यासाठीं पाठविण्यांत येतात व ज्या पदार्थांत भेसळ आढळून येईल ते विकणाऱ्या लोकांचेवर खटले करण्यांत येतात.

सन	केलेले खटले (संख्या)	झालेला दंड
५४-५५	३९	रु. १२२४
५५-५६	४१	,, १३२५
५६-५७	३४	,, १७६५
५७-५८	२९	,, १८६५

याप्रमाणें अम्मल बजावणी होत आहे. कायदा लागूं झाल्यापासून कमीतकमी ५ रु दंड व सर्वांत जास्त रु. ३०० दंड झालेला आहे. अशा प्रकारें या कायद्याचें अम्मलबजावणीचें काम चालूं आहे. या


दंडापैकीं ८० टक्के रक्कम नगरपालिकेस मिळणेंची असते.

१४ जन्म व मृत्यु:—


नगरपालिकेमध्यें जन्म मृत्यूच्या नोंदणीस १ जानेवारी १८८३ पासून प्रारंभ झाला. जन्म व मृत्यु नोंदणीबाबत नगरपालिकेनें जरूर ते नियम व पोटकायदे केलेले आहेत.

सन १९४३-४४ पासून जन्म मृत्युचे मागील पंधरा वर्षांचे आंकडे खालीलप्रमाणें आहेत. ते:—


सन	जन्म			मृत्यू		
	पुरुष	स्त्रिया	एकूण	पुरुष	स्त्रिया	एकूण
१९४३।४४	३०५	२६१	५६६	१४९	१४१	२९०
१९४४।४५	३७९	३२६	७०५	१८१	१५०	३३१
१९४५।४६	३०२	२८०	५८२	२३८	२२४	४६२
१९४६।४७	३३१	२७३	६०४	१८०	१९०	३७०
१९४७।४८	३३१	३२६	६५७	१७६	१५७	३३३
१९४८।४९	३५०	३१५	६६५	१६४	१९८	३३२
१९४९।५०	३९४	३५१	७४५	१७०	१३६	३०६
१९५०।५१	३९६	३४३	७३९	१७९	१७७	३५६
१९५१।५२	४३२	३६७	७९९	१५९	१५५	३१४
१९५२।५३	३२६	३७१	६९७	१४८	१३१	२७९
१९५३।५४	३६४	३१२	६७६	१८८	२०६	३९४
१९५४।५५	३१२	३३३	६८५	१२९	११४	२४३
१९५५।५६	३१९	२८२	६०१	१०१	८७	१८८
१९५६।५७	४४१	३३९	७८०	१४५	११५	२६०
१९५७।५८	३३५	३२०	६५५	१४३	१२१	२६४




वांअी नगरपालिकेच्या मॅनेजिंग कमेटीचे चेअरमन व सभासद



वांई नगरपालिकेच्या सॅनिटरी कमेटीचे चेअरमन व सभासद



वांई नगरपालिकेच्या दवाखाना कमेटीचे चेअरमन व सभासद




वांअी नगरपालिकेच्या शाळा कमेटीचे चेअरमन व सभासद




नगरपालिकेच्या कार्यालयाचा सेवकवर्ग



नगरपालिकेच्या जकात खात्याचा सेवकवर्ग



नगरपालिकेच्या आरोग्य खात्याचा सेवकवर्ग



नगरपालिकेच्या दवाखान्याचा सेवकवर्ग

१५ दवाखानें:— वांअी शहरांत वांअी नगरपालिकेचा अेक दवाखाना आहे हा दवाखाना दि. १८ जानेवारी १८६५ पासून सुरू झाला. दवाखान्याचे कामाची तपासणी करणें ब सर्व व्यवस्था पहाणेसाठीं "रुग्णालय समिती" सन १८८८।८९ पासून सुरू झाली. सन १९३५ मध्यें दवाखान्यासाठीं स्वतंत्र नगरपालिकेची इमारत बांधणेंत आली. यापूर्वी जागा भाड्यानें घेतली होती. या नगरपालिकेच्या दवाखान्यासाठीं सरकारकडून मेडिकल ऑफिसरचे पगारा अितकी मदत सुरुवाती पासून मिळत आहे दवाखान्यास सरकारी मेडिकल ऑफिसर नेमलेले आहेत. याशिवाय नगरपालिकेनें एक कंपाउंडर, एक क्लार्क व दोन शिपाई अशा स्वतःचा स्टाफ नेमला आहे. या दवाखान्यांत इन्-डोअर रोग्यांचीहि व्यवस्था केलेली आहे. फक्त प्रसूती गृहाची अुणीव आहे. या दवाखान्यांत अत्यंत गरीब नागरिकांना मोफत औषध पुरविणेंत येतें. इतरांकडून फारच अल्प म्हणजे ०–४–० ०–२–० ०–१–० अशी फी घेणेंत येते. फीचे हल्लीं सरासरीं उत्पन्न रुपये १२०० आहे खर्च सुमारें ९००० रु. होत असतो. या दवाखान्यांत तालुक्यांतील लोकांवर औषधोपचार होत असतो. त्याच्या खर्चाबद्दल जिल्हा लोकल बोर्डाकडून नगरपालिकेस सुमारें १२०० रु. वर्गणी म्हणून मिळतें. शहरांतील सर्व नागरिक या दवाखान्याचा फायदा घेतात.

याशिवाय वांई शहरांत खाजगी तीन हॉस्पिटल्स् व तीन प्रसुतीगृहें आहेत. व आणखी बरेच दवाखाने आहेत. वांई शहरांत वैद्यकीय मदतीची सोय उत्कृष्ठ आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

१६ जनावरांच्या दवाखान्याची सोय:–

वांई नगरपालिकेचा स्वतःचा असा जनावरांचा दवाखाना नाहीं. असा एक दवाखाना येथें जिल्हा लोकल बोर्डाकडून चालविला जातो व त्यासाठीं नगरपालिका जिल्हा बोर्डास नियमाप्रमाणें बसणारीं वर्गणी देते. साधारणपणें १२०० रुपये सालीना वर्गणी बसते.


१७ देवी काढणें:– देवी काढण्याची व्यवस्था नगरपालिकेनें जिल्हा लोकल बोर्डामार्फत केलेली आहे. एक व्हॅक्सिनेटर व एक शिपाई डिस्ट्रिक्ट लोकल बोर्डातर्फे काम पहातात. देवी काढून घेण्यासाठीं तीन निरनिराळीं ठिकाणें ठरविलीं आहेत. व त्या ठिकाणीं निरनिराळ्या दिवशीं काम करणेंत येतें. नगरपालिकेस लोकलबोर्डास लोकसंख्येच्या प्रमाणांत दरवर्षी यासाठीं वर्गणी द्यावी लागते. हल्लीं ही वर्गणी ७१० रुपये द्यावी लागते. या शिवाय नगरपालिकेचा एक स्वतंत्र कारकून या खात्याचीं रजिस्टरें लिहिणें, नोटीसा काढणें वगैरें कामासाठीं नेमला आहे. देवीखात्याचा प्रतिवर्षी खर्च १७९२ रुपये होतो.

१८ मार्केटस् व बाजार:– (अ) भाजी मार्केट


नगरपालिकेचे भाजी मार्केट शहराच्या अगदीं मध्य वस्तींत नगरपालिकेच्या समोरच आहे.या मार्केटसाठीं सन १९५४-५५ सालीं सिमेंट काँक्रीटची स्वतंत्र इमारत बांधण्यांत आली. त्यामध्यें एकूण ५७ गाळे आहेत.व इमारतीबाहेरहि ओटे बांधणेंत आले आहेत. व त्यामध्यें एकूण ५४ गाळे तयार करण्यांत आले आहेत. एकूण १११ गाळे तयार केले आहेत. हे गाळे प्रतिवर्षी लिलावानें भाड्यानें देण्यांत येतात. व लिलावांतून राहिलेलें गाळे मासिक भाडें कार्यकारी समितीकडून ठरवून भाड्यानें दिलें जातात. मार्केटच्या भाड्याचें सरासरी उत्पन्न ३२०० रुपये प्रतिवर्षी नगरपालिकेस मिळतात.

(ब) मटन मार्केट व फिश् मार्केट:–

मटन मार्केटची स्वतंत्र इमारत आहे. त्यांत एकूण दहा दुकानांची सोय केली आहे. प्रत्येक वर्षी



नगरपालिकेच्या आरोग्य खात्याचा सेवकवर्ग



नगरपालिकेच्या दवाखान्याचा सेवकवर्ग

१५ दवाखानें:— वांओ शहरांत वांओ नगरपालिकेचा अेक दवाखाना आहे हा दवाखाना दि. १८ जानेवारी १८६५ पासून सुरू झाला. दवाखान्याचे कामाची तपासणी करणें ब सर्व व्यवस्था पहाणेसाठीं "रुग्णालय समिती" सन १८८८।८९ पासून सुरू झाली. सन १९३५ मध्यें दवाखान्यासाठीं स्वतंत्र नगरपालिकेची इमारत बांधणेंत आली. यापूर्वी जागा भाड्यानें घेतली होती. या नगरपालिकेच्या दवाखान्यासाठीं सरकारकडून मेडिकल ऑफिसरचे पगारा अितकी मदत सुरुवाती पासून मिळत आहे दवाखान्यास सरकारी मेडिकल ऑफिसर नेमलेले आहेत. याशिवाय नगरपालिकेनें एक कंपाउंडर, एक क्लार्क व दोन शिपाई अशा स्वतःचा स्टाफ नेमला आहे. या दवाखान्यांत इन्-डोअर रोग्यांचीहि व्यवस्था केलेली आहे. फक्त प्रसूती गृहाची अुणीव आहे. या दवाखान्यांत अत्यंत गरीब नागरिकांना मोफत औषध पुरविणेंत येतें. इतरांकडून फारच अल्प म्हणजे ०–४–० ०–२–० ०–१–० अशी फी घेणेंत येते. फीचे हल्लीं सरासरीं उत्पन्न रुपये १२०० आहे खर्च सुमारें ९००० रु. होत असतो. या दवाखान्यांत तालुक्यांतील लोकांवर औषधोपचार होत असतो. त्याच्या खर्चाबद्दल जिल्हा लोकल बोर्डाकडून नगरपालिकेस सुमारें १२०० रु. वर्गणी म्हणून मिळतें. शहरांतील सर्व नागरिक या दवाखान्याचा फायदा घेतात.

याशिवाय वांई शहरांत खाजगी तीन हॉस्पिटल्स् व तीन प्रसुतीगृहें आहेत. व आणखी बरेच दवाखाने आहेत. वांई शहरांत वैद्यकीय मदतीची सोय उत्कृष्ठ आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

१६ जनावरांच्या दवाखान्याची सोय:–

वांई नगरपालिकेचा स्वतःचा असा जनावरांचा दवाखाना नाहीं. असा एक दवाखाना येथें जिल्हा लोकल बोर्डाकडून चालविला जातो व त्यासाठीं नगरपालिका जिल्हा बोर्डास नियमाप्रमाणें बसणारीं वर्गणी देते. साधारणपणें १२०० रुपये सालीना वर्गणी बसते.

१७ देवी काढणें:– देवी काढण्याची व्यवस्था नगरपालिकेनें जिल्हा लोकल बोर्डामार्फत केलेली आहे. एक व्हॅक्सिनेटर व एक शिपाई डिस्ट्रिक्ट लोकल बोर्डातर्फे काम पहातात. देवी काढून घेण्यासाठीं तीन निरनिराळीं ठिकाणें ठरविलीं आहेत. व त्या ठिकाणीं निरनिराळ्या दिवशीं काम करणेंत येतें. नगरपालिकेस लोकलबोर्डास लोकसंख्येच्या प्रमाणांत दरवर्षीं यासाठीं वर्गणी द्यावी लागते. हल्लीं ही वर्गणी ७१० रुपये द्यावी लागते. या शिवाय नगरपालिकेचा एक स्वतंत्र कारकून या खात्याचीं रजिस्टरें लिहिणें, नोटीसा काढणें वगैरें कामासाठीं नेमला आहे. देवीखात्याचा प्रतिवर्षीं खर्च १७९२ रुपये होतो.

१८ मार्केटस् व बाजार:– (अ) भाजी मार्केट

नगरपालिकेचे भाजी मार्केट शहराच्या अगदीं मध्य वस्तींत नगरपालिकेच्या समोरच आहे.या मार्केटसाठीं सन १९५४-५५ सालीं सिमेंट काँक्रीटची स्वतंत्र इमारत बांधण्यांत आली. त्यामध्यें एकूण ५७ गाळे आहेत.व इमारतीबाहेरहि ओटे बांधणेंत आले आहेत. व त्यामध्यें एकूण ५४ गाळे तयार करण्यांत आले आहेत. एकूण १११ गाळे तयार केले आहेत. हे गाळे प्रतिवर्षीं लिलावानें भाड्यानें देण्यांत येतात. व लिलावांतून राहिलेलें गाळे मासिक भाडें कार्यकारी समितीकडून ठरवून भाड्यानें दिलें जातात. मार्केटच्या भाड्याचें सरासरी उत्पन्न ३२०० रुपये प्रतिवर्षीं नगरपालिकेस मिळतात.

(ब) मटन मार्केट व फिश् मार्केट:–

मटन मार्केटची स्वतंत्र इमारत आहे. त्यांत एकूण दहा दुकानांची सोय केली आहे. प्रत्येक वर्षीं

लिलांव करून दुकानें भाड्यानें दिलीं जातात.

फिश मार्केटसाठीं स्वतंत्र इमारत नाहीं. परंतु फिश मार्केटची स्वतंत्र जागा ठरविलीं आहे. त्या जागेंत बसण्यासाठीं दररोज १ आणा भाडें विक्रेत्याकडून घेण्यांत येतें.

(क) आठवड्याचा बाजारः— शहरांत प्रत्येक सोमवारीं आठवड्यांतून एकदा बाजार भरतो. यासाठीं नगरपालिकेनें दाणेबाजारांमध्यें बाजाराची सोय केली आहे. सर्व बाजार या ठिकाणीं भरत असतो. यासाठीं नगरपालिकेनें अद्याप जागाभाडें बसविलेलें नाहीं.

याच दिवशीं गुरांचाहि बाजार भरत असतो. न. पा. नें गुरें बाजारांकरितां स्वतंत्र जागा ठरवून दिली आहे. बाजारांत येणाऱ्या प्रत्येक गुरावर नगरपालिका फी घेते.

१९ कोंडवाडेः— नगरपालिकेच्या हद्दींतील कोंडवाड्याची व्यवस्था नगरपालिकेस पहावी लागतें. यासाठीं नगरपालिकेनें स्वतंत्र कोंडवाडा ठेविला आहे. कोंडवाड्याच्या दंडाची रक्कम व जनावराच्या विक्रीची रक्कम प्रथम सरकारी खजिन्यांत भरावी लागते व ती रक्कम सरकारकडून दरवर्षीं ग्रँट रूपानें न.पा.स. परत मिळतें. चारा पाण्याचा खर्च नगरपालिकेस मिळतो.

२० रस्त्यावरील दिव्यांची व्यवस्था—

प्रत्येक नगरपालिकेस रस्त्यांवर दिव्यांची व्यवस्था करावी लागते. हल्लीं रस्त्यावर अिलेक्ट्रिकचे एकूण १६५ दिवे लावले आहेत. त्यांपैकीं तीन मर्क्युरी दिवे मुख्य चौकांतून लावले आहेत. सन १९५५ मध्यें वांअी यथील अिलेक्ट्रीक कंपनीचे लायसेन्स रद्द झाले. त्यापूर्वी शहरांत एकूण २०५ दिवे होते. आतां वांअी शहरांत बाँम्बे अिलेक्ट्रिकसिटी बोर्डाकडून विद्युत पुरवठा नोव्हेंबर १९५५ पासून करणेंत येत आहे. सर्व शहरांत अद्यापी लाईटची सोय झाली नाहीं. बोर्डातर्फे काम चालूं आहे. सर्वत्र दिव्यांची सोय लवकरच होईल. अशी अपेक्षा आहे. हल्लीं नगरपालिका कांहीं भागांत गॅसच्या बत्त्या लावतें. दिव्याकरितां हल्लीं नगरपालिकेस ७२५० रु. खर्च येतो. सर्व दिवे पूर्ण झालेनंतर सुमारें १०,००० प्रतिवर्षी खर्च येईल. लायटिंग टॅक्स पासूनचें उत्पन्न फक्त ५४९६ रु. येते. यावरूनच दिव्यांकरितां किती जास्त खर्च येतो हें लक्षांत येईलच.

२१ उद्यानें— सन १९५४।५६ पर्यंत शहरांत नगरपालिकेचे असें अेकहि सार्वजनिक उद्यान नव्हतें. सन १९५४।५५ मध्यें "श्री छत्रपती शिवाजी उद्यान" नांवाचें विस्तीर्ण उद्यान ब्राह्मणशाही, रामडोहआळी या भागांत तयार करण्यांत आलें. तसेंच सन १९५५।५६ मध्यें गणपतीआळी मध्यें "श्री प्रतापसिंह बालोद्यान" नांवाचे बालोद्यान तयार करणेंत आलें. याशिवाय ब्राह्मणशाहींतील उद्यानाचें उत्तरेस एक बालक्रीडांगण तयार करणेंत आलें असून त्यामध्यें बालकांसाठीं खेळण्याचीं साधनें बसविणेंत आलीं आहेत.


२२ रस्ते— हल्लीं नगरपालिकेच्या हद्दींतील सर्व रस्त्यांची एकूण लांबी १३ मैल ४ फर्लांग आहे. त्यांपैकी सुमारें तीन मैल लांबीचे रस्ते डांबरी केलेले आहेत. २ मैल ४ फर्लांग लांबीचे रस्ते सेकंडक्लास खडीचें केलेले आहेत व ८ मैल लांबीचे रस्ते मुरमाचे आहेत. गेल्या ६-७ वर्षांत या नगरपालिकेनें शहरांतील सर्व प्रमुख रस्ते रुंद केले आहेत आतां अगदीं थोडे रस्ते रुंद होण्याचे आहेत. प्रतिवर्षीं थोडे रस्ते डांबराचे करण्याचें नगरपालिकेनें ठरविलें आहे दरवर्षीं सुमारें १२,००० रुपये रस्त्यासाठीं खर्च केले जातात. नगरपालिकेस टोल उत्पन्न वार्षिक ९००० येतें. या उत्पन्नाचे मानानें न. पा. स. रस्त्यासाठीं



श्री. अनंत वामन विद्वांस, D. C. F., L. S. G. D.
१९४७ पासून वांई नगरपालिकेचे सेक्रेटरी. पूर्वी १९३०-३१ सालीं सोलापूर नगरपालिकेंत सब् ओव्हरसिअर, १९३२ ते १९४६ चिपळूण नगरपालिकेंत ओव्हरसिअर व सॅनिटरी इन्स्पेक्टर. (जन्म २०-५-१९०६)




श्री श्रीपाद दत्तात्रय माजगांवकर, D. C. E.
वांई नगरपालिकेचे माजी सेक्रेटरी व हल्लीचे ओव्हरसिअर. डिस्ट्रिक्ट लोकल बोर्ड, सातारा सब्‌डिव्हिजनल ऑफिसर.



श्री अच्युत गोविंद खटावकर, L. S. G. D.
नगरपालिकेचे हेडकारकून व अकाऊंटंट.



श्री. विठ्ठल श्रीपती खडसरे
नगरपालिकेचे जकात अधिकारी.



श्री. रामचंद्र पर्बती जमदडे
नगरपालिकेचे जकात अधिकारी.



श्री. शरदचंद्र विश्वंभर केसकर
नगरपालिकेचे पहिले क्वालिफाईड सॅनिटरी
व फूड् इन्स्पेक्टर.

जास्त खर्च करावा लागतो. तसेंच रस्त्यावर दुतर्फा झाडें लावण्याचें काम नगरपालिका दरवर्षी होणाऱ्या वनमहोत्सवाचे वेळीं करीत असतें.

२३ प्राथमिक शिक्षण:– सन १८७५ पासून वांओ शहरांमध्यें नगरपालिकेमार्फत शिक्षणाची सोय झाली असें आढळून येतें. प्राथमिक शिक्षणाची व्यवस्था सन १९२४-२५ सालापर्यंत नगरपालिकेकडे होती. यापुढें नगरपालिकेनें शाळेंच्या खर्चाचा बोजा उत्पन्नाच्या मानानें वाढल्यानें सदरच्या शाळा बोर्डाच्या ताब्यांत द्याव्यात असें ठरविलें. व तेव्हां पासून सर्व प्राथमिक शाळा बोर्डाच्या ताब्यांत आहेत. नगरपालिकेतर्फे प्राथमिक शिक्षणाची वर्गणी म्हणून दरवर्षी सुमारें १४०००।– रुपये बोर्डास दिलें जातत वांओ शहरांतील सर्व प्राथमिक शिक्षणाची व्यवस्था डिस्ट्रिक्ट स्कूल बोर्ड पहातें. नगरपालिकेनें एक शाळा समिती म्हणून पांच सभासदांची समिति नेमली आहे. ही समिती वांओ शहरांतील प्राथमिक शिक्षणाबाबतच्या गरजा व सोयी याबाबत डिस्ट्रिक्ट स्कूल बोर्डास सूचना करीत असते.

२४ वाचनालयें:– वांओ नगरपालिकेचें स्वत:चें असें वाचनालय नाहीं, परंतु ही अूणीव वांओ शहरांत 'लो टिळक ग्रंथ संग्रहालय' नांवाचें मोठें वाचनालय आहे; त्या वाचनालयास नगरपालिका प्रतिवर्षी देणगी म्हणून १२५।– रुपये देऊन भरून काढीत असतें.

२५ देणग्या:– नगरपालिका वांइतील खालील संस्थांना शक्य तेवढ्या देणग्या देते. सन १९५७-५८ मध्यें दिलेल्या देणग्या खालीलप्रमाणें आहेत.

नांव	रुपये
(१) कन्याशाळा	१००
(२) महर्षि शिंदे विद्यालय	१००
(३) वांई व्यायाम शाळा	१००
(४) महिला स्नेहसंवर्धक समाज	२००
(५) बालकमंदिर	२००
(६) बहि:शाल शिक्षण केन्द्र	२५
(७) टिळक ग्रंथसंग्रहालय	१२५
एकूण—	८५०

वांई नगरपालिकेची पाणीपुरवठा योजना

कोणत्याहि शहरांतील नागरिकास शुद्ध पाण्याचा पुरवठा करणें हें नगरपालिकांच्या कर्तव्यापैकीं एक महत्वाचें कर्तव्य होय.

वांई शहरांस अद्यापि आधुनिक पद्धतीनें पाणी पुरवठा नाहीं. सध्यां शहरांतील पाणीपुरवठा हा घरोंघरीं असलेल्या विहिरी व कृष्णा नदी यापासून होत असतो. सदर पाणी अशुद्ध व दूषित असतें. व त्यापासून एनटेरिक ताप, डायरिया व कॉलरा यांसारखे रोग निर्माण होतात. या रोगांपासून बहुधा शहरास उपसर्ग होत असतो. शहराचें आरोग्य हें पाणी पुरवठ्यावरच अवलंबून असल्यानें शहरांस शुद्ध व चांगलें पाणी पुरविणेंची योजना करून मिळणेस नगरपालिकेनें सरकारबरोबर बराच पत्रव्यवहार सन १९४६ पासून केला. सदर योजनेची मोजणी, प्लॅन्स व खर्च अंदाजपत्रकासाठीं नगरपालिकेनें आजपर्यंत अंदाजें ८००० रुपये खर्च केलें. शहरासाठीं आंसपास कोठून चांगलें व भरपूर पाणी मिळेल याचा तपास सरकारी स्थापत्य विशारदांकडून करणेंत आला. व शेवटीं सदर खात्यानें मेणवली जवळ जो "कोळन" म्हणून भाग समजला जातो त्या ठिकाणाजवळ नदींतून हें पाणी बाजूस कांठांवर आणून तें तेथून वांई गांवाकडे आणण्याची योजना सरकारी स्थापत्य विशारदांनीं नक्की केली. आतां सदर कामाची योजना पुरी झाली आहे. प्लॅन्स, खर्च व अंदाजपत्रकें सरकारनें पसंत केलीं आहेत. नगरपालिकेनें सदर योजना

पसंत करून मंजूर केली आहे. या कामीं येणारे खर्चाची निम्मी रक्कम नगरपालिकेनें स्वत:ची (स्वत:चे नेहमीचे उत्पन्नांतून अगर कर्ज काढून) सरकारकडे भरणेची असून या कामीं बाकीची निम्मी (म्हणजे ५० टक्के) ही सरकारकडून मदत (ग्रँट) म्हणून मिळणार आहे.

योजनेची रूपरेषा:- वांई शहराची लोकसंख्या सध्यां (१९५१ चे शिरगणतीप्रमाणें) १६०९९ आहे. माणशीं रोज पंधरा गॅलन्स पाणी पुरविणेंत येईल असें या योजनेंत गृहींत धरलें आहे. सन १९६१ सालीं वाई शहराची लोकसंख्या २०,००० होईल असा अंदाज व ती सन १९८१ सालीं ही संख्या २५,००० पर्यंत होईल असें अंदाजिलें आहे.

पाणी पुरवठ्यासाठीं अगोदर मेणवली जवळ कृष्णा नदीस बंधारा बांधण्याची कल्पना होती. मात्र या कामासाठीं तपासणीचे वेळीं योग्य जागीं जमीनींत भोकें (बोअर्स) पाडली असतां फाऊंडेशन फार खोल व असमाधानकारक आढळले वरून वरील बंधाऱ्याची योजना रद्द करणेंत आली. सध्या शहरांत जो पाणी पुरवठा होतो तो माणशीं ५ गॅलन्स होत असल्याचें आढळून आलें आहे. नवीन योजिलेलें पाणी पुरवठ्याचे योजनेमध्यें पहिल्या स्टेजचे वेळीं म्हणजे १९६१ मध्यें माणशीं पंधरा गॅलन्स पाणी मिळेल व दुसरें स्टेज (टप्पा) मध्यें म्हणजे १९८१ मध्यें माणशीं वीस गॅलन्स पाणी मिळेल असा अंदाज आहे.

कृष्णा नदींतून हेडवर्क्सचे ठिकाणाकडें पाणी घेणेसाठीं जी जागा ठरविली आहे. ती हेडवर्क्सची जागा वांई शहराचे हद्दीजवळ वांई रि. स. क्र. १३६ मध्यें योजिली आहे. या ठिकाणीं उन्हाळ्यांत नदीमध्यें साधारणपणें २ फूट पाणी असतें. सदर हेडवर्क्सचें ठिकाण वांई गांवापासून १ ते १½ मैल अंतरावर आहे. वरील रि. स. क्र. १३६ जवळ नदीमध्यें एक आठ फूट व्यासाची विहीर (इन टेक वेल) बांधणेंत येईल. या विहीरीचे तळापासून १२ इंच व्यासाचे एका नळानें या विहीरींतील पाणी या ठिकाणचे तीरावरील हेडवर्क्सचे जागेंत एका १० फूट व्यासाचे 'जॅक वेल' नांवाचे विहिरींत उतार नळानें आणणेंत येईल. या जॅकवेलची खोली ४२ फूट असणार आहे. या विहिरीवर बसविणेंत येणारे १५ ब्रेक हॉर्सपॉवर्सचे एंजिनानी चालविले जाणारे पंपांनीं पाणी वर खेचून ते ९ इंच व्यासाचे नळानें सेटलिंग टँक्सकडे शुद्ध करणेसाठीं नेलें जाईल व नंतर सेटलिंगटँक्स मधून सदर पाणी या पाणी पुरवठा योजनेंतील दुसरें स्टेजमध्यें बांधणेंत येणारें फिल्टर्सकडे नेलें जाईल. फिल्टर्सची योजना पहिले स्टेजमध्यें नाहीं. (फिल्टर्समध्यें अगर नुसता क्लोरिन डोस दिलेवर) ते ४० ब्रेक हॉर्स पॉवरचे एंजिनांनीं चालणारें पंपानीं गावांत सलोह सीमेंट काँक्रीटचे एका मोठ्या व बरेच उंचीवर बांधणेंस येणारें टाकींत सोडणेंत येईल. (सदर टाकीची उंची जमिनी पासून अंदाजे ४४ फूट राहील. ही टाकी शहरांतील पाणी पुरवठ्याचा मुख्य सांठा (रिझरवॉयर) म्हणून होईल. या टाकी पासून गावांतील सर्व भागांस (वॉर्ड क्र ४ व ५ शिवाय) नळाचें (डिस्ट्रीब्यूशन सिस्टीमनें) पाणी पहिल्या स्टेजमध्यें पुरविलें जाणार आहे. नागरिकांस खाजगी कनेक्शन्स देऊन पाणी पुरवठा केला जाईल. तसेंच गांवांत सार्वजनिक नळ (स्टँड पोस्टस) ठेवणेंत येतील व शिवाय गावांत फायर हायड्रंटस्, गुरास पाणी पिण्यासाठीं टाक्या वगैरेंचीहि तरतूद करण्यांत येणार आहे. याशिवाय नदीचे उजवे बाजूस (नदी शहर भागांतून जातांना) असलेले शहराचे भागांस पाणी पुरवठा करणेंस या बाजूस एक दुसरी टाकी (सबसिडीअरी टँक) ५०,००० गॅलन्स साठ्याची बांधणेंत येईल व त्यासाठीं मुख्य सांठ्यापासून (रिझरवॉयर पासून) स्वतंत्र ६ इंच व्यासाचा त्रिडाचा नळ

- वाई शहर पाणी पुरवठा योजनेचा नकाशा —


टिपा :—

१) पाणी आत घेणेची विहीर (२) १२" व्या. जोडणारा नळ (३-४) पाणी शुद्धी करण भाग


५) पाणी फिल्टर योजना (दुसरे टप्यातील) (६) टाकीत पाणी भरणारा मुख्य नळ

७) एक लाख गॅलनचे साठवाची टाकी (८) दुसरे टप्यातील योजिलेला नळ

९) दुसरे टप्यातील मुख्य टाकी.



BY
- S.D. MAJGAONKAR
DVEKSEEJ,
WAI MUNICIPALITY
24/X/58



नगरपालिकेच्या रस्ते सफाई विभागाचा सेवकवर्ग

आणि त्यांचे वसतिस्थान .....



नगरपालिका कामगार वसतिगृह

टाकणेत येईल. मात्र सदर टाकी बांधणें व नळ घालणें हीं कामें दुसरें स्टेजमध्यें योजिलेलीं आहेत. हेडवर्क्सचे जागेवर एंजिनिअर, फिटर, चावीवाला वगैरेंसाठीं क्वार्टर्स बांधणेचीहि तरतूद या योजनेंत आहे.

या योजनेचे खर्चाचा तपशील–स्टेज पहिली. याचा खर्च अंदाजें रु. ६६८३८० इतका असून या टप्यांत खालील प्रमाणें कामांचे खर्च होणार आहेत तीं कामें–

(१) प्रत्यक्ष कामाचे वेळची मोजणी

(२) ८ फूट व्यासाची नदींत विहीर 'इनटेक वेल' यांत पाणी घेणेसाठीं

(३) वरील विहीर व बाजूंचे कांठावरील जमिनींत बांधणेत येणारे जॅक वेल यांस जोडणारा उतार नळ.

(४) १० फूट व्यासाची जॅक वेल ४२' खोलीची

(५) वरील विहिरीवर एंजिन हौस ३५'×२५' साइजचें तसेंच या वेलवर १५ ब्रेक हॉर्स पावसेंचीं एंजिनें बसविणें वगैरे.

(६) सेटलिंग टँक्समध्यें पाणी नेणारा ९" व्यासाचा नळ

(७) सेटलिंग टँक्स ५०'×३०' साईजची व क्लोरिनेशनची व्यवस्था

(८) शुद्ध पाण्यांची टाकी ३१'×१३' साईजची (संक वेल) व यावरील एंजिन हौस ४२'×२०' साईजचें

(९) ४० ब्रेक हॉर्स पॉवरचीं एंजिनें व पाणी खेचणारा पंप बसविणें.

(१०) ७००० फूट लांबीचा बिडाचा नळ (६ इंच व्यासाचा) शुद्ध पाणी गांवांतील मुख्य सांठ्याकडे नेणारा.

(११) १,००,००० गॅलन्स सांठ्याची रीइन्फोर्स्ड सिमेंट कॉंक्रीटची जमिनीपासून साधारणपणें ४४ फूट उंचीवरील टाकी बांधणें.

(१२) गांवांतील नळ घालणें, (१३) नोकर वसतिगृहें

(१४) जमीन खरेदी, टूल्स, प्लँटस् व एस्टॅब्लिशमेंट वगैरेंचा खर्च अशीं कामें पहिलें टप्यांत होतील.

स्टेज क्र. २

याचा खर्चाचा अंदाज रु. ३,७३,७५० असा आहे. व तो खालील कामावर होणार आहे. तीं कामें —

(१) फिल्टर्स बांधणें, यंत्रसामुग्रीसह (२) पाणी शुद्धी गृह, (३) दुय्यम (सब् सिडिअरी) टाकी ५०,००० गॅलन्सची नदीचे उजवे बाजूकडे (४) वॉर्ड ४ व ५ यांत पाणी पुरविणारे नळ घालणें. (५) मुख्य मोठ्या टाकीपासून दुसरें दुय्यम टाकीकडे नेण्यास ६ इंच व्यासाचा नळ घालणें. (६) एस्टॉब्लिशमेंट व टूल्स प्लँटचा खर्च वरीलप्रमाणें दुसऱ्या स्टेजची माहिती आहे.

दोनहि टप्यांचे मिळून एकूण कामाचा अंदाज खर्च (१ ला टप्पा रु. ६,६८,३८० व २ रा टप्पा रु ३,७३,७५०) एकूण १०,४२१३० रु. असा आहे.

वरील योजनेमुळें नगरपालिकेवर पडणारा खर्चाचा बोजा व उत्पन्न याची माहिती खालीलप्रमाणें आहे.

वरील स्कीमपैकीं १ लें टप्याचे कामामुळें खालील खर्चाचा अंदाजी बोजा पडणार आहे.

(१) खर्च अंदाज ६,६८,३८० पैकीं निम्मी रुपये ३,३४,१९० रकमेचे कर्जावर ४॥ टक्के दरानें बसणारें व्याज —	१५०३८
(२) कर्ज (मुद्दल) फेडणेस दर वर्षीं बाजूस काढून ठेवावी लागणारी रक्कम (सिंकिंग फंड)	१७३११
(३) वार्षिक सांभाळ व दुरुस्ती खर्च	२६५८१
(४) मशिनरी नवीन घेणेस बाजूस टाकणेचा फंड	८८४६
एकूण —	६७७७६

वरीलप्रमाणें या १ लें टप्याचे होणारें कामावर रु. ६७७७६ रकमेचा वार्षिक बोजा बसणार आहे.

वरील खर्चाची तोंडमिळवणी खालीलप्रमाणें करणेंचें योजिलें आहे.

(१) गांवांत साधारणपणें ९०० खाजगी कनेक्शन्स होतील त्यांस प्रत्येकी ३६ रु. वार्षिक चार्ज प्रमाणें ३२४००

(२) जनरल वॉटररेट २४०० प्रॉपर्टीजवर घरटी वार्षिक ५ रु. प्रमाणें १२०००

(३) प्रॉपर्टीटॅक्स वाढविल्यापासून वाढलेलें वार्षिक उत्पन्न १४५००

(४) इतर फंडांतून करावा लागणारा खर्च ९०००

एकूण ६७९००


वरील प्रमाणें तोंडमिळवणी नगरपालिका करणार आहे.

योजनेची प्रगतिः– सरकार कडून आलेली ही योजना पसंत झाली व या योजनेसाठीं कर्ज मंजुरी दिली व त्याप्रमाणें सरकारकडे कर्ज रु. ३,३४,१९० काढणेस पहिला अर्ज एप्रील १९५५ मध्यें करणेंत आला. त्या नंतर बराच पत्रव्यवहार होऊन पुन्हां दुसरा अर्ज एप्रील १९५७ मध्यें करणेंत आला. सदर अर्जावरून कर्ज काढणेस मंजुरी अद्यापि येणेची आहे. तसेंच या कामावर सरकारी मदत ५० टक्के मिळणेसाठीं मागणी १९५५ मध्यें सरकारकडे करणेंत आलेली आहे. त्यांस अद्यापि मंजुरी येणेची आहे.

पाणी पुरवठ्याचे मंजूर दरः–पाणी पुरवठ्याबाबत नगरपालिकेने कानू व पोटकायदे केलेले असून ते माननीय डायरेक्टर ऑफ लोकल ॲथॉरिटीज मध्यभाग पुणें यांचे पत्र क्र. वाई ६।२७ दि. २८।७।१९५६ नें मंजूर झालेलें आहेत. सदरप्रमाणें कनेक्शनची वार्षिक फी रु. ३६ व सर्वसाधारण पाणी कर (जनरल वॉटररेट) प्रत्येक घरावर ५ रुपये असा मंजूर झालेला आहे. योजना पूर्ण होण्यास १।। ते २ वर्षें अवधि लागेल. योजना पूर्ण होऊन ती अमलांत आल्यानंतर सदर कानू व पोटकायदे अमलांत येतील.

वांई शहरांत पडलेला वर्षवारी पाऊस


सन	किती इंच पाऊस पडला
१९१३	२४·२८
१९१४	३५·७५
१९१५	३८·१६
१९१६	३३·२९
१९१७	२९·०६
१९१८	१३·७१
१९१९	२४·९९
१९२०	२५·३१
१९२२	२७·११
१९२३	२२·११
१९२४	२१·५९
१९२५	१७·८३
१९२६	२४·७५
१९२७	२९·५२
१९२८	२३·३९
१९२९	३२·८२
१९३०	३४·१०
१९३१	२९·७०
१९३२	४१·७१
१९३३	४४·७७
१९३४	२८·५५
१९३५	२६·३८
१९३६	२०·४१
१९३७	३२·०२
१९३८	३३·९९
१९३९	१८·८९
१९४०	३८·२०
१९४१	२१·२६



नगरपालिकेच्या आरोग्य खात्यांतील सेवकवर्ग




नगरपालिकेच्या आरोग्य खात्यातील स्त्री सेवकवर्ग




श्री. राजाभाऊ बनारसवाले, वांई.

वांईतील कुटुंब नियोजन कार्याचे (१९३५) पहिलें पुरस्कर्ते. स्वावलंबनानें व्यवसायास सुरुवात करून प्रसिद्धी पावलेले वांईचे कारखानदार.



श्री. विष्णू गणेश ऊर्फ बाबूराव देशपांडे

वांईचे नाटककार एक हौशी नट व दिग्दर्शक. 'उमाजी नाईक' 'महासति वृंदा' इ. नाटकांचे लेखक.



श्री. शंकर विष्णू बोपर्डीकर

नगरपालिकेचे माजी सेक्रेटरी



कै. गं. के तथा अप्पाशास्त्री सोहनी

पारतंत्र्याचे काळांत देशाची सेवा करणारे निष्ठावंत काँग्रेस कार्यकर्ते. प्रत्येक स्वातंत्र्य आंदोलनाच्या चळवळीमध्यें प्रमुख भाग.

सन	किती इंच पाऊस पडला	सन	किती इंच पाऊस पडला
१९४३	३५·६९	१९५०	३३·८२
१९४४	३६·४४	१९५१	१९·८६
१९४५	२२·४४	१९५४	३१·६७
१९४६	३२·५९	१९५५	३३·५९
१९४७	२०·०३	१९५६	७४·६९
१९४८	३०·७८	१९५७	५९·९४
१९४९	२२·६३		

कांहीं नवीन उपक्रम

(१) कुटुंब नियोजनः– १९५७ सालीं नोव्हेंबर महिन्यांत 'कुटुंब नियोजन सप्ताह' पाळण्यांत यावा अशाबाबत सरकारी अनुज्ञा निघाली. त्यावेळीं सभा, व्याख्यानें असा कार्यक्रम करून कुटुंब नियोजनाचें महत्व समाजाला समजावून द्यावें असा उद्देश होता. परंतु सभा, व्याख्यानें यापेक्षां प्रत्यक्षांत कांहींतरी भरीव कार्य करून प्रजा वाढीला आळा घालण्याचा मार्ग काढावा असा विचार प्रवाह सुरु झाला. व त्याबाबत प्रत्यक्ष कार्य सुरू करण्याचें दृष्टीने प्रयत्न सुरु केलें.

कुटुंब नियोजनासाठीं स्त्री अगर पुरुष यांच्यावर एक विशिष्ट प्रकारची शस्त्रक्रिया करण्यांत येते. स्त्रियांचेवर करावयाची शस्त्रक्रिया ही मोठ्या स्वरुपाची असल्यानें त्या मार्गाचा अवलंब न करतां पुरुषांवरील शस्त्रक्रिया ही अत्यंत सोपी, थोड्या वेळांत व अल्प साधनांत विनासायास होणारी गोष्ट असल्यानें या प्रकारची शस्त्रक्रिया करण्यास पुरुषवर्गास प्रोत्साहन देणें व अल्प खर्चांत ही शस्त्रक्रिया करणें हाच मार्ग प्रजा वाढीला बंधन घालणारा असल्यानें या गोष्टीचा प्रचार करण्यास सुरुवात करण्यांत आली.

प्रथमतः अशा प्रकारची शस्त्रक्रिया करण्याचें कार्य येथील मिशन हॉस्पिटल बरोबर विचार विनिमय करून हॉस्पिटलमध्यें करण्याचें ठरवून ज्या लोकांना ऑपरेशन करण्याचे आहे त्यांना अल्प खर्चांत म्हणजे ५ रु. अगर १० रु या प्रमाणांत हें ऑपरेशन करण्याचें कार्य सुरू केलें. मात्र ही व्यवस्था नगरपालिकेमार्फत जाणाऱ्या लोकांचेसाठींच होती व आहे. यामुळें ज्या लोकांची पैसे खर्च करण्याची ऐपत होती असे लोक पुढें आले, व त्यांनीं ऑपरेशन्स करून घेतली.

कुटुंब नियोजनाचा हा मार्ग चालूं असतांनाच मा. अध्यक्ष यांना एक कल्पना सुचली ती म्हणजे ज्याप्रमाणें नेत्रयज्ञ करतात तसाच या शस्त्रक्रियेचा यज्ञ (Vasectomy Camp) करण्याची कल्पना सुचली व त्याला मा. जिल्हा आरोग्याधिकारी यांनीं संमती दाखविली आणि या कार्याची प्रत्यक्ष कार्यवाही करण्याचा प्रयत्न सुरू झाला.

ही नवीन कल्पना वाईकरांना मानवते कां नाहीं व त्यांस कितपत सहाय्य मिळणार या विचारांत आम्ही होतो. वरील कँपची शहरांत प्रसिद्धी केल्यानंतर ऑपरेशनसाठीं नांवें येऊं लागली. या ऑपरेशनसाठीं सुमारें २५ नांवें येतील अशी

अपेक्षा होती परंतु नगरपालिकेकडे मात्र १०० लोकांची नोंद झाली ! कँप फक्त १८, १९, व २० मे १९५८ तीनच दिवस असल्यानें या तीन दिवसांत फक्त पन्नास ऑपरेशन्स यशस्वी तऱ्हेनें पार पाडण्यांत आली व अपुऱ्या वेळेमुळें नोंदलेलें ५० व अेनवेळीं आलेले ५० असें शंभर लोक परत पाठवावें लागलें. यावरून हा पहिलाच कँप किती यशस्वी झाला व यांस जनतेचा किती पाठिंबा आहे हेहि सिद्ध झालें. कँप यशस्वी पार पाडण्यामध्यें सरकारी जिल्हा आरोग्यखातें व व वांअींतील बहुतेक डॉक्टर्स यांचें मोलाचें सहाय्य झालें आहे.

कॅम्प झाल्यानंतर दोन दिवसांत याची माहिती टाइम्स आदि सर्व वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाली. व सगळीकडून निरनिराळ्या माहितींचा व प्रश्नांचा पत्र रुपानें भडीमार सुरू झाला. आरोग्य मंत्री ना. कन्नमवार हे त्यावेळीं महाबळेश्वरला होते. त्यांना ही वार्ता समजतांच ते वांईस आले, व नगरपालिकेस भेट देऊन या कार्याबद्दल त्यांनीं नगरपालिकेस धन्यवाद दिले. व या कार्यास १०० टक्के ग्रँट देण्याचें आश्वासनहि दिलें.

कुटुंब नियोजनाबाबत अशा प्रकारची शस्त्रक्रिया करण्याचा कॅम्प सर्व भारतांत वांई नगरपालिकेनेंच प्रथम केला असें म्हटल्यास तें अतिशयोक्तिचे होणार नाहीं.

दी टाइम्स ऑफ इंडिया या जगप्रसिद्ध पत्रानें दि. १७ जून १९५८ चे अंकांत खालीलप्रमाणें याबाबत माहिती दिली आहे.

PRACTICAL HELP

" Wai at the foot of Mahableshwar is a small town and its population is inclined to be conservative. But it offers another proof of how mistaken is the belief that villagers and small-town people do not take kindly to family planning schemes.

The local municipality, as its President pointed out in Readers' Views the other day, provided facilities for sterilisation and as many as fifty men availed of these. This method of controlling the size of families is bound to catch on. In Kerala the Government has offered to pay Rs. 25 to each person who gets himself sterilised provided his monthly income does not exceed Rs. 250.

Such rewards are indeed not necessary. All that is required is vigorous propaganda, the supply of cheap but safe contraceptives and the provision of facilities for sterilisation. Unfortunately, few State Governments show any sense of urgency in popularising schemes for family planning."

टाईम्समध्यें वरील स्फुट प्रसिध्द झाल्यानंतर दि डायरेक्टर जनरल ऑफ हेल्थ सर्व्हिस, दिल्ली यांचेकडून या शस्त्रक्रिया कँपबद्दल निरनिराळ्या तऱ्हेची विचारणा झाली व या कामाबद्दल त्यांनीं आनंद व्यक्त केला. त्याचप्रमाणें गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणें व किर्लोस्कर मासिक यांचेकडून या कँपची माहिती विचारण्यांत आली. त्यांनीं व इतर अनेकांनीं या कामाबद्दल नगरपालिकेस धन्यवाद दिलें.

अशा तऱ्हेनें या कँपमुळें सर्व भारतांत कुटुंब-नियोजनाचें कार्याला एक वेगळेच वळण लागलें. वांई शहरांत एक कुटुंबनियोजन केन्द्र [Family Planning Centre] सुरु करावें अशी कल्पना वांई नगरपालिकेचा पहिला कँप अत्यंत यशस्वी झाल्यामुळें निर्माण झाली व त्यानुसार पुढील सूत्रें

हलूं लागली.

वांई नगरपालिका नवीन कुटुंबनियोजन केंद्र सुरू करण्यास तयार असून त्यासाठीं कांहीं सरकारी मदत मिळतें कां वगैरें बाबत संबंधी अधिकाऱ्यांकडे पत्रव्यवहार केला. त्यावरून अशा केंद्रास केंद्र सरकारकडून खास मदत (Special Grant) मिळते असें समजलें. एवढीं माहिती मिळाल्यावर नगरपालिकेनें नवीन कुटुंबनियोजन केंद्र काढण्यासाठीं सरकारकडे योग्य अधिकाऱ्यामार्फत ग्रँट-इन्-एड् मिळण्यासाठीं प्रपोजल १५-९-५८ चे सुमारास मुंबई राज्यामार्फत केंद्र सरकारकडे पाठविलें व मुंबई राज्यानें वांई नगरपालिकेस जरूर ती ग्रँट मंजूर करण्याबाबत केंद्र सरकारकडे शिफारस केली.

या शिफारसीवरून व वांई नगरपालिकेनें केलेलें महत्वपूर्ण कार्य लक्षांत घेऊन केंद्र सरकारनें नगरपालिकेस नवीन कुटुंबनियोजन केंद्र सुरू करण्यास नुकतीच रु. ४०५० ची ग्रँट मंजूर केली आहे; त्याबद्दल सरकारला धन्यवाद द्यावेत तेवढें थोडेंच आहेत.

वांई नगरपालिका आतां नवीन कुटुंबनियोजन केंद्र लवकर सुरू करीत आहेच. वांई नगरपालिकेच्या गेल्या शंभर वर्षांच्या इतिहासामध्यें या गोष्टीचें महत्व अनन्य साधारण आहे, ही गोष्ट नमूद करण्यास आम्हांस आनंद होतो.

२ मोफत औषध वांटप योजनाः– सन १९५८ सालांपासून वांई नगरपालिकेनें गरीब नागरिकांचे-करितां मोफत औषध देण्याची योजना सुरू केली आहे. क्षयरोगांवर द्यावी लागणारीं इंजक्शन्स् फार महाग असतात. व तीं गरीब जनतेस परवडतहि नाहींत. त्याचप्रमाणें टॉईफाईडवरील उपयुक्त ज्या गोळ्या आहेत त्याही महाग आहेत. व त्या घेणेहि गरिबांस परवडत नाहीं व त्यांची कुचंबणा होतें, असें नेहमीं निदर्शनास येतें. क्षयरोग्यांची संख्याहि जास्त आहे. तसेंच शहरांत टॉईफाईडहि वरचेवर होत असतो. गरीब नागरिकांस अगदीं जरुरीचे वेळीं औषध मिळाल्यास रोगी वांचण्याची शक्यता असते. परंतु हीं औषधें विकत आणून घेण्याची परिस्थिति नसल्याकारणानें नागरिक औषध घेत नाहींत. अशा नागरिकांना कांहीं अटीवर हीं औषधें मोफत देण्याची पद्धत आक्टोबर १९५८ पासून सुरू केली आहे. कांहीं अटी घालण्याचा उद्देश असा कीं, योजनेचा गैरफायदा घेतला जाऊं नये. हा एक स्तुत्य उपक्रम म्हणून नागरिक नगरपालिकेस धन्यवाद देत आहेत.

३ दूध वांटप केंद्रः– हल्लींच्या ह्या महागाईच्या काळांत कित्येक नागरिकांना आपल्या मुलांना दुधासारखें पौष्टिक व आवश्यक असें पूर्णान्न देतां येत नाहीं. ही गोष्ट नाकारून चालणार नाहीं. या करितां सरकारमार्फत चालणाऱ्या दूध वांटप योजनेमधून दूध मिळाल्यास तें गरीब मुलांना वाटण्याचें केंद्र सुरू करणेस नगरपालिका तयार असून त्या बाबतची सर्व व्यवस्था केली जाईल, असा पत्रव्यवहार नगरपालिकेनें केला. त्यांस यश येऊन सरकारी दूध वांटप योजनेमधून नगरपालिकेस केन्द्र सुरू करण्यास परवानगी मिळाली. सुरुवातीस २५ पौंड वजनाचे ४० डबे नगरपालिकेकडे पाठविण्यांत आले. नगरपालिकेच्या कामाचा व्याप सांभाळून हें नवीन केंद्राचें काम करणें जरा कठीण वाटलें. सबब केंद्राचो व्यवस्था व दररोज दूध तयार करून वांटप करण्याचें काम करण्यास वांईतील एखादी संस्था तयार आहे कां याचा विचार विनिमय केला. वांई व्यायाम शाळेचे संचालक श्री. महेश्वर सखाराम जोग यांनीं ही व्यवस्था पहाणेचे कबूल केलें. इतकी तजवीज झालेवर हें केंद्र दि. २१ आक्टोबर १९५८ मंगळवार रोजीं विजयादशमीचे सुमुहूर्तावर

माननीय आ. ना. फावडे प्रान्त ऑफिसर महाबळेश्वर डिव्हिजन, यांचे हस्तें उद्घाटन करून सुरू करण्यांत आलें. या योजनेचा फायदा १४ वर्षांच्या आंतील मुलें सुमारें १००-१२५ घेत आहेत. मुलांचे वजन, उंची, छाती या बाबतींत नोंद ठेवली असून मुलांच्या आरोग्यांत काय फरक होतो त्याची माहिती ठेवण्याची व्यवस्था केली आहे. पुढील हप्त्याचें दूध आल्यावर मुलांचे संख्येंत वाढ होण्याची शक्यता आहे. अत्यंत गरीब मुलांनाच या योजनेचा फायदा दिला जात आहे. या योजनेची व्यवस्था पहाण्याचें कार्य वांअी व्यायाम शाळेचे संचालक श्री. जोग यांनीं पत्करलें याबद्दल त्यांना धन्यवाद देणें उचित होईल

Salary Savings Scheme:–

विद्यमान महर्गतेच्या काळांत सक्तीची आर्थिक बचत करणें अेरवीं नगरपालिकेच्या सेवकांना अशक्य झालें असतें. परंतु या आर्थिक बचतीची आवश्यकता मात्र पुरेपूर पटत होती. या दृष्टीनें सर्व सेवकांची सभा घेण्यांत येऊन त्यांना या बचतीचें महत्व विशद करण्यांत आलें. लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशन ऑफ् इंडिया, शाखा सातारा यांचे संबंधीं अधिकारी श्री. काशीकर, श्री. आप्पासाहेब देशपांडे व श्री. अध्यापक यांनीं या बाबतीची माहिती (Salary Savings Scheme) सुबोध रीतीनें सेवकांपुढें मांडली व सेवकवर्गानें या योजनेचें स्वागत करून दरमहाचे पगारांतून भावी जीवनासाठीं सक्तीची आर्थिक बचत करण्यास विम्याचे रूपानें सुरुवात केली

संकल्पित योजना

(१) आणखी कांहीं महिन्यातच वांईतील अगदीं कांहीं लहान परंतु गरीब मुलांना व्हिटॅमिनच्या शक्तिवर्धक गोळ्या मोफत वाटण्याची योजना विचारांत असून तत्संबंधीं पत्रव्यवहारहि चालू आहे.

(२) लहान मुलांच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या दृष्टीनें वांई नगरपालिका लवकरच एक चाइल्ड वेलफेअर सेंटर सुरू करणार आहे.

(३) सौंदर्याचें दर्शन, संस्कारांचें वर्धन नि कलात्मक करमणुकीचें हुकुमी स्थान म्हणून सर्वसामान्य नागरिकासहि जेथें सहज प्रवेश मिळू शकेल असें खुलें नाट्यमंदिर बांधण्याची अभिनव योजना या नगरपालिकेपुढें आहे. या रंगमंदिराचें प्रलोभन म्हणजे कलेचें प्रलोभन असें समीकरण होऊन वांईतील नागरिकांचें तें एक रमणीय स्थान व्हावें असा प्रयत्न आहे.

वांअी शहराच्या गरजा–

(१) वांअी शहरांमध्यें पिण्याच्या पाण्याची चांगली सोय नाहीं. त्यासाठीं शुध्द पाणी पुरवठा करण्याची योजना लवकरांत लवकर होणें आवश्यक आहे. याबाबत नगरपालिकेची एक योजना आहे. त्याची माहिती मागें दिलेली आहेच; त्याचीच पुनरावृत्ति करण्याचें कारण नाहीं. शुध्द पाणीपुरवठ्याची योजना शक्यतों त्वरीत अमलांत आणण्याचा प्रयत्न नगरपालिका करीत आहे.

(२) **ड्रेनेज स्कीम:–** वांअी शहरांतील घरांतील सांडपाणी मैला मुत्रीची वाहतूक तसेंच संडासाची सफाई यासाठीं अंडर ग्राउंड ड्रेनेजची व्यवस्था वांअी शहरांत असणें अत्यंत आवश्यक आहे याबाबत सरकारशीं पत्र व्यवहार चालूं आहे. ही योजना कार्यवाहीत आणण्याचा प्रयत्न नगरपालिका करीत आहे.

(३) सर्व शहरांमध्यें रस्त्यावर दिवे लावण्याची व्यवस्था अजून करावयाची आहे. रस्त्यावर सगळीकडे दिवे लावणेची व्यवस्था कांहीं तांत्रिक अडचणीमुळें लांबणीवर पडली आहे. या बाबतींत नगरपालिकेचा संबंधित खात्याशीं व सरकारशीं

दूध वाटप केन्द्राचे उद्घाटन –



– संयोजक –
डॉ. प्र. शं. मराठे,
अध्यक्ष, नगरपालिका वांई


– उद्घाटक –
मान. आ. ना. फावडे,
प्रान्त ऑफिसर



सॅलरी सेव्हिंग्ज स्कीम मधील न. पा. चे
सेवकांना विमा पॉलिसी देतांना–
श्री. आप्पासाहेब देशपांडे




अध्यक्ष **मा. फावडे** प्रान्त ऑफिसर यांना
औषध वाटपाच्या योजनेची
माहिती देत असतांना



वस्ताद शंकरराव विठोजीराव घाडगे

बयाचे १५ व्या वर्षापासून पैलवानीपेशास प्रारंभ. स्वतःची तालीम स्थापन करून गेल्या ५०-६० वर्षांत अनेक पैलवानांना मल्लविद्येचे धडे दिलें. स्वतः वयाचे ५५ वर्षेपर्यंत नामांकित कुस्त्या केल्या. महाराष्ट्राचे ख्यातनाम पैलवान व वांईचे वज्रभूषण. चालूं वय ९२, अजूनहि तरुणांना मल्लविद्येचें शिक्षण देत असतात हे विशेष.



श्री. राजाराम श्रीपती जायगुडे

इंटर पर्यंत शिक्षण उत्साहि तरुण व इमारतीचे नवोदित कॉन्ट्रॅक्टर. वांई नगरपालिकेची अनेक कामे यांनीं केलीं आहेत. हुतुतुचे कुशल खेळाडू.



श्री. विजय अनंत विद्वांस

द्र. हा. वांई माजी विद्यार्थी. सरकारी लोकसहाय्यक सेना शिबीर वांई (१९५८) मध्यें सर्व प्रथम. सरसेनापति यांचे मेरिट सर्टिफिकेट मिळविलें. याचसाठीं १९५९ चे प्रजासत्ताकदिनी राष्ट्रपतींना मानवंदना देणेस त्यांस सरकारी खर्चानें दिल्लीस जावयास मिळाले.

पत्र व्यवहार चालूं आहे. यांसहि लवकर यश येईल अशी अपेक्षा आहे. वांई शहरास सरकारमार्फत कोयनेची अगर भाटघरची वीज मिळेल अशी अपेक्षा आहे. या योजनेमधून शहरास वीज पुरवठा मिळाल्यास त्यापासून उद्योगधंद्यास उत्तेजन मिळेल, व शहराची भरभराट लवकर होईल.

(४) शिवाय वांई नगरपालिकेस शहराचा एक मास्टर प्लॅन तयार करावयाचा आहे. त्यामध्यें शहराच्या विकासाच्या दृष्टीनें आवश्यक त्या त्या योजना दाखविणेच्या आहेत. शहरांतील राहिलेले अरुंद रस्ते रुंद करणेच्या योजना तयार करणेच्या आहेत. मुलांचेसाठीं खेळाच्या जागा, शहरामध्यें येणाऱ्या लोकांसाठीं सार्वजनिक विश्रांतिगृह (गेस्ट हाऊस), खुलें नाट्यगृह (ओपन एअर थिएटर), प्राथमिक शाळांचेकरितां सोयीस्कर इमारती, सर्व सोयींनींयुक्त असा दवाखाना, प्रसुतीगृह बांधणेंचे आहे. अशा तऱ्हेच्या अनेक गोष्टीं करावयाच्या आहेत. या सर्व योजना फार मोठ्या खर्चाच्या आहेत. त्या सर्व लवकर कार्यवाहीत आणणें ही गोष्ट अवघड आहे.कारण यासाठीं पैशावर विसंबून बसावें लागतें. पैशासाठीं नगरपालिकेचें उत्पन्न वाढविणें आवश्यक आहे. परंतु तीहि गोष्ट आतां अशक्य आहे. कारण कर वाढवून उत्पन्न वाढविण्याची मर्यादा जवळ जवळ संपलेली आहे. सरकारकडून निरनिराळ्या कामाकरितां मिळणाऱ्या मदती मिळवून निरनिराळीं सुधारणांचीं कामें करण्याचा प्रयत्न नगरपालिका निश्चितपणें करीलच, याबद्दल खात्री आहे. सरकारी मदत निरनिराळ्या रूपानें नगरपालिकेस मिळत असतेंच. परंतु त्या मानानें ही मदत कमी पडते. नगरपालिकांच्या हद्दींत बसविलेल्या सरकारी करांच्या रकमेचा कांहीं वांटा वस्तुतः नगरपालिकेस मिळणें आवश्यक आहे. परंतु सरकारनें आंखलेल्या विकास योजनेचीं कामें झपाटचानें चालूं असून हल्लीं या खर्चाचा बोजा अधिक आहे. त्यांतूनच सवड काढून सरकार नगरपालिकेस दिल्या जाणाऱ्या मदतीमध्यें वाढ करील अशी अपेक्षा आहे.

(५) वांई शहर हें औद्योगिक शहर नव्हें. वांईतील वा वांईच्या पचक्रोशींतील लोकांना पुरेसा उद्योगधंदा मिळेल असा येथें अवसर नाहीं. याच्या महत्वाच्या कारणापैकीं एक कारण असें दर्शवितां येतें कीं, रेल्वे स्टेशन वांई पासून दूर आहे. शिवाय उद्योग धंद्याचेसाठीं, कारखान्यासाठीं लागणारा कच्चा माल अभावानें आहे. तरी या उणीवा लक्षांत घेऊन त्या दूर होणें व वांई हें औद्योगिक क्षेत्रांतहि पुढें येणें अत्यावश्यक आहे. एखादीं औद्योगिक शिक्षण देणारीं शाळा सुरू व्हावी व या बाबतींत सरकारकडून भरीव मार्गदर्शनाची व मदतीची नगरपालिका अपेक्षा करीत आहे.

(६) पुरातन कालापासून सांस्कृतिक नगर म्हणून वांई ख्यातनाम आहे. "वैदिक संस्कृतीचें माहेरघर" म्हणून या नगराचा निर्देश इतिहासांत सार्थतेनें केला गेला आहे. वेदाध्ययनाचें पीठ म्हणून वांई क्षेत्राचा लौकिक फार पुरातन असून श्रौतस्मार्त धर्ममार्तंड भाऊशास्त्री लेले हें प्रकांड पंडित वांई येथें "धर्म" नांवाचें मासिक व "मोदवृत्त" नांवाचें साप्ताहिक स्वतःच्या प्रेसमध्यें छापून चालवीत. चतुरस्त्र विद्वान, व्युत्पन्न संकृत पंडित, महाभारत रामायणादि ग्रंथाचे भाषान्तरकार, प्रभावी वक्ते, अष्टपैलु लेखक, व्यासंगी पत्रकार, सव्यसाची, राजकारणी, मुत्सद्दी आणि अग्निहोत्री म्हणून भाऊशास्त्री लेले यांची भारतांत ख्याती होती. सन १९०८ मध्यें त्यांनीं वांई येथें कोटिलिंगार्चन अनुष्ठान प्रचंड प्रमाणावर घडवून आणलें. मराठवाडा, वऱ्हाड, इंदूर, ग्वाल्हेर, काशी येथपर्यंत त्यांनीं धर्म प्रचारार्थ दौरा करून आपल्या तेजस्वी

पांडित्याचा प्रत्यय घडविला, त्यांचे लिखाणावर ब्रिटिशसरकारची करडी नजर होती व त्याचा परिणाम म्हणून त्यांचेवर राजद्रोहाचा खटलाहि चालला होता व त्यांना त्यावेळचे काळांत सहा महिने शिक्षाहि झाली होती. अखिल भारताच्या सर्व भागांतून धर्मशास्त्रार्थ विचारणारीं पत्रें त्यांना नेहमीं येत नि त्यांच्या शंकांचें निरसन ते आपल्या 'धर्म' मासिकांतून करीत.

त्यांचे शिवाय अनेक विद्वान पंडितांचें वास्तव्य वांईस होते व त्यांचेकडून वांई क्षेत्री धर्माचें अध्ययन आणि अध्यापन आश्रम काळांतल्या तपस्व्याप्रमाणें चालें. ही परंपरा न थांबतां वेदाध्ययनाची ज्योत ब्रह्मीभूत केवलानन्द सरस्वती यांनीं प्राज्ञपाठ शाळेच्या रूपानें पुढें अखंड तेवत ठेविली. व तीच शैक्षणिक परंपरा आजहि ब्र. केवलानन्द सरस्वती यांचे शिष्य तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनीं चालूं ठेविली आहे. अशा या थोर वैदिक परंपरेमुळें वांई शहरास क्षेत्रत्व प्राप्त झालें असून वांईस " दक्षिण काशी " असें पुरातन काळापासून संबोधण्यांत येत आहे. अशा या वांई शहरांत विद्येचें माहेरघर म्हणून मान्यता पावलेल्या पुणें शहरांतील सुधारणेच्या टप्याचा पडसाद त्वरित उमटतो. सांस्कृतिक, वैदिक धर्माचें शिक्षण, इंग्लिश शिक्षण, वसंत व्याख्यानमाला इत्यादि बाबी ठळकपणें वांईत दृग्गोचर होतात. येथें दोन हायस्कूल्स, कन्याशाळा नि एक सरकारी ट्रेनिंग कॉलेज या शैक्षणिक संस्था विद्यमान आहेत. तथापि एक अद्याप मोठी उणीव तीव्रतेनें जाणवते. ती म्हणजे महाविद्यालयीन उच्च शिक्षणाची. एस्. एस्. सी. झाल्यानंतर पुढील उच्च शिक्षणासाठीं वांईतील व वांईच्या परिसरांतील बहुसंख्य विद्यार्थ्यांना वांई सोडून पुणें, मुंबई, कोल्हापूर, सांगली या सारख्या दूरच्या ठिकाणीं जावें लागतें. सुदैवानें सातारा जिल्ह्यांत सातारा, कऱ्हाड, फलटण येथें कला व शास्त्र विभाग असलेलीं महाविद्यालयें अलिकडे सुरू झालेलीं आहेत. वाईंत शिक्षणासाठीं परगांवीं जाणारा वर्ग फार मोठा आहे. तरी या विद्यार्थ्यांसाठीं बांईसारख्या जिल्ह्यांतील प्रमुख शैक्षणिक स्थानीं एका महाविद्यालयाची सत्वर प्रतिष्ठापना व्हावी, अशी वांई नगरपालिकेची आकांक्षा आहे. यासाठीं लागणारे आवश्यक परंतु शक्य ते सहाय्य करण्यास नगरपालिकेचा हात सदैव पुढें राहील.

हें चित्र..... विनोद ? छे: ! वस्तुस्थिति !

		सन १८५६		सन १९५६	
१	गहू	१ रुपयास	७॥ पायली	२४ रुपयास	७॥ पायली
२	तूप	३ रुपयास	१ मण	१६० रुपयास	१ मण
३	तेल	१॥ रुपयास	१ मण	५५ रुपयास	१ मण
४	तांदूळ	१ रुपयास	४॥ पायली	१८ रुपयास	४॥ पायली
५	कडबा	१ रुपयास	१००० पेंड्या	१५० रुपयास	१००० पेंड्या
६	सोने	१२ ते १६ रुपयास	१ तोळा	१०५ रुपयास	१ तोळा
७	विटा	७ रुपयास	१०००	३५ रुपयास	१०००
८	चिंच	१ रुपयास	२ मण	१३ रुपयास	२ मण
		गड्याचा पगार दरमहा ३ रुपये		गड्याचा पगार दरमहा ५५ रुपये	

....आणि हें चित्र !

परिशिष्ट "अ"

सन १९४१-४२ सालापासून १९५७-५८ पर्यंत नगरपालिकेची आर्थिक प्रगति दाखविणारा तक्ता.

सन	करापासून उत्पन्न	म्यु. मिळकती पासून व इतर फीज् पासून	देणग्या व सरकारी ग्रॅन्टस् पासून	इतर किरकोळ बाबी	इतर ॲडव्हान्स डिपॉझिटस् वगैरे	एकूण शिलकेशिवाय
१९४१-४२	३७०९५	४५४९	२७४७	१२९४	१६३९०	६२०७५
१९४२-४३	३८५३६	४७७६	१३६०	७९४	४६२४	५००९०
१९४३-४४	४७२४९	४४८८	१६०९	१४१४	३७८१	५८५४१
१९४४-४५	५०९०३	५१०८	१०९८	१५२३	४३९७	६३०२९
१९४५-४६	५१४३३	५६०६	१६३०	१८७२	४४३३	६४९७४
१९४६-४७	६६८५१	७४७३	२०६९३	१८०८	१२२९२	१०९११७
१९४७-४८	७७५१८	७५९६	६३४६	१८०१	१५४२८	१०८६८९
१९४८-४९	७१७७६	८७३०	१४९८२	३५७३	१४६८६	११३७४८
१९४९-५०	७८१०५	६६५०	२७८७५	५३७१	१५९७६	१३३९७७
१९५०-५१	१०११५८	६९०५	१७६५४	१९७०	१९५७६	१४७२६३
१९५१-५२	११४४८२	९४१०	१७५२२	२७४३	४२६८६	१८६८४३
१९५२-५३	१२४१२८	६४६१	२६८६५	१३७३	१८७४१	१७७५६८
१९५३-५४	१२७४१८	७४००	१८६७१	१८४३०	८९४११	२६१३३०
१९५४-५५	१२२०७४	८६१२	२२०२०	८९२३	३६०४६	१९७६७५
१९५५-५६	१२२२८१	१०७७३	१३१३३	९७५७	३२७६१	१८८७०५
१९५६-५७	११४६४३	१४०२१	४४१७३	४९१३	६७९३	१८४५४३
१९५७-५८	१२६९३३	१९३२९	२९०६७	३२३३	७७१२	१८६२७४

परिशिष्ट "ब"

सन १९४१–४२ सालापासून १९५७–५८ पर्यंत नगरपालिकेचा खर्च दाखविणारा तक्ता.

सन	सर्व साधारण कारभार व कर वसुली खर्च	आग विझविणें दिवाबत्ती वगैरे	सार्वजनिक कामें रस्ते, इमारती आरोग्य वगैरे	प्राथमिक शिक्षण वर्गणी व इ. देणग्या	किरकोळ बाबी	ॲडव्हांसेस डिपॉझिट	एकूण खर्च शिलकेशिवाय
१९४१-४२	८६५६	३९७२	३११५८	११६५७	११२४	४६६३	६१२३०
१९४२-४३	९७८७	४०१२	२५०५२	७२४३	६६३	३५३२	५०२८९
१९४३-४४	१०१८१	४१६१	२३१५२	७१८५	७२०	३७२४	४९१२३
१९४४-४५	११६४२	३९५८	३३०९२	६०७०	१६०४	४६२७	६०९९३
१९४५-४६	१३८५३	३७९८	३८११९	७४३२	८८५	५७३६	६९८२३
१९४६-४७	१६३८३	५६३५	५२८९०	८४३१	१४२०	११८२७	९६५८६
१९४७-४८	२२६८०	५२८३	५८९५३	८३३८	१४३१	१७५७१	११४२५६
१९४८-४९	२३७३७	६५७८	६०९४४	१३५९८	२२०८	१२२२१	११९२८६
१९४९-५०	२९९२५	५४५७	६२१२६	६९८०	१८०६	१६५००	१२२७९४
१९५०-५१	३१९५८	६६७१	७६२४८	१२१००	१८०७	२०४९५	१४९२७९
१९५१-५२	३२३९१	४६२२	१०९८५०	१३३७८	३०९३	३६३७१	१९९७०५
१९५२-५३	३१९७२	७४२०	६९१०७	१३५३२	६२९	३२२६४	१५४९२४
१९५३-५४	३१४०३	५६५९	१३४९१९	१३७२४	२६५९	४०२५९	२२८६२३
१९५४-५५	३३९५२	६४४४	१२६७९५	१३१०२	६०४८	३१४१७	२१७७५८
१९५५-५६	३४६६९	९५७५	११२४४७	१४२९३	८३५४	३८५९८	२१७९३६
१९५६-५७	४५२३५	६७८०	७७०१६	१८२९३	७४४९	१७७५७	१७२५३०
१९५७-५८	४६२७६	७२८७	९७४२०	१३९३७	६४७२	१५८३१	१८७२३३

वांअी नगरीचें चैतन्य

विविध संस्था –

प्राज्ञपाठ शाळा मंडळ, वांई

शके १८३८ च्या विजयादशमीस (६ आक्टोबर १९१६ रोजीं) प्राज्ञपाठशाळा, वांई स्थापन झाली. ब्रह्मीभूत स्वा. केवलानन्द सरस्वती (पूर्वाश्रमी गु. नारायणशास्त्री मराठे) यांनीं कै. दिनकरशास्त्री कानडे, कै. गंगाधरशास्त्री सोहनी, श्री. महादेवशास्त्री दिवेकर, श्री. भालचंद्रशास्त्री नेने यांच्या सहाय्यानें ही संस्था स्थापन करण्यास अतिशय परिश्रम घेतलें.

प्राचीन भारतीय संस्कृति आणि धर्म यांचें शिक्षण देऊन वेदशास्त्रसंपन्न पंडीत व धर्मोपदेशक तयार करणें हा संस्थेचा उद्देश ठरला. इ. स. १९२० मध्यें या संस्थेस घटनात्मक स्वरूप देण्यांत आलें. यावेळीं भारतांत राष्ट्रीय शिक्षणाची चळवळ सुरू होती. त्या चळवळीचे प्रभावानें माध्यमिक शिक्षण शाखेला राष्ट्रीय शिक्षणाची पाठशाळा हें रूप देण्यांत आलें. श्री. ना. कृ. गोगटे माजी समर्थ विद्यालयाचे श्री. राजाराम बापूजी देसाई, श्री. श्रीपाद शंकर नवरे, कै. शंकर विष्णु जोशी व कै. दत्तात्रयशास्त्री परचुरे व श्री. शंकर विठ्ठल लेले यांनीं ही राष्ट्रीय पाठशाळा चालविली.

पुढें १९३२ नंतर ही राष्ट्रीय शाळा बंद पडली. ब्रह्मीभूत स्वामी केवलानन्दसरस्वती यांचे मार्गदर्शनाखालीं कै. लक्ष्मणशास्त्री गोडखिंडीकर व श्री. लक्ष्मणशास्त्री मुरगुडकर व श्री. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनीं प्राचीन शास्त्रांचें अध्यापन करून अनेक संस्कृत पंडित तयार केलें. प्राज्ञपाठशाळेची पाठशाळा, धर्मकोश मंडळ, प्राज्ञ प्रेस, प्राज्ञ पाठशाळा पुस्तकमाला, नवभारत मासिक, व एकलव्य वसतिगृह हीं कार्यें सध्यां सुरू आहेत. ब्र. स्वामी केवलानन्दसरस्वती यांनीं संस्कृतमध्यें तयार करून ठेविलेल्या ग्रंथसंपत्तिचेहि संपादन व प्रकाशन प्राज्ञपाठ शाळा मंडळ करीत आहे.

प्राज्ञपाठशाळेची संपूर्ण जबाबदारी १९३१ सालापासून तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्यावरच आहे. आतांपर्यंत धर्मकोशाचे सात खंड प्रसिद्ध झाले आहेत. एकंदर १८ खंडाची योजना आहे. मराठीमध्यें लक्ष्मणशास्त्री यांची विचार प्रवर्तक अशी पुष्कळ पुस्तकें प्रसिद्ध झालेलीं आहेत. एकलव्य वसतिगृहाचें उद्घाटन प्राज्ञपाठशाळा मंडळाच्या मालकीच्या रविवार पेठेंतील द्रविड वाड्यांत १९५६ मध्यें विजयादशमीस मुख्यमंत्री नामदार यशवंतरावजी चव्हाण यांचे हस्तें झालें. या वसतिगृहांत मागासलेले विद्यार्थ्यांची रहाण्याची व भोजनाची सोय केलेली आहे. वाई येथील प्रमुख नागरिक नि नगरपालिकेच्या कार्यकारी समितीचे सरपंच श्री. एस् एस्. कांबळे यांनीं या कार्यांत विशेष पुढाकार घेतला. प्राज्ञपाठशाळेची इमारत कै. सिताराम विश्वनाथ पटवर्धन यांनीं इ. स. १९१६ सालीं खरेदी करून प्राज्ञपाठशाळेस कायम वापरणेस दिली आहे. या इमारतीचे समोर उत्तरेस ब्र. स्वामी केवलानन्दसरस्वती यांचे समाधिस्थान आहे.

द्रविड हायस्कूल वांई

पुणें, वांई पासून ५५ मैल अंतरावर असले तरी पुण्यांतील प्रत्येक गोष्टीचें पडसाद वांईंत ताबडतोब उठावेंत हा संप्रदाय फार जुना आहे. कै.

चिपळूणकर, कै. लो. टिळक व कै. आगरकर यांनीं पुण्यांत न्यू इंग्लीश स्कूल नांवाची खाजगी शाळा सुरू केली. तेव्हां वांईतील सुविद्य व उत्साही तरुणांच्या मनांत अशीच कल्पना निघाली. म्हणून न्यू इंग्लीश स्कूल ही संस्था १ सप्टेंबर १८८५ चे कृष्णाष्टमीचे सुमुहूर्तावर वांईमध्यें स्थापन करण्यांत आली व ती श्री. विष्णू गणेश वाकणकर या तरुण गृहस्थांनीं कै. अण्णासाहेब साठे यांच्या वाड्यांतील माडीवर प्रथम सुरू केली. तेव्हां त्यावेळीं विद्यार्थ्यांची संख्या १३० होती. व तिला नगरपालिका व सरकार यांजकडून अल्प प्रमाणांत मदत मिळूं लागली. वांईत त्यावेळीं चालूं असलेलें अँग्लोव्हर्नाक्युलर स्कूल बंद पडलें. व विद्यार्थ्यांची संख्या २५० पर्यंत गेली. नंतर वांईत 'मराठी विद्योत्तेजक मंडळी' स्थापन करणेंत आली त्यांत श्री. केशवराव करंदीकर, श्री. माधवराव साठे, श्री. सखारामबापू पंडित, श्री. गणपतराव नानजकर, श्री. कृष्णाजीपंत केळकर, श्री रामभाऊ दिवेकर, श्री. माधवरावजी कानडे असे सात सभासद होते व गव्हर्निंग बॉडीचे चेअरमन म्हणून श्री. केशवराव ऊर्फ शंभुकाका करंदीकर होते. सन १८९० सालीं ही संस्था रजिस्टर करण्यांत आली. सन १८९१ मध्यें या मंडळानें वांईचें न्यू इंग्लीश स्कूल ताब्यांत घेतलें. १८९४ सालीं मशीदीवरून वाद्यें वाजविण्याचें प्रकरण उद्भवलें व गांवांतील बहुतेक सार्वजनिक कार्यकर्ते त्यांत गुंतविण्यांत आले. त्यांत गुरुवर्य अंताजीपंत व रामकृष्णपंत हें दोघेहि सांपडलें. त्यामुळें शाळेवर सरकारी वक्र दृष्टी झाली. परंतु सन १८९५ सालीं सरकारी नियमाप्रमाणें २ पदवीधर (१) श्री. बामनराव केळकर (२) श्री. नारायणराव पाटणकर

श्री. कृ. द. बापट .....



..... मुख्याध्यापक


हे शिक्षक म्हणून आणलें व ६ वी व ७ वी सुरू करण्यांत आली. १९०० सालीं या संस्थेंतून मॅट्रिक झालेले पहिलें विद्यार्थी श्री. वि. कृ. मेहेंदळे हे होत. त्यावेळीं शिक्षकांस द. म. पगार १५ रु. होता. १८९९ सालीं श्री. चाफेकर यांचें नेतृत्वाखालीं शाळेंत टेलिग्रॅफीचा वर्ग व १९०३ सालीं विनोबाजी गुरव यांचा गायनाचा वर्गहि चालूं करणेंत आला.

पुढें १९१० चे सुमारास श्री. केशवराव कानिटकर हे वांईस आले होते. तेव्हां श्री. अभ्यंकर श्री. भट, श्री. खटावकर व श्री. कुडेकर इत्यादि वकील मंडळींनी डेक्कन एज्युकेशन सोसायटीनें ही शाळा ताब्यांत घ्यावी अशी विनंति केली. पण कायमनिधी पाहिजे अशी अट घातली. यावेळीं वांईतील नागरिक श्री. गणपतराव द्रविड यांनीं "मी एकटाच तीस हजार रुपये देतो" असें सांगितलें. सोसायटीनें शाळा ताब्यांत घेतली व त्यांस द्रविड हायस्कूल असें नांव दिलें. सौ. सरस्वतीबाई द्रविड यांनींही आश्वासन पूर्ण करणें करितां आपले दागिनेहि विकलें हें लक्षांत घेण्या सारखें आहे.

पण शाळेंत मुलांची संख्या वाढूं लागली व ही

जागा पुरेनाशी झाली. म्हणून १९५० सालीं श्री. जी. एम्. जोशी हे हेडमास्तर असतांना गांवाबाहेरील मैदानावर नवीन मोठी इमारत बांधणेंत आली व जुनी इमारत कन्याशाळा वांई यांस विकण्यांत आली. १९५४ सालीं श्री. ग. द. किवळकर हे हेडमास्तर असतांना या इमारतींत आणखी वाढ करण्यांत आली. तरीहि अद्याप इमारत अपुरी पडत आहे. लौकरच ही इमारतहि आणखी मोठी व पूर्ण होईल अशी अपेक्षा आहे.

वांई नगरपालिका व द्रविड हायस्कूल यांचें अगदीं घनिष्ट संबंध आहेत. मुख्याध्यापक श्री. ढवळीकर हें नगरपालिकेचे नऊ वर्षे अध्यक्ष होतें. व श्री. बापूराव नातू, श्री. पंडित व श्री. जोग गुरुजी हे नगरपालिकेचे सभासद होते. शाळेजवळील मोठे मैदानापैकीं कांहीं भाग नगरपालिकेनें अल्प किंमतीस शाळेस ग्राऊंडसाठीं दिला. सध्यां शाळेची उपस्थिति ९५० आहे.



संस्थेची नवीन इमारत

शाळेंतील उल्लेखनीय गोष्टी

(१) केंद्रीय सरकारनें दिलेली रु. १५००० ची ग्रँट
(२) सुतार कामासाठीं स्वतंत्र इमारत
(३) अेस् टी.सी.इन्स्टीटचूटची स्थापना
(४) हिंदी शिक्षक सनद केन्द्र
(५) विद्यार्थी भांडार
(६) अेस्. अेस्. सी. परीक्षेचें केंद्र

—: कन्याशाळा वांई :—


"भारतरत्न महर्षि आण्णासाहेब कर्वे" यांनीं कन्याशाळा वांई ही संस्था सन १९२५ मध्यें स्थापन केली. त्याच सालीं वांईंतील पुरोगामी विचारांच्या मंडळींची एक 'कन्याशाळा मंडळ' नांवाची संस्था स्थापन होऊन कन्याशाळा चालविण्याची सर्व जबाबदारी कन्याशाळा मंडळानें स्वीकारली. कै. बापूसाहेब काथवटे व कै. बापूसाहेब दातार या दोन सेवानिवृत्त न्यायाधिशांच्या उत्साही सहाय्यानें व मार्गदर्शनामुळें शाळेमध्यें ५ वी, ६ वी, ७ वी या तीन इयत्ता सुरू झाल्या. त्या काळांत मुलींना इंग्रजी शाळेंत पाठविण्यास पालक तयार नसत. मुलींना लिहितां वाचतां येईपर्यंतच फक्त दोन तीन वर्षे प्राथमिक शाळेंत घालून मुलींच्या दहा अकरा वयालाच तिला घरीं ठेवण्याची प्रथा होती अशा परिस्थितींत मुलीला इंग्रजी शाळेमध्यें आणणें, तिला शिक्षणाची गोडी लावणें, समाजांत मानानें जगण्यास शिकविणें ह्याच गोष्टीं प्रामुख्यानें कन्याशाळेला कराव्या लागल्या. मुलींना शाळेंत येण्यास फी तर नव्हतीच परंतु दररोज शाळेंत आल्यास बक्षीस ठेवावें लागे.

शाळेमध्यें शिकविण्याचें काम वांई येथील शिक्षणप्रेमी सेवानिवृत्त शिक्षक मोठ्या आस्थेनें करीत. १९३१ सालीं श्री. शारदाबाई साठ्ये व श्री. गोदूताई गडणीस या हिंगणें येथें अध्ययन केलेल्या दोन समाज सेविका शाळेचें काम पाहूं लागल्या. त्याचवर्षीं शाळा रजिस्टर केली, व शारदाबाई साठ्ये हिंगण्यास माघारी गेल्या.

त्यामुळें शाळेची सर्व धुरा श्री. गोदूताई गडणीस यांचेवर पडली. त्यांचें शिक्षण कमी असल्यामुळें शाळेच्या ऑफिसचें सर्व काम द्रविड हायस्कूलचें एक शिक्षक श्री. खरे मास्तर हे विनावेतन करूं लागले. द्रविड हायस्कूलच्या त्या वेळच्या मुख्याध्यापकांच्या– श्री. ढवळीकर यांच्या सहानुभूतीनें त्यांचे शाळेंतील शिक्षक श्री. गोंधळेकर, श्री. जोग, श्री. बापट हे विनावेतन शाळेमध्यें निरनिराळे विषय शिकवित असत. पुढें १९३८ ते ४० पर्यंत स्वतः श्री. ढवळीकर हेड्मास्तर हेच कन्याशाळेचें सुपरिन्टेन्डट म्हणून काम करीत होते. अशा रितीनें अनेक नागरिकांच्या सहकार्यानें कन्याशाळा मार्ग आक्रमण करीत होती. शाळेची गोडी मुलींना लागू लागली. एक एक वर्षावर्षानीं शाळेंत फा आकारणी सुरू केली. कन्याशाळा मंडळांतील सर्व सभासदांना वांईमध्यें घरोघरीं जाऊन व परगांवीहि कन्याशाळेसाठी निधी जमवावा लागे व त्याच निधींतून शिक्षकांचा पगार व शाळेचा इतर खर्च भागवावा लागे. अशा बिकट आर्थिक परिस्थितींतहि कन्याशाळा मंडळानें १९३६ सालीं ४ थी म्हणजे इयत्ता ८ वी सुरू केली. व १९३८ सालीं ५ वी म्हणजे ९ इयत्ता सुरू केली. कन्याशाळा मंडळावर शाळा चालविण्याचा आर्थिक ताण अतिशय पडत होता. तरीहि दुर्दम्य आशावादीपणामुळें कन्याशाळा मंडळानें शाळा चालूं ठेविली.

एकीकडे आर्थिक प्रश्न व दुसरीकडे शाळेला लायक अशी मुख्याध्यापिका लाभणें अशा दोन प्रश्नांतून एक प्रश्न १९४० सालीं सुटला. वाईच्याच एक नागरिक श्री काशीताई नातू यांनीं आपलें B. T. पर्यंतचें शिक्षण पुरें करून कन्याशाळा वांई संस्थेला वाहून घेण्याचें ठरविलें व तेव्हांपासून श्री. काशीताई नातू यांच्या मार्गदर्शनाखालीं शाळेची प्रगति चालूं आहे.

१९४५ सालीं कन्याशाळा मंडळानें इ. ६ वी म्हणजे १० वी इयत्ता सुरू केली व १९४६ सालीं इयत्ता ७ वी म्हणजे सध्याची ११ वी इयत्ता सुरू केली याप्रमाणें शाळेचें रूपांतर संपूर्ण हायस्कूलमध्यें झालें. शाळेचें मॅट्रिकचे निकाल उत्तम लागू लागले. मुलींची संख्याहि थोडी थोडी वाढूं लागली व शाळेला कांहीं स्वरूप येऊं लागलें.



परंतु कन्याशाळा मंडळाची आर्थिक बाजू घसरत होती. सरकारी नियमानुसार शिक्षकांचें पगाराचें वेतन, महागाईभत्ता यामुळें पूर्वीचा फंड सर्व संपून गेला. अशा पेंचप्रसंगांत कन्याशाळा आतां बंद करावी लागणार काय हा प्रश्न १९४७ ते ४९ पर्यंत भेडसाऊं लागला. अशा संकटांत गु. अण्णासाहेबांच्या आशीर्वादानें वांई कन्याशाळा ही संस्था हिंगणें स्त्री शिक्षण संस्थेनें आपलेकडे चालविण्यास घेतली.

कन्याशाळा स्थापनेपासून तीन वेळा तीन वाड्यामध्यें भरत असे. शाळेला स्वत:ला इमारत नव्हती. परंतु हिंगणें स्त्री शिक्षण संस्थेच्या सहाय्यानें १९५४ सालीं कन्याशाळेला स्वत:ची इमारत मिळाली व १९५७ सालीं मोठें क्रीडांगण मिळालें.

अशा रीतीनें कन्याशाळा भरभक्कम पायावर उभी राहून निश्चितपणें प्रगति करूं लागल्याचे दिसून आलें.

१९४७ सालापासून आतांपर्यंत बारा वर्षें शाळेनें शालान्त परिक्षेला मुली पाठविल्या. त्यांचा परीक्षेचा निकाल उत्तम लागतो. शाळेमध्यें निष्ठावंत व कार्यक्षम शिक्षकवर्ग असल्यामुळें शाळेंत विविध उपक्रम सुरू आहेत. मुलींच्या सर्वांगीण प्रगतिच्या दृष्टीनें अनेक गोष्टी शाळेनें आंखल्या आहेत. प्रतिवर्षी होणाऱ्या स्नेहसंमेलनावरून, मैदानी, मर्दानी खेळांच्या सामन्यांच्या निकालावरून, S. S. C. परीक्षांच्या निकालावरून, सरकारी अधिकाऱ्यांच्या शेऱ्यावरून निश्चितपणें असें म्हणण्यास हरकत नाहीं कीं, कन्याशाळा ही वांईतील एक आदर्श संस्था आहे. मुलींची ही स्वतंत्र शाळा वांई शहराला भूषणभूत संस्था आहे.

शाळेंमध्यें मुलींच्या पुढील आयुष्यांत अत्यंत उपयुक्त असें गायन, शिवण, चित्रकला हे विषय सक्तीचे विषय म्हणून शिकविलें जातात. शिवाय मुलींचें A. C. C. चें पथक आहे. गर्ल गाइड आहे. लहान मोठ्या सहली निघतात. सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रम होतात. शिवाय वाईतील महिलांचेसाठीं शाळेमध्यें बॅडमिंटन क्लब आहे. पिंगपाँग क्लब आहे. वेत कामाचे वर्गहि चालूं आहेत.

अशा या कन्याशाळेला वाई म्युनिसिपालिटी-कडून प्रतिवर्षी ग्रँट मिळते. शिवाय अन्य कोणत्याहि प्रकारचें सहकार्य मिळतें.

वांई शहराच्या विकासामध्यें निश्चितपणें भर घालणारी अशी कन्याशाळा वांई, ही आदर्श संस्था आहे.

जीवन शिक्षण अध्यापन विद्यालय

"नहि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते"

ज्ञानासारखी पवित्र वस्तु नाहीं. त्या दृष्टीनें ज्ञानार्जन करणाऱ्या संस्था नगराच्या प्रगतीच्या खुणा असतात. वांई शहर आधीच दक्षिण काशी, संस्कृतीचें माहेरघर आणि पवित्र तीर्थक्षेत्र म्हणून प्रसिद्ध आहे. आणि त्यांतच ज्ञानदान करणाऱ्या वांअी नगरींतील विविध शैक्षणिक संस्थामुळें शहराच्या प्रगतीचा दर्जा उंचावला आहे. या शहरांत विद्यमान असणाऱ्या प्रमुख शैक्षणिक संस्थांपैकीं "जीवन शिक्षण अध्यापन मंदिर" ही प्राथमिक अध्यापकांना अध्यापन करणारी एक प्रगतीशील संस्था आहे. या संस्थेला एक तप पूर्ण झाल्यानें संस्थेच्या शैक्षणिक कार्यास स्थैर्य व तेज प्राप्त झालें आहे.

१९४५ सालीं ब्रिटिश सरकारनें ग्रामीण विभागाच्या सुधारणेसाठीं जी युद्धोत्तर पुनर्योजना सुरू केली, त्या योजनान्वयें वांअी, मनमाड, पनवेल, संगमनेर व बुधगांव या शहरांत अध्यापक विद्यालयें स्थापन झालीं. वांअी हें ग्रामीण विभागांत मोडत असल्यानें मोरे समितीच्या ग्रामीण शिक्षण विषयक शिफारशीस अनुसरून या अध्यापन मंदिराची स्थापना वांअी येथें झाली. ट्रेन्ड शिक्षकांची संख्या शें. ८० पर्यंत वाढविणें व निव्वळ उमेदवार स्टायपेंडवर (विद्यावेतनावर) पाठविणें हे कॉलेज स्थापनेचे प्रमुख उद्देश होत. या उद्देशानुसार १ अेप्रिल १९४५ रोजीं कॉलेजचें उद्घाटन पहिलें प्राचार्य मा. भंडारीसाहेब यांचे हस्तें होऊन

कॉलेजच्या प्रत्यक्ष शैक्षणिक कार्यास दि. १२-६-४५ ला सुरुवात झाली.

प्राचार्य परंपरा— गेल्या बारा वर्षांच्या कारकीर्दीत या संस्थेचे प्रमुख या नात्याने जी विद्यमान प्राचार्यांची परंपरा होऊन गेली त्या सर्वांच्या प्रयत्नानें आणि प्रगतीशील दृष्टीकोनामुळें कॉलेजच्या विकासांत वैशिष्ठ्यपूर्ण भर पडली. मा. भंडारीसाहेब, मा. अेन्. डी. पाटीलसाहेब, मा. फाटकसाहेब, मा. पानसेसाहेब, मा. वाणीसाहेब, मा. माळीसाहेब हे माजी प्राचार्य असून गेल्या जुलै १९५८ पासून मा. आफळेसाहेब हे प्राचार्य आहेत. त्यांच्या प्रयत्नशील दृष्टीकोनामुळें अध्यापन मंदिराच्या सर्वांगीण कार्यांत अधिक भर पडेल यांत शंका नाहीं.

अध्यापन मंदिराची सुरुवात श्रीमंत सरदार रास्ते यांच्या वाड्यांत झाली. यांच वाड्यांत कॉलेज अद्यापहि भरत आहे. आरंभी रास्तेवाडा हा अध्यापन कार्यासाठीं व ढवळीकरवाडा हा वसतीगृहासाठीं वापरला जात होता; परंतु उत्तरोत्तर विद्यार्थी शिक्षकांच्या वाढत्या संख्येमुळें रड्डोवाडा १९५७ सालीं भाड्यानें घेतला. आज कॉलेजच्या इमारतींत रास्तेवाडा, ढवळीकरवाडा व रड्डोवाडा यांचा समावेश होतो. सर्व विद्यार्थी-शिक्षक वसतिगृहांत रहातात. सामुदायिक जीवनाच्या दृष्टीनें संपूर्ण वसतिगृहाची योजना हितावह झाली आहे.

आरंभी हे कॉलेज नॉन् बेसिक असून १९५१ सालीं या कॉलेजचे बेसिक कॉलेजांत रूपांतर झालें. पुन्हां १९५६ सालीं सिनिअर व ज्युनिअर कोर्सची योजना सुरू झाल्यानें या कॉलेजांत चार वर्ग सिनिअर कोर्ससाठीं व एक वर्ग ज्युनिअर कोर्ससाठीं असे एकूण २०० विद्यार्थी शिक्षकांचे पांच वर्ग सुरू झालें. आज या अध्यापन मंदिरांत सूतकाम, विणकाम व सुतारकाम हे मुख्य मूलोद्योग असून कागदकाम, पुठ्ठाकाम, व बागकाम हे दुय्यम मूलोद्योग शिकविलें जातात.

विद्यार्थ्यांच्या संख्यात्मक प्रगतीच्या दृष्टीनें सांगावयाचें झाल्यास कॉलेजची सुरुवात ८० उमेदवार शिक्षकांनीं होऊन आज विद्यार्थी शिक्षकांची संख्या २०० चे वर आहे. आरंभीचें वर्ष सोडल्यास १९४६ सालापासून तो सिनिअर कोर्स सुरू होईपर्यंत विद्यार्थी शिक्षकांची एकूण संख्या १६० असे.

सुतारकाम हा जादा मूलोद्योग व सिनिअर कोर्स सुरू झाल्यानें विद्यार्थी शिक्षकांच्या संख्येंत ४० शिक्षकांची भर पडली. कॉलेजमध्यें शिक्षकांना पाठविण्याबाबत सर्व उमेदवार असावेत असे आरंभीचें धोरण होतें. परंतु पुढें हें धोरण बदलून पर जिल्ह्यांतील शिक्षक या कॉलेजमध्यें पाठविले जात. मध्यंतरीच्या कांहीं वर्षांत याच जिल्ह्यांतील शिक्षक पाठविण्याबाबतचें धोरण असून आज अध्यापन मंदिरांत बहुतेक सर्व जिल्ह्यांना प्रतिनिधित्व दिलें आहे. खानदेशपासून रत्नागिरीपर्यंत बहुतेक जिल्ह्यांतील अध्यापक अध्ययनासाठीं येथें आले आहेत.


७४% (१९५५) ७३% (१९५७) ९०% (१९५८) ही निकालाची शेंकडेवारी पाहिली असतां विद्यार्थ्यांची शैक्षणिक आणि गुणात्मक प्रगति अध्यापन मंदिराच्या दर्जास साजेशीच आहे.

जवळ जवळ एक तपाच्या कॉलेजच्या जीवनांत प्राध्यापकांची संख्या वाढत्या क्रमानें दिसून येते. आरंभी प्राचार्य, चार प्राध्यापक, तीन पार्टटाईम प्राध्यापक असून आज विद्यार्थी शिक्षकांची संख्या बाढल्यानें प्राध्यापक वर्गहि त्या प्रमाणात वाढला आहे. सध्यां या अध्यापन मंदिरांत एकूण १५ प्राध्यापक, ८ सेवक व दोन लेखनिक आहेत. प्राध्यापकवर्गांत— (१) प्रा. केसकर (२) प्रा. जाधव, (३) प्रा. गुरव, (४) प्रा. करकमकर, (५) प्रा. बोकील, (६) प्रा. शेटे,

(७) प्रा. रानडे, (८) प्रा. घार्गे, (९) प्रा. देशपांडे एस्. आर्, (१०) प्रा. सदगीर असें १० विषय प्राध्यापक असून (११) प्रा. डांगे, (१२) प्रा. बगाडे, व (१३) प्रा. बोडरे हे तीन मूलोद्योग प्राध्यापक आहेत. याशिवाय प्राध्यापक कानीटकर व प्रा. देशपांडे अे. अेस्. हे कला प्राध्यापक आहेत.

अध्यापन मंदिरांतील शिक्षकांना पाठ घेण्यासाठीं ट्रेनिंग कॉलेजचें स्वतंत्र सरकारी प्रॅक्टिसिंग स्कूल आहे. १९४८ पूर्वी सदर पाठशाळा बोर्डाची असून ४ नंबरची शाळा या नांवानें ती ओळखली जात होती. १९५१ पासून या अध्यापन पाठशाळेंत मूलोद्योगाचा समावेश झाला. आणि आज ही शाळा पूर्णपणें मूलोद्योगी पाठशाळा म्हणून कार्य करीत आहे. याशिवाय शाळा नं. ११ व शाळा नं. २ या शाळांचा पाठासाठीं वापर केला जातो. अध्यापन पाठशाळा ही श्री. विष्णुपंत पाडळे यांच्या इमारतींत भरते.

मूलोद्योगी अध्यापन पाठशाळेचें मुख्याध्यापक ट्रेन्ड पदवीधर असावेत या नियमानुसार ट्रेनिंग कॉलेजमधील प्राध्यापक वर्गापैकीं श्री जाधव साहेब हे सध्यां या शाळेचे मुख्याध्यापक म्हणून काम पहात आहेत. शाळेंत एकूण सात अध्यापक असून शाळेसाठीं स्वतंत्र कामाठीं आहे. अध्यापक वर्गांत श्री. झिरपे, श्री. ब्रह्मे, श्री. वाळिंबे, श्री. सणस, श्रीमती वेदपाठक, श्रीमती जाधव, श्री. तांबे यांचा समावेश होतो. शाळेचें कामकाज पूर्णपणें जीवन शिक्षण पद्धतीस अनुसरून उत्साहानें पार पाडलें जात आहे.



अभ्यासक्रमाप्रमाणेंच अभ्यासक्रमानुवर्ती कामांचा समावेश कॉलेजच्या कार्यांत प्रामुख्यानें केला जातो. स्नेहसमेलन, गणेशोत्सव, सांस्कृतिक कार्यक्रम, सफाई, प्रार्थना, भजन, विविध गुणदर्शन, श्रमदान, ग्रामसंपर्क, समाजशिक्षण इत्यादि गोष्टींचा समावेश अभ्यासक्रमानुवर्ती कार्यक्रमांत विशेषकरून केला आहे. या कार्यक्रमाचें द्वारा विद्यार्थ्यांच्या ठिकाणीं असलेल्या सुप्त कलांचा आविष्कार केला जातो. शिवाय कॉलेजच्या बारा वर्षांच्या कारकीर्दींत प्रार्थना पुस्तिका, शुद्धलेखन पुस्तिका व जीवन शिक्षण पुस्तिका प्रसिद्ध झाल्यानें कॉलेजच्या भरीव कार्यांत भर पडली आहे. दरवर्षी मे महिन्यांत (सुट्टींत) येथें समाजशिक्षण कार्यकर्त्यांचा वर्ग चालविला जातो. सरकारनें आंखलेल्या पंचवार्षिक योजनेस हातभार लावण्यासाठीं हें अध्यापन मंदिर सदैव तयार असतें. श्रमदान व शिबिरें इत्यादि विकास योजनेच्या कार्यांत कॉलेजकडून अमोल सहकार्य केलें जातें.

कॉलेजच्या वाढत्या प्रगतीबरोबर कॉलेजच्या गरजाहि वाढल्या आहेत. स्वतंत्र इमारत व वसतिगृह, भव्य क्रीडांगण व शेतीसाठीं जमीन या कॉलेजच्या मुख्य गरजा असून दृक् साहित्याच्या अपुऱ्या साधनामुळें दृक शिक्षणाच्या क्षेत्रांत अध्यापन मंदिरास पूर्णपणें कार्य करून दाखवितां येत नाहीं.


वांईकर नागरिक व नगरपालिका यांच्या सहकार्यानें अध्यापन मंदिर प्रगतीपथांवर आहे. अध्यापन मंदिराची धुरा वाहणारे लोक रास्त्यांच्या या जुन्या इतिहासप्रसिद्ध इमारतींत नवविचारांची नवकल्पनांची देवाण घेवाण करतात, त्यामुळें कॉलेजच्या कार्यांत त्यांच्या नवीन विचारांचे ठसे उमटले जात असून कॉलेजच्या जीवनास बदलत्या काळास योग्य असें वळण लागत आहे. अध्यापन मंदिराच्या शुक्लेन्दुवत होणाऱ्या विकासामुळें वांई नगरीमध्यें कार्य करणाऱ्या शैक्षणिक संस्थांपैकीं जीवन शिक्षण अध्यापक मंदिर हें वांई नगरीचें भूषण आहे, असें आम्हांस वाटतें.

महर्षि शिंदे विद्यामंदिर, वाई.

श्री स्वामी विवेकानन्द शिक्षणसंस्था, कोल्हापूर या संस्थेनें १ जून १९५६ रोजीं महर्षि शिंदे यांच्या कार्याचें स्मारक म्हणून सदर हायस्कूल सुरू केलें. वांई आणि वांईच्या परिसरांतील गरीब, होतकरू विद्यार्थ्यांना पैशाभावी शिक्षणास मुकावें लागूं नये असा एक प्रधान हेतु पुढें ठेऊन 'ज्ञान व संस्कार' देण्यासाठीं केवळ चार विद्यार्थ्यांवर हें हायस्कूल सुरू करण्यांत आलें. इमारतीची अडचण वांई ब्राह्मसमाज या संस्थेनें आपली इमारत देऊन सोडविली. त्यावर्षी विद्यार्थ्यांची संख्या १९ झाली. सन १९५७-५८ सालीं इयत्ता नववीचा वर्ग उघडण्यांत आला ; व ही संख्या ३९ झाली विद्यार्थ्यांची संख्या अपुरी, देणग्यांचें अल्प प्रमाण यामुळें आर्थिकदृष्टचा शाळा फारच हलाखींत होती. शिक्षकांना वेतनहि मिळणें कठिण होऊन बसलें. याचवर्षी वांई नगरपालिकेकडून रु. १०० ची देणगी मिळाल्यामुळें शिक्षकांना काम करण्यास प्रोत्साहन मिळालें. सन १९५८-५९ सालीं विद्यार्थ्यांची संख्या १२२ होऊन इयत्ता ८ वी चे २, इ. ९ चा १, व इ. १० वी चा १ असे चार वर्ग चालूं आहेत. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेस अनेक अडचणी असतांनासुद्धां यंदा सुमारें रु. ४००० खर्च करून शास्त्र साहित्य, फर्निचर, पुस्तकें घेऊन दिलीं आहेत. प्रत्येक वर्गास एक ट्रेण्ड ग्रॅज्युएट असावा असा संस्थेचा प्रयत्न आहे. शाळा इतक्या तुटींत असतांनादेखील संस्था सन १९५९-६० सालीं इ ११ वी चा (एस्. एस्. सी.) वर्ग चालूं करणार आहे. यासाठीं रु. ५००० ची तरतूद करावी लागणार आहे. शाळेस क्रीडांगणाची नितांत आवश्यकता असून कांहीं दिवसांत सध्याची इमारतहि अपुरी पडेल असें वाटतें. शाळेंत ड्रॉइंग व हिंदी या परीक्षांचे वर्ग मोफत चालविले जात असून ए. सी. सी. एक पथक चालूं आहे. जिल्हा शिक्षणाधिकारी यांनीं शाळेच्या कामाबद्दल समाधान व्यक्त केलें आहे. या शाळेचें वैशिष्ठ्य असें सांगतां येईल कीं विद्यार्थ्यांच्या फीचे दर कमी असून स्वावलंबनानें शिक्षण घेण्याची तरतूदहि संस्थेनें केली आहे. सध्यां या विद्यामंदिराचें प्रमुखाध्यापक म्हणून श्री. गोडबोले हें काम पहातात.

लो. टिळक स्मारक संस्था

वांई येथील नागरिक श्री. बाळासाहेब साठे, श्री. रा. गो. भिडे, श्री. ज. रा. रानडे व कै. दत्तोपंत वाघोलीकर यांनीं सन १९११ मध्यें प्रत्येकांनीं आपापल्या जवळचा ग्रंथसंग्रह एकत्र करून एक ग्रंथालय स्थापन केलें. यापूर्वी वांई येथें नेटिव्हजनरल लायब्ररी नांवाची एक संस्था होती. तिच्या जागेंतून व्हिक्टोरिया महाराणीचा लावलेला फोटो कोणीतरीं वंगभंगाच्या चळवळींत काढून टाकला होता. त्यामुळें वरील संस्थेच्या चालकांवर सरकारी रोष झाला होता. त्याची झळ लागू नये म्हणून वरील मंडळींनी 'कॉरोनेशन लायब्ररी' हें नांव दि. ११-१२-१९११ रोजीं राज्य रोहणाच्या



टिळक ग्रंथ संग्रहालय, वांई.

दिनीं ठेवून वाचनालय सुरू केलें. कै. आबासाहेब काथवटे व श्री. बाबूराव पडित यांचा ग्रंथसंग्रह मिळाल्यामुळें संस्थेचा ग्रंथसंग्रह चांगलाच वाढला.


पुढें संस्थेचें नांव बदलून "मोफत वाचनालय" हें नांव ठेवण्यांत आलें. ग्रंथसंग्रह बराच वाढल्यामुळें मोफत वाचनालय ही संस्था फक्त नियतकालिकासाठीं कायम ठेऊन 'वांई ग्रंथ संग्रहालय' नांवाची नवीन संस्था चैत्र शु॥ १ शके १८३८ च्या सुमुहूर्तावर सुरू करण्यांत आली. ग्रंथसंग्रहालयाच्या वाढीसाठीं त्यांच्या चालकांनीं खूपच कष्ट घेतलें. बळवंत संगीत मंडळीचे "पुण्यप्रभाव" हें नाटक मुंबई येथें वाई ग्रंथसंग्रहालयाच्या मदतीसाठीं करण्यांत आलें. हा खेळ लो. टिळकांच्या अध्यक्षतेखालीं करण्यांत आला होता हें विशेष.

लो. टिळकांच्या निधनानंतर त्यांच्या स्मारकासंबंधीं वाईतील नागरिकांत चर्चा सुरू झाली. लोकमान्यांच्या कीर्तीला साजेसें असें स्मारक असावें असें प्रमुख नारिकांना वाटत होतें. वांई ग्रंथसंग्रहालयाचें रूपांतर लो. टिळक स्मारक संस्थेंत करावें; वरील संस्थेस नागरिकांनीं आर्थिक मदत करावी, अशी योजना नागरिकांच्या सभेंत ठरली. वरील योजना यशस्वी करण्याचें सर्व श्रेय श्री. बाळासाहेब साठे यांना आहे. स्मारकाचें कार्य करण्यासाठीं त्यांनीं शारीरिक श्रम केलेच, शिवाय स्मारकाला स्वतःची ५०० रुपयाची देणगी देऊन वरील कार्याला जोराची चालना दिली. पुरेसा निधि जमतांच गणपती आळींतील श्री. आंबेकर यांचा वाडा खरेदी करून त्याला लो. टिळक मंदीर व टिळक ग्रंथसंग्रहालय हें नांव लोकमान्यांच्या स्मरणार्थ दिलें. १९२९ सालीं लो. टिळक स्मारक संस्थेची घटना मंजूर होऊन वरील संस्थेचें कार्य सुरू झालें. लो. टिळक स्मारक संस्थेस स्वतःची दुमजली इमारत असून तळमजल्यावर ग्रंथसंग्रह व वाचनालय असून दुसरा मजला व्याख्यानें वगैरे कार्यक्रमासाठीं वापरला जातो.

प्रारंभीं संस्थेंत फक्त ग्रंथसंग्रहच होता. नियतकालिकांचा विभाग नव्हता. सन १८८५ सालीं वांई येथें नेटिव्हजनरल लायब्ररी स्थापन करण्यांत आली होती. नगरपालिकेच्या त्या वेळच्या इमारतींतच नेटिव्ह जनरल लायब्ररीला जागा दिली होती. व दरसाल नगरपालिकेकडून ५० रु. मदतहि मिळत होती. या लायब्ररींत ग्रंथसंग्रह बेताचाच होता, व वर्गणीदारहि फारसे नव्हते. सन १९३८ सालच्या सुमारांस नगरपालिकेनें आपली जुनी इमारत पाडून नवीन इमारत बांधण्याचें ठरविल्यामुळें ने. ज. लायब्ररी लो. टिळक स्मारक संस्थेंत समाविष्ट झाली. व अशा रितीनें टिळक ग्रंथसंग्रहालयांत नियतकालिकांचा विभागहि सुरू झाला.

संस्थेचा स्थिर निधि ३५०० रुपयांचा असून एकूण वार्षिक खर्च सुमारें २५०० रुपयांचा आहे. वर्गणीचें उत्पन्न अंदाजें १२०० रुपयांचें आहे. सरकारनें संस्थेस तालुका वाचनालय म्हणून

मान्यता दिली असून सरकारकडून प्रतिवर्षीं देणगी मिळते. त्याचप्रमाणें नगरपालिकाहि आर्थिक सहाय्य देत असतें. तालुका वाचनालय म्हणून मान्यता मिळाल्यानंतर संस्थेच्या कार्याची वाढ बरीच झाली आहे. स्त्रिया व बाल वाचकांसाठीं स्वतंत्र विभाग असून ग्रंथसंग्रहांत एकूण ४५०० ग्रंथ आहेत. सुमारें ५०० ग्रंथ सन १९०० सालापूर्वीचे असून त्यांचा उपयोग संदर्भ ग्रंथ म्हणून करण्यांत येतो. वाचकांची रोजची संख्या सुमारें १२५ ते १५० असते. ग्रंथालयांत १० दैनिकें, १८ साप्ताहिकें व अर्ध साप्ताहिकें आणि १८ मासिकें येतात. नियतकालिकांसाठीं दरसाल ५०० ते ६०० रुपये खर्च होतात. संस्थेतर्फे पुणें विद्यापिठाचें बहि:शाल केंद्रहि चालविलें जातें. बहि:शाल केंद्रालाहि नगरपालिकेची आर्थिक मदत मिळते.



वाचक वर्ग.

लो. टिळक स्मारक संस्थेस कै. न. चिं. केळकर, कै. जमनादास मेहता, प्रा. न. र. फाटक, नामदार यशवंतराव चव्हाण, मुंबईराज्याचें ग्रथलयाधिकारी श्री. वाकनीस व महामहोपाध्याय, द. वा. पोतदार इत्यादि नामवंत व्यक्तींनीं भेट दिली असून संस्थेच्या कार्याबद्दल समाधान व्यक्तविलेलें आहे. लो. टिळक ग्रंथसंग्रहालय हा अशा प्रकारें वांई नगरीचा एक सांस्कृतिक ठेवाच आहे.

"महिला स्नेहसंवर्धक समाज, वांई."

महिलांच्या उन्नतीसाठीं व सामाजिक कार्य करण्याची आवड व संवय निर्माण व्हावी म्हणून येथें सन १९३८ सालीं "महिला समाज" नांवाची सस्था स्थापन झाली. त्यावेळीं फक्त १०।११ सभासद होते. समाज शिक्षण व साक्षरता प्रसार व्हावा म्हणून सदर संस्थेतर्फे निरनिराळीं व्याख्यानें घेणेंत येत असत. अशिक्षित स्त्रियांस शिक्षण देणेसाठीं वर्गहि घेतलें जात असत. तसेंच चैत्री हळदीकुंकू, कोजागिरी वगैरे सारखें वार्षिक सांस्कृतिक समारंभ घडवून आणून स्त्रियांचें शिक्षण व सामाजिक जीवन यांवर चर्चा घेतली जात असे. शारीरिक शिक्षणासाठीं स्त्रियांचे खेळ वगैरे घेतले जात असत. अशा रीतीनें संस्थेतर्फे निरनिराळीं कार्यें चालूं असत. अधिक जबाबदारी स्वीकारणेचें दृष्टीनें व प्रगतीचे दृष्टीनें पुढें पाऊल टाकण्याच्या निश्चयानें संस्थेनें सन १९५१ सालीं आपली घटना तयार केली व सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट खालीं दि. ३ ऑगस्ट १९५१ रोजीं २६८७।५१-५२ या क्रमांकानें "महिला स्नेहसंवर्धक समाज" या नांवानें ही संस्था रजिस्टर्ड करून घेतली. सदर वेळीं सस्थेच्या सभासदांची संख्या ३५ पर्यंत वाढली होती.

संस्थेचें ध्येय–

(१) स्त्रिया व मुलें यांचीं सर्वांगीण उन्नति व विकास करणें.

(२) अशिक्षितांस शिक्षित करणें व समाजसेवा करणें.

(३) गरीब महिलांचें करितां उद्योग मंदिर चालविणें. या व अशा स्वरूपाच्या गोष्टी अंमलांत आणणेचें ठरविलें.

महिला स्नेहसंवर्धक समाज



बालक मंदिर

सन १९५१ सालीं लहान मुलांचे करितां "बालक मंदिर" नांवाची शाळा स्थापून लहान बालकांस योग्य शिक्षण देणेस सुरुवात केली आहे. प्रारंभी ८।९ मुलेंच होती. आतां ती संख्या वाढत जाऊन ती ६० पर्यंत पोहोचली आहे. १ मोलकरीण २ शिक्षिका ठेवणेत आल्या आहेत. मुलांचें अल्प वयांतच योग्य ते सांस्कृतिक वळण देण्याचे दृष्टीनें शिक्षण दिलें जातें. सदरचें कार्य संस्था मोठ्या आस्थेनें, चिकाटीनें परंतु यशस्वीपणें चालवीत आहे. वांईकर नागरिकहि मोठ्या आस्थेनें व आपलेपणानें संस्थेस मदत करून उत्तेजन देत आहेत. नगरपालिका आर्थिक मदत देत आहे. संस्था याप्रमाणें गेली महा बर्षे हा वर्ग चालवीत आहे. सदरची संस्था शिक्षण खात्यांमार्फत लौकरच सरकारमान्य होऊन रजिस्टरहि होणार आहे. येथील टिळक स्मारक मंदिर या संस्थेनें सदर शाळेचे वर्ग भरविणेसाठीं आपली जागा विनामूल्य देऊन संस्थेस कायमचे ऋणी केलें आहे.

वरीलप्रमाणें संस्थेस निरनिराळीं कार्यें करण्यासाठीं जागेचो अडचण तीव्रपणें भासूं लागली. उद्योगमंदिर चालविणेसाठीं तर स्वतःची जागा असणें अत्यंत जरुरीचें वाटूं लागलें, म्हणून संस्थेनें स्वतःची जागा व इमारत बांधणेचा संकल्प केला. संस्थेचे सभासद श्री. अन्नपूर्णाबाई कृष्णराव ऊर्फ माईसाहेब रास्ते यांनीं आपलें स्वतःची गणपतीआळीचे घाटावरील जागा सदरचे इमारतीसाठीं देऊं केली. तसेंच संस्थेचे सभासदांपैकीं १०-१५ सभासदांनीं रुपये १०० प्रमाणें देणगी देऊन इमारतीसाठीं मोठ्या प्रमाणांत निधी जमविला. वांई नागरिकांनींहि मोठ्या प्रेमानें, कौतुकानें व विश्वासानें सदर निधीस सढळ हातानें देणग्या दिल्या आहेत. संस्थेचे सभासदांनींहि नाटकें करून, एस्. एस्. सी. व पी. एस् सी. परिक्षेचेवेळीं विद्यार्थ्यांना स्वच्छ व माफक दरानें फराळाचें सामान पुरविणेसाठीं कँटिन्स् चालवून इमारत निधी झपाट्यानें वाढविला, व अशा रितीनें रक्कम जमवून इमारत बांधली. इमारतीस सुमारें ५००० रुपये खर्च झाले आहेत. नगरपालिका वांई, वांई कंझ्युमर्स सोसायटी, अर्बन बँक वगैरे संस्थाहि आर्थिक मदत करीत असतात. नागरिकांनीं आपलें प्रेम व विश्वास अधिक प्रमाणांत दर्शविल्यास ही संस्था, अधिक स्थिरपायावर उभी राहील अशी निश्चित व बळकट आशा संस्था चालकास वाटत आहे.

संस्था पब्लिक ट्रस्ट रजिस्ट्रेशन कायद्याखालीं सन १९५३ सालीं N. S. F. २२ या नंबरनें रजिस्टर करणेंत आली आहे. संस्थेचे जमाखर्च सरकारमान्य तपासनिसाकडून सालोंसाल तपासून घेतले जात आहेत. संस्थेचे सभासद दरसाल वाढतच आहेत. हल्लीं सभासद संख्या ६० चे वर गेली आहे. ती उत्तरोत्तर वाढत जाईल अशी आशा व उमेद आहे.

स्त्रियांचे व लहान मुलांचे उन्नतीसाठीं व विकासासाठीं मोठ्या आस्थेनें कार्य करणारी व

लोकांदरास व विश्वासास पूर्णपणें उतरलेली म्हणून या संस्थेचा उल्लेख करावा लागेल. वांई शहराचे लौकिकांत भर घालणाऱ्या संस्थेपैकीं ही एक संस्था नमूद केल्यास अस्थानीं होणार नाहीं.

वांई महिला मंडळ

वांई महिला मंडळ ही संस्था सन १९३४ सालीं स्थापन झाली. ही संस्था अखिल भारतीय महिला मंडळाची शाखा आहे. संस्थेच्या स्थापनेच्या वेळीं फक्त पंचवीस सभासद होते. स्त्रियांना आतां महिला मंडळाचे व त्याचे कार्याचें महत्व पटूं लागलें आहे हल्लीं सुमारें २५ वर्षांनंतर या महिला मंडळाचे ३५० सभासद आहेत. यावरून संस्थेच्या प्रगतीची कल्पना येते. मंडळाची मभासद वर्गणी वर्षाला फक्त ४ आणे ठेविली आहे.

संस्थेचें कार्य:— अगदीं प्रथम स्थापना झालेनंतर त्यावेळीं वर्षांतून फक्त २-३ व्याख्यानें होत असत. व्याख्यानाचेद्वारा स्त्रियांच्या अडीअडचणींचीं व सामान्य कायद्याची तसेंच महिला मंडळानें स्त्रियांचेकरितां काय कार्य करावें याची माहिती देणेत येत असे. सन १९४५ सालीं महाराष्ट्र प्रांतिक भरविली होती. या महिला मंडळानें वेळोंवेळीं दुष्काळग्रस्तांना पैशांनीं, कपड्यांनीं, धान्य रूपानें मदत केली आहे. तसेंच त्यांच्या मदतीकरितां मंडळाच्या सभासदांनीं "कुलवधू" हें नाटक केलेलें होतें, हल्लीं या मंडळातर्फे (१) दूधकेंद्र (२) नॅशनल सेव्हिंग्ज सर्टिफिकेटस् एजन्सी, (३) शारदोत्सव (४) सामुदायिक आवळीभोजन, (५) कोजागिरी, (६) बालवाडी (लहान मुलांना शिक्षण) अशी निरनिराळीं कामें चालूं आहेत.

(१) दूध केंद्रें:— ह्या मंडळातर्फे वांई शहरांत एकूण तीन दूधकेंद्रें चालूं केलीं आहेत. (१) प्राज्ञपाठ शाळा, गंगापुरी, (२) मैनाताई सुरत्राण धर्मपुरी यांचे घरीं (३) सौ. कोठावळे, रविवार पेठ यांचे घरीं. या तीन केंद्रांतून दूध वांटपाचें काम चालूं आहे. हल्लीं याचा फायदा सुमारें १५० गरीब मुलें घेत आहेत. प्रतिवर्षी १५ ऑगष्ट या स्वातंत्र्य दिनाचे दिवशीं सर्व मुलांना खाऊ वाटण्यांत येतो.

(२) नॅशनल सेव्हिंग्ज सर्टिफिकेटस्:— महिला मंडळातर्फे नॅशनल सेव्हिंग्ज सर्टिफिकेटस् जास्तींत जास्त खपविणें व त्याचा प्रचार करण्याचें कार्य मंडळांतील (१) सौ. मराठे, (२) सौ. खिरे, व (३) सौ. वाकडे या भगिनी करीत आहेत. सर्टिफिकेटस् खपविल्याबद्दल शेंकडा १ रुपया चार आणे सरकारी कमिशन मिळत असतें. ह्या कमिशन पैकीं रु. ०-१२-० हें एजंटास दिलें जातें. व रु. ०-८-० ही रक्कम महिला मंडळांस घेतली जाते. या रकमेंतून गरीब विद्यार्थ्यांना शाळेच्या फी करितां शक्य ती मदत मंडळाकडून करणेंत येते. पूर्वी हरिजनांना विहीर बांधण्यासाठीं या मंडळानें मदत केली आहे. तसेंच महर्षि कर्वे शताब्दी निधीकरितां संस्थेनें रुपये १०० मदत दिली आहे. कर्मवीर भाऊराव पाटील संस्थापक रयत शिक्षण संस्था यांना १५ रुपये देणगी दिली. अशा प्रकारची शक्य तीं तीं लोकोपयोगीं कामें केलीं जात आहेत.

शारदोत्सव— हा उत्सव प्रतिवर्षी नवरात्रामध्यें नऊ दिवस या मंडळातर्फे साजरा केला जातो. पहिल्या दिवशीं सर्व सभासदांना हळदीकुंकू व कॉफीपान असा कार्यक्रम होतो. पुढें आठ दिवस प्रत्येक दिवशीं निरनिराळे कार्यक्रम व्याख्यान, भजन, देशी खेळ, नाटक वगैरे सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रम केलें जातात.

बालवाडी— बहुजन समाजांतील नागरिकांचें लहान मुलांना शिक्षण देण्याचे दृष्टीनें १५ ऑगस्टचे सुमुहूर्तावर सनगर आळींतील श्री विठ्ठल मंदिरामध्यें ही बालवाडी स्वतंत्र स्थापन केली. यांमध्यें २॥ ते ६ वर्षापर्यंतचीं मुलें येतात. त्यांना

शुद्ध बोलणें, स्वच्छता, नीटनेटकेपणा, सणांची माहिती व इतर सामान्यज्ञान वगैरे गोष्टी शिकविल्या जातात. मुलांचा वयोमानाप्रमाणें अभ्यासहि घेतला जातो. हल्लीं या बालवाडी मध्यें सुमारें तीस मुलें शिकत आहेत.

महिला मंडळ या संस्थेच्या विद्यमान सेक्रेटरी सौ. प्रमिला प्रभुणे व सौ. सिंधूताई गोगटे या आहेत. अध्यक्ष म्हणून सौ. शांताबाई मराठे या काम पहात आहेत. या शिवाय २० महिलांचे एक कार्यकारी मंडळ आहे. सर्व महिला भगिनी मंडळाचें काम उत्साहानें व एकजुटीनें करीत आहेत. अगदीं प्रथम या संस्थेच्या अध्यक्ष सौ. उमाबाई भट व सेक्रेटरी श्रीमति सरलाबाई सोमण होत्या.

अशा तऱ्हेनें ही संस्था आज २५ वर्षें निरनिराळीं कामें करीत प्रगतीच्या मार्गानें वाटचाल करीत आहे व तिची अशीच उत्तरोत्तर प्रगति होत राहील अशी आशा आहे.

— किशोर कुंज —

हे 'किशोर कुंज' सौ. संजीवनी पाटणकर व कु. मालती रुईकर यांनीं दिनांक १८-१-५८ रोजीं सुरू केलें. या शाळेंत लहान मुलांना चांगल्या प्रकारें शिक्षण दिलें जातें. सुरुवातीस शाळेंत ६ मुलें होतीं. हल्लीं ५७ विद्यार्थी आहेत. या शाळेस स्थानिक व परगांवच्या मोठ्या लोकांनीं भेटी देऊन समाधान व्यक्त केलें आहे. फी अत्यंत अल्प ठेविली आहे. बौद्धिक शिक्षणाबरोबर थोडेसें शारीरिक शिक्षणहि या शाळेंत दिलें जातें. शाळा चालकांनीं आतांपर्यंत २२५ रुपये खर्चून विद्यार्थ्यांना उपयुक्त अशीं साधनें खरेदी केली आहेत. आर्थिक मदत मिळाल्यास शाळा चांगली चालेल, असा चालकांचा भरंवसा आहे.

— ब्राह्मसमाज वांई —

ब्राह्मसमाज ही संस्था दि. ४ जुलै १९३३ रोजीं स्थापन झाली. ब्राह्मसमाजानें सत्यशोधक, हीरकोत्सव, अस्पृशता निवारण परिषद, मराठा मोफत वाचनालय, श्री शिवजन्मोत्सव इ संस्था चालविल्या. गरीब व अस्पृश्य मुलांसाठी "राममोहन विद्यार्थीगृह" १९३६ सालीं सुरू केलें. कार्यकर्त्यांनीं दौरा काढून, निधी जमवून प्रशस्त इमारत मिळविली. सन १९५६ पासून "महर्षि शिंदे विद्यामंदिर" या दुय्यम शाळेस संस्थेची इमारत देऊन गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय केली. शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रांत आपल्या कार्यानें प्रसिद्धी पावलेले गुरुवर्य बाबूरावजी जगताप (पुणें) हे समाजाचे ट्रस्टी आहेत. दर रविवारीं मंदिरात उपासना होते. वार्षिकोत्सव वैशाख शुद्ध पौर्णिमेस होत असतो. त्यावेळीं उपासना, सभा, प्रवचनें, कीर्तनें, संमेलन, प्रीतिभोजन इ. कार्यक्रम होतो. विश्वबंधुत्वाची व मानवधर्माची संतांची शिकवण हें या कार्यक्रमांचें नि पर्यायानें संस्थेचें उद्दिष्ट आहे.

अेकलव्य विद्यार्थी वसतिगृह, वांअी

या वसतिगृहाची स्थापना दिनांक २-१०-१९५६ रोजीं महात्मा गांधी जयंतीच्या सुमुहूर्तावर झाली.

उद्घाटन– समारंभ माननीय नामदार यशवंतराव चव्हाण मुख्यमंत्री, मुंबईराज्य यांचें हस्तें झालें.

अध्यक्ष– मान्यवर तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे आहेत, व व्यवस्थापक– माननीय एस्. एस्. कांबळे हे आहेत.

वसतिगृहांत सध्यां २५ विद्यार्थी रहात असून ते सर्व जातींचे व सर्व धर्मांचे आहेत.

या वसतिगृहामुळें गरीब पण हुशार अशा विद्यार्थ्यांची वांईत राहण्याची व जेवणाची सोय झाली आहे. पुढील वर्षांपासून विद्यार्थ्यांची संख्या आणखी वाढविली जाणार आहे. मराठी प्रदेशांतील कोठल्याहि विद्यार्थ्यांस प्रवेश दिला जातो. वसतिगृह सरकारमान्य झालें आहे. या वसतिगृहास सुरुवातीला प्राज्ञपाठ शाळा मंडळानें आश्रय देऊन आपल्या ताब्यांतील रविवार पेठेंतील भव्य वाडा वापरण्यास दिला. आणि आतां तर प्राज्ञपाठ शाळा मंडळानें मंडळाची एक शाखा म्हणूनच चालविण्याचें ठरविलें आहे. त्यामुळें वसतिगृहाचा पाया भक्कम झाला आहे. याबद्दल कार्यकारी मंडळ प्राज्ञपाठ शाळा मंडळाचें ऋणी आहे.

श्री गोवर्धन संस्था, वांअी.



भारतांत गोरक्ताचा एकहि बिंदू सांडला जाऊं नये आणि सर्व भारतीयांना गाईचें दूध, तूप भरपूर मिळावें व कृषीप्रधान भारताला शेतीसाठीं बैलांचा भरपूर पुरवठा व्हावा या ध्येयानें प्रेरित होऊन श्री छत्रपति शिवरायांचे कर्मभूमींत व श्री कृष्णामातेच्या पवित्र परिसरांत श्री क्षेत्र वांई येथें कार्तिक शुद्ध १० सोमवार शके १८२७ (इ. स. १९०५) रोजीं श्री गोवर्धन संस्थेची स्थापना श्री चौंडे महाराजांनीं केली. सरकारी कायद्याप्रमाणें ही संस्था रजिस्टर्ड झालेली आहे.

शेतकऱ्यांस पोसवेनासे झालेल्या गायी व बैल संस्थेंत ठेऊन घ्यावयाचे व संस्थेंत चांगल्या असलेल्या गायी बैल त्यांस बदला द्यावयाचे अशा पद्धतीनें आतांपावेतों तीस हजारावर गायी बैल योग्य अटीवर विनामूल्य पाळावयास देऊन संस्थेनें कृषिसेवाहि साधली व यायोगें सुमारें दोन लाख रुपये शेतकरी बंधूंच्या झोपडींत पोचविल्याचें श्रेयहि लाभलें आहे. बृहन् महाराष्ट्रांत ४० गोशाळांची स्थापना केली. कोल्हापूरचे शाहू महाराज यांनीं राधानगरींत गोमातेसाठीं शेंकडों एकर चराऊं कुरण दिलें होतें.


संस्थेनें १९२३ सालीं गोप्राणदान महायज्ञाची मोहीम सुरू केली, व कोल्हापूर ते मुंबई या प्रमुख १८ ठिकाणीं प्रचारक नेमून कार्यास सुरवात केली. या प्रचाराचा सुपरिणाम असा झाला कीं, " १९१९ सालीं वांद्रयाच्या कत्तलखान्यांत ६४ हजार गायींचा संहार होत होता. व तोच आंकडा १९२७ सालीं १३ हजारावर आला. " यावरूनच संस्थेच्या कार्याची प्रगति दिसून येईल.

सन १९२४ मध्यें बेळगांवचे काँग्रेस अधिवेशनास जोडूनच अखिल भारतीय गोपरिषद पू. महात्मा गांधी यांचे अध्यक्षतेखालीं झाली. या परिषदेनंतर अखिल भारतीय गोरक्षण मंडळाची स्थापना झाली.

सन १९२८ पासून संस्थेच्या पुरस्कारानें कार्तिक शु. १ ते ८ पर्यंत होणाऱ्या गोपाष्टमी उत्सवास राष्ट्रीय स्वरूप येऊन राष्ट्रीय गोरक्षण सप्ताह या नांवानें हा सप्ताह दरवर्षीं भारतभर साजरा होतो.

गोरक्षण, गोपालन व गोसंवर्धन यांचें यथार्थ ज्ञान मिळावें या दृष्टीनें गोज्ञान कोशाचें प्राचीन, मध्ययुगीन व अर्वाचीन असें एकूण तीन खंड तयार केलें आहेत.

२५ नोव्हेंबर १९५५ रोजीं संस्थेला ५० वर्षें पूर्ण झाली. म्हणून गोब्राह्मण प्रतिपालक श्री छत्रपति शिवाजी महाराजांच्या वंशज श्रीमंत



– श्री गोवर्धन संस्था, वांओ. –

सुमित्राराजे राणीसाहेब यांचे अध्यक्षतेखालीं वांई येथें संस्थेचा सुवर्ण महोत्सव अत्यंत थाटानें साजरा झाला.

गोसेवा हें स्वतंत्र भारताचें आद्य कर्तव्य समजून गोरक्ताचा एकहि बिंदू भारत वर्षांत या पुढें पडला जाणार नाहीं. असा अमृताचा दिवस आपले भारत सरकार भारतीयांना लवकरच दाखवील असा आत्मविश्वास वाटतो.

दि वांई अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि. वांई.

वांओ हें एक लहानसें पण सुंदर शहर आहे येथील नागरिक सुधारक व प्रगतिशील आहेत. मोठ्या शहरांतील बहुतेक सर्व प्रकारच्या सोयीं व योजना या लहानशा शहरांत सुरू करणेबद्दल ते मोठ्या दक्षतेनें पुढाकार घेत असतात. शहराचे सुधारणेचे दृष्टीनें आर्थिक उलाढाल करणारी एखादी संस्था असणें आवश्यक वाटूं लागलें होतें. लहान लहान व्यापारी, कारखानदार व मध्यम वर्गीय नागरिक या सर्वांस भांडवल व आर्थिक सहाय्य अगतिकत्वामुळें खाजगी सावकारांकडून भारीदराचें व्याजानें नेहमीं उचलावें लागत असें. त्यामुळें अल्प व्याजाचे दरानें काटकसरीचें धोरणानें आर्थिक सहाय्य देणारी एकादी संस्था असावी अशी सर्वांस जरूरी भासूं लागली. सन १९२१ सालचे सुमारास सहकारी संस्था स्थापन करणेची चळवळ सुरू झाली होती. सरकारकडूनहि त्या बाबतींत मोठ्या प्रमाणावर प्रचार चालूं होता. श्री. सर मदन, साहेब आय्. सी. एस्. हे त्यावेळीं ह्या भागांत आले होतें ह्या सर्व संधीचा पूर्ण फायदा घेऊन येथील श्री. दत्तात्रय खंडेराव ऊर्फ दादा बाकडे, दिवंगत शेट चुनिलाल सुंदरलाल गांधी, श्री. कोंडो गणेश ऊर्फ तात्यासाहेब दामले, आदि मंडळींनो खटपट करून वांईत



दि वांअी अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि. वांअी ..... संस्थेची नवी इमारत

दि. ३-६-१९२१ रोजीं "दि वांई तालुका व्यापारी सहकारी क्रेडिट सोसायटी" या नांवाची संस्था स्थापन केली. त्यावेळीं संस्थेचें भांडवल रुपये २०४१-५-६ होतें. सभासद संख्या अवघी २१ होती व नोकरवर्ग म्हणजे १ कारकून होता. प्रारंभी संस्था बँकिंगचा धंदा करीत नव्हती. सदर सोसायटीनें आपला व्याप दिवसेंदिवस वाढविला व सन १९३१ सालीं बँकिंगच्या व्यवहाराची पूर्णपणें जबाबदारी स्वीकारून संस्थेनें आपलें नांव बदलून "दि वांई अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि." हें नांव धारण केलें. तेव्हां पासून संस्था बँकिंगचा व क्रेडिटचा धंदा करूं लागली. सदर वेळीं संस्थेची सभासद संख्या ७४ होती व भांडवल रुपये ४६९९५ होतें.

सन १९४६ सालीं संस्थेस २५ वर्षें पूर्ण झाली. त्यानिमित्त "रौप्यमहोत्सव" समारंभ नामदार श्री. वैकुंठलाल मेहता, बी. ए. भूतपूर्व अर्थमंत्री मुंबई राज्य, यांचे अध्यक्षतेखालीं दि. १६ जून १९४६ रोजीं साजरा करणेंत आला या समारंभाचे वेळीं कायमचे व स्थैर्याचे दृष्टीनें संस्थेनें आपली स्वतःची इमारत बांधणेचा संकल्प जाहीर करून अध्यक्षांचे हस्तें सदर इमारतीचा "कोनशिला" समारंभ साजरा केला. हल्लींची भीषण महर्गता, जिनसांची दुर्मिळता, परवानें वगैरें अडचणी मार्गांत होत्या. संस्थेची कुवत ही बेताबाताची. परंतु वांई नागरिकांचे व सभासदांचे सहानुभूतीनें व सहकार्यानें संस्थेची इमारत अल्पावधितच म्हणजे सन १९५०

सालीं पुरी झाली. इमारतीचा औपचारिक "उद्घाटन" समारंभ दि. ७ एप्रील १९५१ रोजीं आपले जिल्ह्याचे पुढारी दिवंगत श्री. भाऊसाहेब सोमण, भूतपूर्व अध्यक्ष वरिष्ठ कायदे कौन्सिल मुंबईराज्य, यांचे अध्यक्षतेखालीं साजरा करणेंत आला.

संस्थेचें कार्यक्षेत्र अत्यंत मर्यादित म्हणजे वांई नगरपालिकेच्या हद्दीपुरतेंच आहे. व्यापारी उलाढाल ही बेताबाताचीच असूनहि संस्था इतर संस्थांप्रमाणें उल्लेखनीय व अभिमानास्पद कार्य करीत आहे. स्वत:ची इमारत बांधून संस्थेनें मोठें स्थैर्य निर्माण केलें आहे. संस्थेनें आपले संकल्पित भांडवल नुकतेच पुरें केलें असून तें वाढविणेची गरज तिला भासत आहे. शहराचे दृष्टीनें आवश्यक गरज म्हणजे "बदिस्त सुरक्षित तळघर" ही योजना संस्थेनें अंगावर घेतली असून ती लवकरच पूर्ण होईल, अशी तिला उमेद आहे.

शहरांची सुधारणा होणेस ज्या प्रमाणें नगरपालिकांची जरूरी आहे, त्याचप्रमाणें नागरिकांची आर्थिक उन्नति अगर विकास होणेस स्थानिक आर्थिक उलाढाल करणारी संस्था पाहिजे. ती गरजहि संस्था मोठ्या आस्थेनें, आत्मीयतेनें, सहकारी तत्त्वावर, नागरिकांचें प्रेम, आदर, विश्वास संपादून मोठ्या दिमाखानें करीत आहे. चिरस्थायी सुदृढ लोकशाही नांदणेस इतर गोष्टींबरोबर नागरिक सहकारी बँकांची फारच जरूरी आहे. प्रत्येक नागरिकानें आपली अल्प, स्वल्प शिल्लक बँकेंत ठेवणें आपलें कर्तव्य समजावें. व तसें न करणें म्हणजे स्वत:ची, शहराची व पर्यायानें राष्ट्राची हानी होय. व्यक्तीनें व्यक्तिपुरते न पाहतां नागरिक, सामाजिक व राष्ट्रीय हित पाहिलें पाहिजे. व्यक्तिगत द्रव्यशक्ति बँकेचेद्वारा एकत्रित केल्यास आपण नागरिक, सामाजिक व राष्ट्रीय विकास व उन्नति करणेस हातभार लावूं शकूं. संस्थेचे हल्लीचे सभासद ११०० पर्यंत असून खेळते भांडवल रुपये ७,२३,००० पर्यंत आहे. शहराचे लौकिकांत भर घालणाऱ्या संस्थेपैकीं ही एक आदर्श संस्था म्हणूनच हिचा उल्लेख केला जात आहे.

दि वांई कन्झ्युमर्स को-ऑपरेटिव्ह सोसायटी लि. वांई.

सदर संस्था म्हणजे पांढरपेशा, सुशिक्षित लोकांनीं आपले रोजचे इतर व्यवसाय सांभाळून केवळ सहकारी तत्वावर चालविलेलें एक सोयिस्कर दुकान ! व्यापारी पेशास सर्वस्वी पारखे व अगदीं अनभिज्ञ असूनहि गेली १५ वर्षें मोठ्या चिकाटीनें परंतु यशस्वी रीतीनें संस्था दुकान चालवीत आहे. संस्थेनें सरकारमार्फत नियमित दरानें मिळणारें बहुतेक सर्व जिन्नसांचें वांटप काम सरकारी नियमांचें कांटेकोरपणें पालन करून, सभासदांचा व गिऱ्हाईकांचा संतोष मिळवून कायद्याप्रमाणें जास्तींतजास्त डिव्हीडंड (भागनफा) दरसाल रु. ६¼ टक्के देऊन संस्था उत्तम तऱ्हेनें चालविली जात आहे. संस्था "अ" ऑडीट वर्गांत आहे. ६¼ टक्के भागनफा देऊनहि रहाणारे नफ्यांतून गिऱ्हाईकास त्यांचे खरेदीवर ३ ते ६ टक्के पर्यंत गिऱ्हाईक संतोष नफा (Consumers Bonus) वाटत आहे. याशिवाय प्राथमिक उपचाराचीं उपकरणें ठेवून गरजूं लोकांस ती अल्प भाड्यानें देणेचीहि व्यवस्था ठेविली आहे. अशा तऱ्हेची यशस्वी रितीनें चालूं असलेली इकडील भागांतील हीच एकमेव संस्था म्हणून तिचा नामनिर्देश करावा लागेल. उत्तरोत्तर संस्था आपला व्याप वाढवीत आहे. वांईकर नागरिकांचा विश्वास या संस्थेनें मिळविला असून वांईंतील एक "आदर्श सहकारी संस्था" म्हणून वांई नगराचें इतिहासांत तिचें नांव

नमूद करणें उचितच आहे. संस्थेची माहिती—
स्थापना १७-४-१९४३; ऑडीटवर्ग "अ"
सभासद १८२ शेअर भांडवल ८६५०
रिझर्वफंड १५०९ इतर फंडस् ३०१४
खेळते भांडवल ३४६०९

Willis F. Pierce Memorial Hospital
of the

AMERICAN MARATHI MISSION

Wai (Satara Dist.)

A Short History Of The Wai Mission Hospital

वांईहून साताऱ्यास जातांना वांईच्या सरहद्दीवरच वसलेलें भव्य मिशन हॉस्पिटल् ही भारतविख्यात संस्था होय. मानवता प्रेमानें प्रेरित होऊन अमेरिकेंतील एका कनवाळू डॉक्टरनें प्रारंभ केलेली ही संस्था मृत्यूच्या जबड्यांत जात असलेल्या असंख्य रुग्णाअितांना सुखरूपपणें नि सुरक्षितपणें बाहेर काढीत आहे. कुशल शास्त्रज्ञांच्या देखरेखीखालीं चाललेल्या या हॉस्पिटलचें कार्य बहुमोल आहे. नगरपालिकेनें कुटुंब नियोजनासंबंधीं शस्त्रक्रिया यज्ञ उघडलेवेळीं याच हॉस्पिटलनें केलेलें सर्वतोपरी सहाय्य नगरपालिकेस विसरतां येणार नाहीं. या संस्थेची माहिती त्यांच्याच शब्दांत वाचणें उचित होईल.

Dr. and Dr. Mrs. Lester H. Beals started medical work in Wai on behalf of the American Marathi Mission in December 1908, in the building called "**Kasarmadi**". In 1913 the first two buildings were built in the present hospital compound with a generous donation from the N. M. Wadia Trust.

In 1920 Dr. Walter F. Hume came to India to work in the Wai Hospital. In 1926 the femaleward, the major operation theatre and the E. N. T. theatre were built with a donation from the Brewer family of America.

In 1929 an X—Ray plant was installed by the generous donation of Dr. J. E. Abbott. In 1937 the enlarged Maternity Ward, Administration Building and the Sanitary Block were built by money kindly donated by Dr. Willis F. Pierce. In 1953 the Dharmashala was opened by Karmaveer Bhaurao Patil. This very needed dharmashala was built by kind donations from Indian friends of the Hospital and Dr. Hume. Dr. P. S. Marathe and Mr. R. B. Merukar took a leading part in raising funds for this purpose, and the hospital is grateful to them. In the same year a modern X-Ray plant was installed by donations of friends of Dr. Hume in America. In 1957 the hospital built a new out-patients Department, an X-Ray Room, an Isolation ward and a Nurses Home. These buildings were built by donation of late Dr. J. E. Abbott and other well wishers of the hospital in America.

Now the hospital is a 125 bed one, with well equipped laboratory, modern X-Ray plant, and four well-equipped operation theatres. Every year the hospital treats many thousands as in-patients and tens of thousands as out-patients. More than 2000 operations (both major and minor) are performed in the hospital every year. The hospital

has got a government recognised Nurses Training School.

Some of the present medical practitioners of Wai received practical training in the Wai Mission Hospital. Many other doctors trained in the Wai Mission Hospital are serving the sick in many other places too.

The Hospital is proud of the fact that it has been an institution dedicated to serve the sick and to train men and women for the same purpose. Our motto is "To minister and not to be ministered unto"

— वांई व्यायाम शाळा —

ही संस्था "वांई व्यायाम शाळा" या नांवानें संबोधिली जातें. ही संस्था ताब्यांत घेण्यापूर्वी ती पागा तालीम या नांवानें ओळखली जात होती. श्रीमंत सरदार रास्ते यांच्या मालकीची धर्मपुरींतील एक तालीम येवढेंच मर्यादित स्वरूप प्रथम होतें. पागा तालमीचे शेवटचे चालक वस्ताद बुवासाहेब पाटणकर यांनीं ती तरुण व उत्साहि मंडळींच्या ताब्यांत दिली व या मंडळींनी ती १९२३ सालामध्यें ताब्यांत घेतली व या तालमीस "वांई व्यायाम शाळा" हें व्यापक नाव दिलें.

वांई व्यायाम शाळेनें आपली घटना १९४० सालीं तयार केली व संस्थेस घटनात्मक स्वरूप दिलें. घटनेप्रमाणें संस्थेसाठीं पूर्वी ज्यांनीं अत्यंत आत्मीयतेनें परिश्रम घेऊन कार्य केलें त्या सर्वांना आजीव सभासदत्व मिळाले. हल्लीं संस्थेचे हयात आजीव सभासद एकूण ३९ आहेत.

या संस्थेस १९५० सालीं सरकारी मान्यता मिळाली. तेव्हां पासून सरकारी शिक्षण खात्यामार्फत संस्थेच्या कामाची पहाणी व हिशेबाची तपासणी होत आहे. सरकारी शिक्षणाधिकाऱ्यांनीं संस्थेच्या कार्याबद्दल वेळोवेळीं समाधान व्यक्त केलें आहे. पब्लिक ट्रस्ट कायद्याप्रमाणें ही संस्था १९५६ मध्यें रजिस्टर केली आहे.

आतापर्यंत संस्थेचे अध्यक्ष म्हणून श्रीमंत बाळासाहेब साठे, श्री. ग. व्यं. ढवळीकर गुरुजी व श्री. वैशंपायन वकील यांनीं कामें केलीं आहेत. हल्लीं नगराध्यक्ष डॉ. प्र. शं. मराठे हे या संस्थेचे अध्यक्ष म्हणून काम पहात आहेत व श्री. म. स. जोग गुरुजी हे सेक्रेटरी म्हणून काम पहातात.

ही संस्था सर्वस्वी वर्गणीदार व देणगीदार यांच्या दातृत्वावर आणि इतर संस्थांचें मदतीवर चालली आहे. या संस्थेस सरकारी मान्यता मिळाल्यावर मागील पांच वर्षांत सरकारनें सुमारें ३०५० रुपयांची मदत केली आहे. तसेंच वांई नगरपालिकेनेंहि मागील कांहीं वर्षांत सुमारें २२५ रुपयापर्यंत मदत केली आहे. दि वांई अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेकडून प्रतिवर्षी शक्य ती मदत मिळत असतेच. श्रीमंत सरदार रास्ते यांचेकडून प्रतिवर्षी रु. ५१ ची देणगी मिळत असतें. त्यांच्या सहाय्यावरच संस्थेचें स्थैर्य अवलंबून आहे संस्था त्यांची सदैव ऋणी आहे.

या संस्थेंत सध्यां शंभर व्यायामप्रेमी विद्यार्थी आहेत. संस्थेनें जुन्या व नव्या व्यायाम पद्धतीचीं साधनें (डबलबार, सिंगलबार वगैरे) ठेवलेलीं आहेत. प्रशस्त आखाडाहि आहे. इमारतीचे बाहेर विस्तीर्ण पटांगण आहे.

या संस्थेंतील विद्यार्थ्यांनीं पुणें आंतरमहाविद्यालयीन सामन्यांतून भाग घेऊन खेळाचें नैपुण्य दाखवून पहिले क्रमांक मिळविले आहेत. १९५६ पासून देशी विदेशी खेळांचे सामने भरविण्यास सुरुवात केली आहे.

ही संस्था वांईतील प्राथमिक, दुय्यम शाळा,

ट्रेनिंग कॉलेज वांई अशा संस्थांना नेहमीं सहकार्य देत असतें. वांई नगरपालिकेनें दूध वांटप केंद्र सुरू केलें आहे. त्या केंद्राचे कार्याची सर्व जबाबदारी या संस्थेनें घतली असून हें कार्य व्यवस्थित व आपुलकीनें चालूं ठेविलें आहे.

या संस्थेस आर्थिक, शारीरिक व बौद्धिक सहाय्य देणारें अनेक सद्गृहस्थ व संस्था आहेत त्या सर्वांचे आभार मानणें आमचें कर्तव्य आहे.

श्रीमंत गोशाळा रास्ते ऊर्फ दाणेबाजार तालीम, वांई.

(१) सदरची तालीम कै. श्रीमंत गोविंदराव यशवंतराव ऊर्फ नानासाहेब रास्ते यांनीं बांधली. पेठेंतील कै. केदारसिंग परदेशी व रावसाहेब पाटणकर हे नामांकित पहेलवान झाले.

(२) कै. श्रीमंत कृष्णराव गोविंदराव ऊर्फ बाळासाहेब रास्ते यांनीं ही तालीम पेठेंतील व्यायामेच्छु मंडळींच्या ताब्यांत दिली (१९१५) तेव्हांपासून १९२२ पर्यंत कै. मारुतराव ढोणे, कै. चतुरसिंग डाळवाले, कै. श्रीपतराव सुतार, कै. गोपाळसिंग परदेशी, कै. पटुलाल बागवान, कै. न्हानुदादा लोणारी, कै. शंकरराव गिते, कै. गंगाराम चिचकर, श्री. मोहनसिंग डाळवाले, श्री. भाऊ घिसाडी, श्री. महिबुअल्ली बागवान, श्री. चिंगोबा जगदाळे, श्री. शंकरराव जगताप, श्री. बाबूराव खाडे, श्री. कृष्णा झोरे हे नामांकित पहेलवान झाले.

(३) सन १९२२ ते २४ मध्यें तालमीची इमारत पडली. कै. श्रीमंत कृष्णराव ऊर्फ बाळासाहेब रास्ते यांनीं ता १२ नोव्हेंबर १९२४ रोजीं तालमीची इमारत बांधून परंपरेनें उपभोग घेणेच्या करारानें पेठेंतील लोकांच्या ताब्यांत दिली. मंडळींनीं १२०० रुपये खर्च करून तालमीची उत्तम इमारत बांधली. तालीम बांधून झाल्यावर कै. विठ्ठलसिंग डाळवाले, श्री. गणपतसिंग डाळवाले व यासारखे सुमारें २५ पैलवान तयार झाले.

(४) सदर तालमीनें मल्लयुद्धाच्या प्रोत्साहनासाठीं जत्रेचा उपक्रम (चैत्र वद्य ३०) चालूं केला आहे. या तालमीनें हल्लीं वाई तालुका तालीम संघ स्थापन करून तालुक्यांत मल्लयुद्धाचा प्रचार व्हावा व कुस्तीगीर तरूण तयार व्हावेत म्हणून प्रयत्न चालूं केले आहेत. सदर संघामार्फत दर दोन महिन्यांनीं कुस्तीचीं मैदानें भरविण्यांत येतात.

(५) आज या तालमींत ३०-४० होतकरू बालतरूण मल्लयुद्धाचें शिक्षण घेत आहेत.

घाडगे तालीम, वांई.

ही तालीम वस्ताद शंकरराव बिठोजीराव घाडगे यांनीं ब्राह्मणशाहीमध्यें स्थापन केली. शंकरराव घाडगे यांनीं त्यावेळीं सातारचे सुप्रसिद्ध पहिलवान केशर यांचेबरोबर कुस्ती जिंकून तालमीचे नांवास प्रसिद्धी प्राप्त करून दिली. श्री. घाडगे यांनीं मुंबई येथें वस्ताद पापाभाई यांचें आखाड्यांत शिक्षण घेतलें होतें. कुस्तींतील कौशल्यानें त्यांनीं महाराष्ट्रांत २००-३०० कुस्त्या जिंकून नामांकित पैलवान म्हणून महाराष्ट्रांतून गौरव मिळविला. त्यांच्या आखाड्यांत तयार झालेले अनेक पहिलवान आज महाराष्ट्रांत वांई शहराचें व तालुक्याचें नांव महाराष्ट्रांतील कुस्ती शोकिनांच्या तोंडीं गौरवानें घेण्यास लावतात. त्यांपैकीं जुन्या काळचे पहिलवान सर्वश्री– करीमबक्ष पहिलवान, बाळकोबा सूर्यवंशी, ग्यानबा कवे, शंकरराव कोचळे, माधवराव ढगे, अब्दुल बागवान याशिवाय कै. दगडोबा न्हावी, (शिरगांवकर) कै. रामभाऊ जंबुरे, कै. सिताराम भोज वगैरें पहिलवानांनीं त्या काळांत तालुकाभर

V23153C W, 61. N6
123219 J6

तालमीचें नांव कौशल्यानें सर्वतोंमुखीं केलें होतें. त्याचप्रमाणें महाराष्ट्रांत नांवाजलेले कुस्तींतील प्राविण्याबद्दल प्रसिद्ध असलेलें महादू बुरुड हे या घाडगे तालमीचे पठ्ठे आहेत. त्याचप्रमाणें हल्लीं जिल्हा काँग्रेस कमेटीचे अध्यक्ष असलेले श्री. आबासाहेब वोर हे पण पूर्वी याच तालमींत होते. श्री. घाडगे यांचे पुतणे केशवराव घाडगे यांनीं मुंबई, अहमदाबाद व दिल्ली येथें कुस्त्या जिंकून वांईचा गौरव परप्रांतीं करवून घेतला. सध्यां ते बडोदा येथें पोलीस खात्यांत आहेत. तसेंच श्री. शंकरराव घाडगे यांचा मुलगा श्री. शाम घाडगे यांना तर बडोदा राजदरबारीं आश्रय होता. स्वातंत्र्यानंतरच्या संस्थानें विलीनीकरणामुळें सध्यां ते वांईत आहेत. या शिवाय मुंबई पोलीसमध्यें बॉक्सिंगमध्यें चँपियनशिप मिळविणारे श्री. शिवाजीराव कुदळे हे वांई येथील असून घाडगे तालमीचे चेले आहेत. अशा सर्व क्षेत्रांत विखुरलेल्या पुष्कळ पहिलवान मंडळींचे वस्ताद श्री. शंकरराव घाडगे यांचें वय सध्यां ९० वर्षांचें आहे.

—: प्रताप मंडळ, वांई :—

विविध देशी खेळांची जोपासना व्हावी नि त्यायोगें क्रीडाप्रेमी तरूण नियमित एकत्र यावें, त्यांनीं खुल्या मनानें विचार विनिमय करून कांहीं भरीव कार्य करावें या प्राथमिक उद्देशांतून समानशील तरुणांनीं स्थापिलेली क्रीडासंस्था म्हणजेच " प्रताप मंडळ " होय.

संस्थेनें ही क्रीडेची आवड शिशु-बालापासून प्रौढापर्यंत निर्माण केली आहे हें विशेष. आज मंडळाच्या क्रीडांगणावर शिशु नि बाल मौजेनें खेळत असलेलें वेधक दृश्य पहातांना क्षणभर पाऊलें रेंगाळविल्याविना पुढें जावबत नाहीं! बहुविध खेळ खेळले नि खेळविलें जातात. तथापि 'हुतुतू' या शरीरास सर्वांगीण व्यायाम देणाऱ्या खेळाचें पद्धतशीर शिक्षण मंडळाकडून दिलें जाते. या खेळांतील स्पर्धांत मंडळानें अनेक ठिकाणीं जाऊन पारितोषिकें पटकाविलीं आहेत.

संस्थेचें कार्यालय व क्रीडांगण गंगापुरी येथील मध्यवर्ती " शाहीर चौकांत " असून संस्थेच्या विद्यमानें लागोपाठ तीन वर्षें श्रीगणेशोत्सवांत संगीत मेळाहि यशस्वी रीतीनें चालविला होता. प्रतिवर्षी संस्था श्रीगणेशोत्सव व श्रीसत्यनारायण महापूजा हे धार्मिक विधि साजरे करते.

" प्रताप मंडळ " ही वांईतील महत्त्वपूर्ण सार्वजनिक क्रीडासंस्था असून वांईतील सर्व भागांतील क्रीडाप्रेमी तरूण तिचे सभासद आहेत. संस्थेपुढें विविध कार्यक्रमांचा संकल्प असून ते कार्यान्वित करण्याची चालकांची ईर्षा आहे. " भावनेशिवाय माणूस नाहीं नि ईर्षेशिवाय कार्य नाहीं " हें संस्थेचें ब्रीदवाक्य आहे.

रविवार मंडळ, वांई.

स्थापना:- या मंडळाची स्थापना १९३८ सालीं करणेंत आली.

उद्देश:- बहुजन समाजांत देशी खेळांची आवड, समाजसेवा व सहकार्य यांची जोपासना व्हावी.

कार्य:- विविध प्रकारच्या वैयक्तिक व सांघिक खेळांत या मंडळानें भाग घेऊन खूपच नैपुण्य मिळविलें आहे. सातारा, फलटण, कऱ्हाड, पांचगणी व पुणें या ठिकाणीं झालेल्या सामन्यांतून चांगलेच कौशल्य दाखविलें आहे. या मंडळानें सरकारी क्रीडा महोत्सवांत आतांपर्यंत भाग घेतला आहे. या मंडळातर्फे जत्रा, शिवजयंती व गणपती उत्सव मोठ्या प्रमाणावर प्रत्येक वर्षी साजरा केला जातो. या मंडळाचे सर्व कार्यक्रम सर्वश्री गेनू बाळा हेरकळ, नारायणरावजी हगीर, शिवरामपंत कांबळे,

माधवरावजी गुजर, आत्मारामपंत नायकवडी आदि लोकांच्या मार्गदर्शनाखालीं होत असतात. या मंडळानें नवीनच सभा-समारंभाकरितां लागणारें मंडपाचें साहित्य स्वतंत्र घेतलें असून तें सर्वांना अल्प भाड्यामध्यें प्रसंगीं देण्याची व्यवस्था केली आहे. मंडपाचें सामान देणें, घेणें वगैरें बाबतचा सर्व व्यवहार हल्लीं श्री. रामभाऊ भोज हे स्वत: लक्ष घालून पहात असतात.

— सिद्धेश्वर युवक संघ —

सिद्धेश्वर युवक संघाची स्थापना १ सप्टेंबर १९४५ रोजीं झाली व या संघामार्फत "हिंदी मोफत वाचनालय" सुरू झालें. उत्साही तरुणांच्या सहकार्यानें, संघ आपलें कार्यक्षेत्र वाढवून गेलीं १३ वर्षें खालील प्रमुख विभागांतून उल्लेखनीय कामें करीत आहे.

(१) सिद्धेश्वर हुतुतु संघ— तालुका, जिल्हा व प्रांतनिहाय सामन्यांत भाग घेऊन प्रशंसनीय यश संपादन केलें आहे. (२) सिद्धेश्वर तालीम मंडळ–या मंडळातर्फे गणेशोत्सवासारखे सार्वजनिक कार्यक्रम केले जातात. कुस्त्यांचा फड भरविणें, तरुणांना कुस्त्यांचें शिक्षण देणें वगैरें कामें केलीं जातात. (३) हिंदी मोफत वाचनालय– सिद्धेश्वर युवक संघामार्फत हें वाचनालय चालविलें जातें. यामध्यें दैनिक "सकाळ" "स्वराज्य" ही वर्तमान पत्रें चालूं आहेत. शिवाय श्रीमंत माईसाहेब साळवेकर यांचेमार्फत किर्लोस्कर, स्त्री व मनोहर हीं मासिकें या वाचनालयांत वाचकांचे करितां चालूं आहेत. याशिवाय एक स्वतंत्र ग्रंथालय चालूं केलें आहे. (४) सिद्धेश्वर लेजीम मंडळ– हे मंडळ याच संघानें चालविलें आहे. जत्रा, लग्नसमारंभ वगैरे ठिकाणीं लेजमीचे कार्यक्रम केलें जातात. त्यामधून मिळणाऱ्या बिदागीचा उपयोग सिद्धनाथ वाडीमधील एक मोठा पार दुरुस्त करण्याकडे केला. पार दुरुस्त करण्यामध्यें वाडींतील ग्रामस्थांचे श्रमदानहि उल्लेखनीय आहे. हा पार अवघ्या दोन दिवसामध्यें पुरा केला व त्याचें उद्घाटन मान. डॉ. प्र. शं. मराठे, अध्यक्ष वांई नगरपालिका यांच्या हस्तें झालें.

अशा तऱ्हेनें आजपर्यंत सर्व क्षेत्रांत संघाचे पाऊल आत्मविश्वासानें पुढें पडत आहे. संघाच्या कार्याचें श्रेय श्री. काकासाहेब देवधर, श्री. आण्णासाहेब जायगुडे, श्री. शंकरराव चव्हाण, श्री राजाभाऊ जायगुडे व संघाचे सेक्रेटरी श्री. द. म. देवधर व इतर सहकारी यांनाच आहे.

'कलावृन्द', वांअी.

साहित्याची साक्षेपी समीक्षा, नाट्यांतील नूतनतेचा न्यास नि चित्रसंगीतादि कलांचा प्रत्ययकारी अविष्कार करणारी वांअी नगरीची एक प्रातिनिधिक संस्था या समर्पक शद्वांत जिचा निर्देश करतां येईल ती ही 'कलावृन्द' संस्था विजयादशमीच्या सुमुहूर्तावर दिनांक ७-१०-१९५४ या दिवशीं स्थापन झाली. स्वतःच्या जीवनाला कांहीं कलात्मक नि सुसंबद्ध आकार देण्याची धडपड करणारे वांई येथील द्रविड हायस्कूलचे माजी विद्यार्थी श्री. शाम शिंदे, श्री. भाऊ धोंगडे, श्री. बबन वनारसे नि श्री. मथुरादास भाटे हे संवेदनाक्षम कलाप्रेमी तरुण हेच या 'कलावृन्द' चे संस्थापक.

विविध कलाकृतींची समीक्षा करावी, कलंदर कलावंतांच्या विविधांगी व्यक्तिरेखा न्याहाळाव्या, कलेच्या प्रत्येक क्षेत्रांतील विदग्ध विचार प्रवाहांचे सुस्पष्ट संस्कार घडवावें नि व्यक्तित्व समृद्ध करावें या 'कलावृंद' च्या आकांक्षा. संस्थेच्या घटनेंत संस्थेचा उद्देश स्पष्ट आहे. रंगभूमि नि इतर कला यांतील अभिन्नता राखण्यासाठीं सर्वांगीण प्रयत्न, रंगभूमीला नवनवें वळण देणाऱ्या निर्मितींच्या

नवोन्मेषांचा सोत्सुक अभ्यास, नाट्यदर्शन, नाट्यवाचन, कथाकवितादि साहित्य चर्चा, अनुभवसंपन्न ज्येष्ठांचीं व्याख्यानें, प्रदर्शनें, छोटे परंतु कलापिपासू नियतकालिक, हौशी परंतु श्रमांची तयारी असणाऱ्या होतकरू नटांसाठीं नाट्यशिक्षण-शाळा, अभिनय-साधना, व्यासंगी दिग्दर्शकांसाठीं सर्वंकष अभ्यास, नेपथ्यांतील सूक्ष्मता, निर्मितीची लय, रंगभूमीवरील पात्रांचा परस्पर साद, निर्मितीचा मूलगामी नि विवेचक मीमांसा, कलावंतांचें स्मृतिदिन इत्यादि बहुविध कार्यक्रमांचा साक्षेपानें मागोवा घेण्याचा संस्थेचा कटाक्ष आहे.

'अभिनव कलामंदिर' सातारा या संस्थेच्या विद्यमानें झालेल्या जिल्हा नाट्यस्पर्धेत 'कलावृन्द' च्या 'डॉ. कैलास' नाटकास प्रथम पारितोषिक मिळालें. 'कलावृंद' चें वैशिष्ठ्य हें कीं, स्थानिक सुविद्य नि हौशी स्त्री कलाकार संस्थेच्या सभासद असून संस्थेच्या विविध नाट्य प्रयोगांत भूमिका केल्या आहेत. सुशिक्षितांच्या संमिश्र नाट्यप्रयोगाची प्रथा वांईत 'कलावृंद' नें प्रथम सुरू केली याचा साभिमान निर्देश करावयाला हवा !

आजवर 'कलावृंद' नें विविध नाट्यप्रयोग करून विविध शिक्षण संस्थांना आर्थिक सहाय्य केलें आहे.

(१) कन्याशाळा वांई अमारत निधी ९४२ रु.
(२) महर्षि कर्वे शताब्दि निधी १९५८।,६०० रु.
(३) राजेंद्र विद्यालय, खडाळा १४०० रु.

याप्रमाणें जवळ जवळ ३००० रु. पर्यंतचें आर्थिक सहाय्य, नाट्यप्रयोगाचे सर्वच्या सर्व उत्पन्न त्या त्या संस्थांना देण्याचें रूपानें, 'कलावृंद' नें शैक्षणिक संस्थांना केलें आहे. वांओ नगरींतील इतर सामाजिक कार्य करणाऱ्या संस्थाहि 'कलावृंद' कडून असें भरीव सहाय्य मिळविण्याचा यत्न करतील असा विश्वास वाटतो.

याप्रमाणें 'कलावृंद' या नूतन परंतु नेकीनें पाउलें टाकणाऱ्या कलासंस्थेनें आपला कलासंसार मांडला आहे. वांईतील रसिकांचें 'कलावृंद' हें आशास्थान आहे.

'कलावृंद' चे प्रथम संचालक श्री. भाऊ घोंगडे होते. द्वितीय नि विद्यमान संचालक कु. मैनाताई नित्सुरे B. A. B. T. या काम पहातात. संस्थेचे विधी-सल्लागार श्री. पराशर कृष्ण अभ्यंकर B. Com LL. B. हे नगरपालिकेचे सन्माननीय सभासद 'कलावृंद' चे सभासद असून विधी-मार्गदर्शन करतात. 'कलावृंद' ही आतां रजिस्टर्ड संस्था झाली असून वांईतील सुसंकृत नि कलालुब्ध रसिकांच्या हार्दिक नि आर्थिक पाठिंब्यावर संस्थेची पाउलें प्रगतिपथावर राहतील असा सार्थ विश्वास वाटतो.

गंगापुरी ऊर्फ उमामहेश्वर घाट कृष्णाबाई संस्थान, वांओ.

वांई शहरामध्यें फार पूर्वीपासून वांईतील घाटावर निरनिराळ्या विभागांचे स्वतंत्र असे कृष्णाबाईचे उत्सव प्रतिवर्षी साजरे होत असतात. त्यांपैकींच गंगापुरी घाटावर गंगापुरी आळीकर मंडळी कृष्णाबाईचा उत्सव साजरा करतात. वांईच्या कृष्णा तीरावर जे सात विस्तीर्ण घाट आहेत त्या सर्वांमध्यें गंगापुरीचा घाट हा उत्तम आहे. गंगापुरी घाटाचा कृष्णाबाई उत्सव हा प्रतिवर्षी फाल्गुन शु॥ ६ ते १२ पर्यंत एकूण सात दिवस होत असतो. उत्सवाचेवेळीं श्रीकृष्णाबाईचे स्थापनेसाठीं एक दगडी सिंहासन कै. लक्ष्मणशास्त्री हळवे यांनीं बांधून दिलें आहे. सिंहासनासमोर भव्य असा मंडप उभारणेंत येतो. मंडप उभारण्याचें कार्य व कृष्णाबाईचे उत्सवांतील एकूण सात दिवसांचें कीर्तन, पुराण वगैरेचे सर्व कार्यक्रम हे सर्व आळीकरांचेच सहकार्यानें होत असतात. या घाटाचे कृष्णावाईचे उत्सवास कायमचें


असें उत्पन्न नाहीं. सर्व आळीकर मंडळीं वर्गणी व देणग्या जमा करून हा उत्सव प्रत्येक वर्षीं मोठ्या उत्साहानें साजरा करतात. श्रीकृष्णाबाईचे वांईत होणारे उत्सव हें वांईचें एक भूषण आहे. श्री कृष्णाबाईचे कृपेनें व आशिर्वादानें हें कार्य अखंड चालूं आहे व चालूं राहील असा विश्वास वाटतो.

श्री कृष्णाबाई संस्थान घाट रविधुंडी ऊर्फ धर्मपुरी

श्री कृष्णाबाई संस्थान घाट रविधुंडी ऊर्फ धर्मपुरी वांई ही वांईत दरसाल होणाऱ्या कृष्णाबाईचे उत्सवांतील एक नांवारूपास आलेली संस्था आहे. रविधुंडी हें पवित्र ठिकाण या धर्मपुरी घाटाचे परिसरांत येते. ' रवि ' आणि ' धुंडी ' या दोन सती असून त्यांची शपथ घेऊन आपापसांतील कित्येक वादांचे निकाल लागत असत, अशी सर्वश्रुत आख्यायिका आहे.

या घाटाचा उत्सव दरवर्षीं माघ शु।। १० ते माघ व।। १ पर्यंत सात दिवस होत असतो. या संस्थेच्या उत्सवाचा प्रारंभ धर्मपुरींतील सुरत्राण यांचे घराण्यानें केला आहे. सध्यां या घराण्यापैकीं श्री. सदाशिव मोरेश्वर ऊर्फ शंभुराव सुरत्राण यांचेकडे उत्सवाचा मुख्य मान आहे.

या संस्थेंत गेलीं कित्येक वर्षें आळींतील असंख्य निष्ठावंत कार्यकर्त्यांनीं तन-मन-धन खर्चून कृष्णाबाईची सेवा केलेली आहे. व त्याचें पर्यवसान आज ही संस्था अगदीं भरभक्कम पायावर उभी रहाण्यांत झालें आहे. या निवेदनांत संस्थेवर ज्यांनीं कायम स्वरुपाचे असे उपकार केले आहेत, अशांचा उल्लेख करणें अगत्याचें आहे. श्रीमंत बाळासाहेब साठे यांनीं संस्थेस " साठे धर्मशाळा " ही इमारत कायमची दिल्यामुळें संस्थेस आपला स्वतःचा प्रपंच या इमारतींत थाटता आला. आणि शिवाय वांई शहरास ज्या एका गोष्टीची कित्येक दिवस उणीव होती अशा " मंगल कार्याचें " जागेंसाठीं संस्थेस सदर इमारतीचा उपयोग करतां येऊं लागला. या इमारत जीर्णोध्दाराचे कामीं कै. दत्तोपंत शेंडे व कै. दिनकरराव खरे यांनीं उल्लेखनीय कष्ट घेतलेले आहेत. त्यांचा उल्लेख करणें अगत्याचें आहे.



साठे धर्मशाळा

श्री. विनायक नारायण ऊर्फ बापूराव बापट व श्री. महादेव गोविंद ऊर्फ बुवा काळे यांनीं संस्थेवर आपले अलोट प्रेम दर्शवून संस्थेस कायमचे ऋणी केलें आहे. ' कृष्णाकुटी ' व ' कृष्णादर्शन ' या दोन इमारती महर्गतेच्या काळांत बांधून घेऊन संस्थेस कायम स्वरूपाच्या उत्पन्नाचा अमोल ठेवा या दोन कार्यकर्त्यांनीं दिला आहे. त्यांना द्यावेंत तेवढे धन्यवाद थोडेच आहेत.


अशाप्रकारें ही संस्था आपलें कार्य चालूं ठेवीत आहे व दिवसेंदिवस असंख्य प्रेमी कार्यकर्ते संस्थेच्या हितासाठीं झटत आहेत.

श्री कृष्णाबाई संस्थान

— भीमकुंडआळी घाट —

वांई शहरांत पहिल्याप्रथम वस्ती भीमकुंड आळींतून झाली. त्यानंतर पलीकडचा पूल झाला. आमच्या घाटाचे बांधकामामध्यें आमच्या आळींतील श्री. नलावडे यांचें नांव घ्यावेच लागेल. त्यांनीं तेथें एक महादेवाचें देवालय बांधलें व त्या पुढील थोडासा घाट बांधून काढला. हल्लीं सदर घाट स्मशानघाट म्हणून समजला जातो. त्यापुढचें भीमाशंकराचें मंदिर आणि भीमकुंड हे इस्लामपूरचे श्री. मंत्री यांनीं बांधलेलें आहे. त्यानंतरचा थोडासा घाट श्री. एरंडे नांवाचें गृहस्थांनी बांधून काढला. मात्र पिंपर्णी पर्यंतचा सर्व भाग वाकडे सावकारांनीं बांधून काढला आहे. घाटाजवळच स्मशान असलेमुळें या आळीचा कृष्णाबाईचा उत्सव येथें न करतां आळीकर मंडळी तो कोणाच्यातरी घरीं करीत. श्री. बनवडीकर, कोठावळे, पंडित, देशपांडे यांचेकडे तो १९२७ पर्यंत होत गेला. तेव्हांपासून हा कृष्णोत्सव श्री. गोपाळराव कोठावळे यांचे प्रशस्त अंगणांत होत असतो व ती प्रथा अद्याप चालूं आहे. आमच्या घाटाचा रस्ता हा श्री. ठाकरसीबाईंच्या मदतींतून बांधिला आहे. आणि धर्मशाळा मात्र श्री. वाकडे यांनीं बांधलेली आहे.

श्रीकृष्णाबाईचा उत्सव हा शिवाजी महाराजांच्या काळापासून होत आहे. हा उत्सव श्रद्धेनें केला जातो व प्रत्येकजण हें आपलें घरचेच काम समजून या कार्याला वाहून घेत असतो.



वेंचलेलीं फुलें

.....लोकांना वाटतें, आपण जमिनीचे मालक आहोंत. लोक मरून त्यांची माती होतें व जमिनींत जातें आपण जमिनीचे मालक नाहीं. जमीनच आपली मालक.

.....तत्त्वनिष्ठा ही एक कठोर देवता आहे. जीवनांतल्या अनेक नाजूक भावनांचा बळी घेतल्याशिवाय ती प्रसन्नच होत नाहीं.

.....गांधीजी रामनाम घेण्यास चुकत नसत. आपण चुकूनसुद्धां रामनाम घेत नाहीं.

.....विठ्ठलभाई पटेल यांच्या चलाखींत देशभक्ति होती. आपल्या देशभक्तींत मात्र चलाखी असते.

.....एकदां पंडित नेहरू नाशिक येथें तुरुंगांत होते. कैद्यांना खावयास दिलेल्या भाकरीमध्यें माती मिसळलेली पाहून त्यांना राग आला. त्यांनीं ही गोष्ट तुरुंगाच्या अधिकाऱ्याच्या कानीं घातली.

" काय हो, ही भाकरी खाणार कशी ? त्यांत माती मिसळली आहे. "

त्यावर अधिकारी म्हणाला " तुम्ही लोक तुरुंगांत मातृभूमीची सेवा करण्यासाठीं आलांत कीं भाकरींत माती मिसळली ही तक्रार करण्यास आलांत ?"

पं. नेहरू म्हणाले " महाशय आम्ही येथें मातृभूमीची सेवा करण्यासाठीं आलो आहोंत. मातृभूमीला खाण्यासाठीं नाहीं."

॥ शेवटची विनवणी-संतजनीं परिसावी
विसर न पडो द्यावा-देवा माझा तुम्हांसी
आतां फार बोलूं काय-अवघे पायीं विदीत
तुका म्हणे पडतो पाया-धरा छाया कृपेची॥

सत्यमेव जयते !

त्वरा करा ! त्वरा करा !! त्वरा करा !!!

शेतकरी बंधूनो --

* तुम्हाला चांगला भाव व चोख व्यवहार व्हावा असें वाटत असेल तर तुम्ही *

卐 ओसवाल आणि कंपनी, वांशी 卐

यांचे मार्केट यार्डमधील अडत दुकानांत आपला माल विक्रीसाठीं पाठवा. आपले मालाची योग्यतन्हेनें व कसोशीनें विक्री केली जाते व भावहि योग्य दिला जातो. याकरितां आमचे कांटयावर माल पाठवून आपला फायदा करून घ्या.

—: कंपनीचे भागीदार :—

ज्ञा. रामलाल डोंगरजी, गटाजीशेट, भूरमल रत्नाजी आणि लखमीचंद अंबालाल

राजाराम श्रीपती जायगुडे अॅण्ड ब्रदर्स, वांशी.

.....गव्हर्मेंट, लोकलबोर्डस्, नगरपालिका, एस्. टी. इ. संस्थांचे प्रमाणित कॉन्ट्रॅक्टर्स.

.....बिल्डिंग्ज, रोडस्, पेंटिंग वगैरें कामांचे कलाकुशल कांट्रॅक्टर्स

.....बिल्डिंग मटीरियल सप्लायर्स आणि कमिशन एजंट

.....विटांचे कारखानदार

आमचेकडून बांधल्या गेलेल्या विविध इमारतीं हींच आमची प्रत्यक्ष शिफारसपत्रें !

आपल्याकडील कोणत्याहि मजबूत इमारत बांधणीसाठीं आम्हास अवश्य भेटा.

– वांई नगरपालिकेस शताब्दी शुभचिंतन –

आमचे येथें

सर्व प्रकारचे मिलचे — शर्टिंग, कोटिंग, पपलीन, धोतरजोडी, चोट

दोरवा, लोन वगैरे व

–* सर्व पेठांची फॅन्सी पातळें *–

लग्न-मुंजीसाठीं – बनारसी शालू, रेशमी जरी पातळें, खण, ब्लाऊझपीस वगैरे

आणि

** सर्व प्रकारची उत्कृष्ट होजीअरी **

योग्य दरांत मिळेल.

मेसर्स रामदास नारायणदास

कापड दुकान, मोतीचौक, वांई. (उ. सातारा)

फोन क्र. ५

— वांईतील जीवनोपयोगी वस्तुंचे प्रमुख विक्रेते —

अधिकृत विक्रेते:—

(१) हिंदुस्थान लिव्हर लि. मुंबई, फुड डिव्हिजन–सोप डिव्हिजन

(२) शांग्रीला फुड प्रॉडक्टस्, मुंबई.

* सर्व प्रकारच्या किराणा व भुसार ठोकबंद मालासाठीं *

गांधी गणपतदास दीपचंद

नवी पेठ (दाणेबाजार रस्ता)

घरांतील रोजच्या गरजेच्या वस्तूंसाठीं:— शाखा क्रमांक १ – भाजी मंडई, वांई.

आपल्या शेतकी मालाचें विक्रीसाठीं:— शाखा क्रमांक २ – अडत दुकान मार्केट यार्ड, गाळा क्र. ३

दी वांझी कंझ्युमर्स को-ऑपरेटिव्ह सोसायटी लि.

वांई (उ. सातारा)

सचोटी, त्याग व काटकसरीच्या भक्कम पायावर उभारलेली आणि फाजील नफेबाजीस आळा घालण्याचे हेतूनें चालविली जात असलेली.....

गेलीं आठ वर्षें ६। टक्के डिव्हीडंड देणारी.....

संस्थेच्या ग्राहकांस "ग्राहक संतोष नफा" (Consumers Bonus) देणारी, प्राथमिक उपचाराचीं उपकरणें अत्यल्प भाड्यानें पुरविणारी, सहकारी तत्त्वावर चालविली जात असलेली एकमेव संस्था.

अशा या संस्थेस भेट देऊन, गिऱ्हाईक अगर अन्य नात्यानें संबंध जोडून, सहकार्याचा हात पुढें करून उत्तेजन द्यावें, अशी विनंति आहे.

महादेव गोविन्द काळे
चेअरमन

वांई नगरपालिकेचे शताब्दीचे वेळींच

☆ श्री अरविंद स्टोअर्स, वांई. ☆

या दुकानास दहा वर्षें पूर्ण होत आहेत. स्वतःचे मालकीचे इमारतींत चालूं असलेलें वरील दुकान.

आपली स्टेशनरी, कटलरी, हार्डवेअर, क्रॉकरी, ग्लासवेअर वगैरे अनेकविध क्षेत्रांत सेवा करीत आहे.

--खालील कंपन्यांचे वांई विभागाचे अधिकृत प्रतिनिधी--

(१) दी टाटा ऑईल मिल्स कंपनी लि.
(२) हिन्दुस्तान लिव्हर लि. (टॉयलेट प्रेपरेशन्स डिव्हिजन)
(३) शालिमार बिस्किट्स् प्रायव्हेट लि.
(४) वनिता रबर वर्क्स, सासवड.
(५) कॉसमॉस पेंट्स् इंडस्ट्रीज.
(६) मरक्युरी पेंट्स् अँड वार्निशेस प्रायव्हेट लिमिटेड.

कला नि तंत्र यांच्या मधुर संगमांत
म्हाऊन निघणारें आपलें छायाचित्र
म्हणजे आपल्या घरकुलांतील रम्य आठवण !
तंत्रशुद्धतेनें घेतलेलें कलासुंदर छायाचित्र
आपणांस दिसेल ते केवळ

"कान्हेरे छायाचित्रकार"

यांच्या वांई येथील मध्यवर्ति कलागृहातच !
आपलें समाधान हाच आमचा कलानंद.

शम्स ऑटोमोबाईल्स, वांई.

३० वर्षें पंचगनी मोटार सर्व्हिसमध्यें अनुभव असलेले व गेलीं १० वर्षें वांईमध्यें
स्थायीक असलेले शमसुद्दीन मामू यांच्या वरील कारखान्यामध्यें
**चालकांचे देखरेखीखाली सर्व प्रकारच्या ट्रक्स, मोटार सायकल्स, मोटार कारंची दुरुस्ती
व ओव्हर-हॉलिंगचीं कामें काळजीपूर्वक केली जातात.**
एकवेळ अनुभव हींच खात्री.

पत्ता:— एस. टी. स्टॅन्ड नजीक, वांई.

मेसर्स विष्णु महेश्वर जोग अँड कं.

**वाभी, पुणें इ. शहरांत स्थापत्यकलेंतील अुल्लेखनीय कामें केलेले नामवन्त बिल्डिंग कॉन्ट्रॅक्टर्स,
रोड कन्स्ट्रक्टर्स, कलात्मक, मजबूत नि टिकाअू बांधणी, अद्ययावतता वगैरे बाबतींत अग्रेसर !**
*आपल्याकडील कोणत्याहि प्रकारच्या बांधकामासाठीं आणि या बाबतींतील
सुयोग्य सल्ल्यासाठीं भेटा अथवा लिहा.*

— व्ही. अेम्. जोग, B. E. (Civil) (Hons.)
धर्मपुरी, वांअी

हेग्जामार HEXAMAR हेग्जामार

ह्या जंतुमय जगांत मानवाचे

महान शत्रू

डास, पिसू, ढेकूण, झुरळे,
उंदीर ह्यापासून होणारे
मलेरिया, प्लेग, डेंगू, कांलरा इत्यादि
प्राणघातक रोग खात्रीने नायनाट करण्याचे

"हेग्जामार"

बी. एच. सी, डी डी टी, मॅलाथिआन,
क्लोरोडेन, झिंकफास्फाईड इत्यादि
कीटक नाशक औषधें अल्प खर्चांत
प्रतिबंध करण्यांत प्रभावी ठरलीं आहेत.

– सर्वत्र वापर –

लिहा:–

भारत पल्वरायझिंग मिल्स प्रायव्हेट लि.
'हेग्जामार हौस' ३८A सयानी रोड, मुंबई नं. २८

पिकांचे रोग व पिकांवरील कीटकें हे पिकांचे

मोठे शत्रू

त्यांचेपासून आपल्या पिकांचें
संरक्षण करण्यासाठीं

"हेग्जामार"

कीटक नाशक औषधें आणि भरघोस पिकांचे व
फळांचे उत्पादनासाठीं 'हेग्जामार' मिश्रखतें
अग्रेसर ठरलीं आहेत.

– अनुभव सिद्ध –

भेटा:–

मेसर्स– महादेव बाळा फरांदे अॅन्ड को.
बी-बियाण्याचे व मिश्रखतांचे व्यापारी,
वाई (जि. उ. सातारा)

HEXAMAR



अधिक भाजीपाला पिकवा

आमचे येथील ताजे, खात्रीलायक
निवडक व जातीवंत
भाजीपाल्याचे बी;व मिश्र खतें;
व किटक नाशके अवश्य वाप-
रून आपले उत्पन्न वाढवा.
अधिक माहितीकरितां भेटा.

महादेव बाळा फरांदे आणि कंपनी
मु. पोष्ट;वाई, जिल्हा,उ.सातारा.





वामन महादेव मुळे

वाअी शहरांतील सुंदर कापड केंद्र

धर्मपुरी वाअी [उ. सातारा]

आमचेकडे मद्रास, अरविंद, केंलींको, न्युशोरों
मफतलाल, अंबीका, सेंचरी, खटाव, फील्ले व
जगप्रसिद्ध मिल्सचें सर्व प्रकारचें कापड ठोक
किरकोळ मिळते.

बंच नंबर १ :- मे. बी. भालचंद्र आणि कंपनी वाअ
(साडी विभाग

आमचेकडे लग्नास लागणारें सर्व प्रकारचें कापड बनारसी शालू
शहापुरी, चंदेरी, नागपूर, कोईमतूर, बेंगलोर, इचलकरंजी
विरकल, मालेगांव वगैरे पेठांच्या मालाचा प्रचंड स्टॉक असतो

बंच नंबर २ :- मे. मुळे बनारसे आणि कंपनी वाअ

अहमदभाई उमरभाई ऑईल मिल, मुंबई यांच्या शुद्ध शेंगदाण
पेंडीचा प्रचंड स्टॉक व धरमसी मोरारजी केमीकल कं. अंबरना
यांचीं जहाजछाप मिश्रखतें व सुपर फॉस्पेट आमचेकडे मिळते.

खरेदीपूर्वी आमचे सर्व विभागांस अवश्य भेट द्या.

वामन महादेव मुळे
मे. बी. भालचंद्र आणि कंपनी
मे. मुळे बनारसे आणि कंपनी

फोन नंबर ९ – वाई

[विराज वैभव प्रेस, वाई.